



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार २२ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०






# वाढत्या दराने साखरेचा गोडवा महागला; सर्वसामान्यांचा बजट कोसळला









**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही महिन्यांपासून जीवनापयोगी आणि त्यातही खाद्य पदार्थांशी संबंधित वस्तूंमध्ये सातत्याने वाढ होताना पाहायला मिळत आहे. डाळी, भाज्या, फळे या वस्तूंमध्ये होणा-या दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे बजेट आधीच कोसळले आहे. त्यातच आता साखरेच्या दरातही मोठी वाढ झाल्याने चहातील गोडवा सुद्धा महागला आहे. साखरेच्या वाढत्या दरामुळे आता मिठाईच्या दरांमध्ये वाढ होण्यास सुरु वात झाली आहे.

ऐन सणासुदीच्या काळात साखरेसोबतच मिठाईचे दर वाढत असल्याने सर्वसामान्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. आधीच महागाईने कंबरडे मोडले असताना आता सणासुदीच्या काळात गोड पदार्थ बनवण्यासाठी लागणारी साखरही महाग होत असल्याने याबाबत सर्वसामान्यांची चिंता वाढली आहे.

साखरेच्या दराने मोठी ऊच्चांकी गाठली असून, साखरेचे प्रति क्विंटल दर हे ७ हजार ५०० रु पयांवर पोहोचले आहेत. त्यामुळे किरकोळ दरात सुद्धा मोठी वाढ झाली आहे. . साखरेची ही आत्तापर्यंतची इतिहासातील सर्वात मोठी वाढ आहे. त्यामुळे साखरेचा भाव वाढल्याने सरकारने लवकरात लवकर यावर काहीतरी तोडगा काढावा आणि साखरेचा दर पुन्हा एकदा सामान्यपातळीवर येण्यासाठी निर्णय घ्यावा अशी मागणी करण्यात येत आहे. वाशिम जिल्ह्यात किरकोळ बाजारात साखरेचे दर ८० रु पयांवर गेले आहेत. तर, मुंबईतही ७० ते ७५ रु पयांदरम्यान साखर विक्री होत आहे.

साखरेच्या दरात झालेली ही मोठी वाढ आता थेट मिठाई व्यवसायाच्या गणितावर परिणाम करू लागली आहे. कारण मिठाई तयार करण्यासाठी साखर हा सर्वात महत्त्वाचा आणि मोठ्या प्रमाणात वापरला जाणारा घटक आहे. त्यामुळे साखर महागली आणि मिठाई विक्रेत्यांचा ऊत्पादन खर्चही वाढला आहे. याचा परिणाम मिठाईच्या दरांवर होण्याची शक्यता आहे. साखरेच्या दरवाढीमागे अनेक कारणे आहेत. देशातील साखर ऊत्पादनासाठी उस हा मुख्य कच्चा माल आहे. काही भागांत हवामानातील बदल, पाउस किंवा पाण्याची कमतरता यामुळे ऊसाच्या ऊत्पादनावर परिणाम होउ शकतो. त्याचा परिणाम साखरेच्या ऊत्पादनावरही होतो. याशिवाय साखरेची मागणी वाढली आणि बाजारातील पुरवठा तुलनेने कमी झाला तर दर वाढण्याची शक्यता असते. उस ऊत्पादक शेतक-यांना द्यावी लागणारी उसाची किंमत, कारखान्यांचा ऊत्पादन खर्च, वाहतूक खर्च आणि इतर खर्च वाढल्यास त्याचाही परिणाम साखरेच्या अंतिम किमतीवर होतो. बाजारातील मागणी आणि पुरवठ्याच्या परिस्थितीनुसार घाउक तसेच किरकोळ बाजारातील दर बदलत असतात.

## साखर महागल्यानंतर बिहारच्या मंत्र्यांचे अजब विधान

## हल्ली प्रत्येकालाच मधुमेह त्यामुळे अडचण नाही



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सणासुदीच्या काळात साखरेच्या दरात सातत्याने वाढ होत असल्यामुळे सामान्यांसमोरील अडचणी वाढल्या आहेत. साखरेचा किरकोळ बाजारातील दर प्रति किलोमागे ६४ रु पयांवर गेला आहे. ठोक बाजारात साखरेचा दर ५,८०० रु पये प्रतिक्विंटल झाला आहे. साखरेच्या वाढत्या दरामुळे ग्राहकांमध्ये नाराजी पसरलेली असतानाच भाजपाच्या मंत्र्यांनी मात्र सामान्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. बिहारचे ग्रामविकास मंत्री आणि जनता दल (संयुक्त) पक्षाचे नेते श्रवण कुमार म्हणाले की, लोकांना हल्ली मधुमेहाचा त्रास असल्यामुळे ते साखर कमी खातात, त्यामुळे वाढत्या दरांचा फार परिणाम होणार नाही. माध्यमांशी बोलताना श्रवण कुमार म्हणाले की, साखरेच्या दरवाढीचा फारसा परिणाम होण्याची शक्यता कमी आहे. कारण हल्ली प्री-डायबेटिक आणि डायबेटिक रु ग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे साखर सेवनाबाबत लोक सावध झाले आहेत. मधुमेहाच्या रु ग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे लोक हल्ली गोड खात नाहीत. त्यामुळे साखरेच्या दरवाढीचा फारसा फरक पडेल, असे मला वाटत नाही, ➪(पान २ वर)

## इथेनॉलमुळे साखरेचे दर वाढले नाहीत, केंद्र सरकारचे स्पष्टीकरण




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतात गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने साखरेच्या किमती झपाट्याने वाढ होताना दिसत आहे. घाउक बाजारात साखरेचा दर तब्बल ८० रु पये किलोपर्यंत पोहोचला आहे. इथेनालच्या ऊत्पादनासाठी ऊसाचा वापर वाढल्यामुळे साखरचे दर वाढले आहेत, असा दावा विरोधी पक्षांकडून केला जात आहे. परंतु, केंद्र सरकारने साखरेच्या दरवाढीला इथेनाल जबाबदार नाही, असे स्पष्टीकरण दिले आहे. साखरेच्या दरवाढीला इथेनालला दोष देणे चुकीचे आहे. २०२२-२३ मध्ये इथेनॉल बनवण्यासाठी १२ टक्के साखर वापरली जायची, ती आता कमी होउन ९ टक्क्यांवर आली आहे. आता देशात तयार होणा-या एकूण इथेनालपैकी पाउण ७५ टक्के भाग हा साखरेऐवजी धान्यापासून, विशेषतः मक्यापासून बनवला जातो. इथेनॉलच्या निर्मितीमुळे साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती मजबूत झाली आहे. कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे २० ऑगस्ट २०२६ पर्यंत उस ऊत्पादक शेतक-यांची ९७ टक्के थकबाकी देण्यात आली आहे. २०१४ ते २०२१ या काळात सरकारला साखर ऊद्योगाला तब्बल १४,६०० कोटी रु पयांचे ➪(पान २ वर)

## ऐन सणात साखर महाग, मोठे 'गौडबंगाल'




**मुंबई/प्रतिनिधी :** देशात आणि राज्यात सध्या वाढत्या महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यातच अवघ्या ३ महिन्यांत साखरेच्या किमती तब्बल ४० टक्क्यांनी वाढल्याने किरकोळ बाजारात साखरेने ८० रु पये प्रति किलोचा टप्पा गाठला आहे. साखरेच्या या ऐतिहासिक दरवाढीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी तीव्र आक्षेप घेत यंदाचा साठा पाहता आगामी दिवाळीपर्यंत आणि पुढील हंगामात देशाला पुरेल इतके ऊत्पादन ऊपलब्ध असतानाही ही अचानक झालेली भाववाढ संशयास्पद असून यामागे मोठे 'गौडबंगाल' आहे, असा खळबळजनक दावा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केला असून तीव्र आक्षेप घेत सरकारला आरोपीच्या पिंज-यात ऊभे केले आहे.राज्यातील बाजारपेठेत सध्या साखर कडू झाली असून, ग्राहकांच्या खिशाला मोठी कात्री बसत आहे. साखरेच्या दराने इतिहासातील सर्व ऊच्चांक मोडीत काढले असून, घाउक बाजारात दर ७,५००रु पये प्रति क्विंटलवर पोहोचले आहेत. वाशिमसारख्या जिल्ह्यात साखर थेट ८० रु पये किलोवर विकली जात आहे. राजू शेट्टी यांनी साखरेच्या बाजारातील अंतर्गत साखळीवर बोट ठेवत गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, साखरेचे भाव पुढील दोन महिन्यांत ➪(पान २ वर)

# बालभारतीच्या 6 वीच्या इतिहासातून 'मांसाहार' आणि 'जातिव्यवस्था' गायब



**पुणे/प्रतिनिधी :** वैदिक काळातील आहार वनस्पती-आधारित होता. वैदिक समाज सहकार्य आणि आपुलकीने राहत होता. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या (बालभारती) इयत्ता सहावीच्या इतिहासाच्या नव्या पाठ्यपुस्तकातील हे ऊल्लेख. जुन्या पाठ्यपुस्तकात असे ऊल्लेख नसताना, त्यांचा नव्याने समावेश कसा आणि तो ऐतिहासिक तथ्यांवर आधारित आहेत का, यावरून आता चर्चेला तोंड फुटले आहे. इयत्ता सहावीच्या इतिहासाच्या जुन्या पाठ्यपुस्तकात वैदिक काळातील आहाराचा भाग म्हणून भाज्या आणि मांस दोन्हींचा ऊल्लेख होता. मात्र, नवीन पाठ्यपुस्तकात वैदिक काळातील लोकांच्या आहारात धान्य, दूध, दही, तूप, मध आणि भाज्यांचा समावेश होता. ते आपल्या जेवणात बार्ली, गहू, तांदूळ आणि बाजरी यांसारख्या विविध अन्नधान्यांचा वापर करत असत. अशा प्रकारे त्यांचा आहार वनस्पती-आधारित अन्नावर आधारित होता, असे विधान आहे. वास्तविक संस्कृतचे अभ्यासक प्रा. श्रीकांत बहुलकर यांच्या बिब्लिओग्राफी ऑफ (पान ४ वर) (पान १ वरून) डाएटेटिक्स इन एन्शंट अँड मिडिएव्हल इंडिया या ग्रंथात वैदिक वाङ्मयात विविध मांसाहारी पदार्थांचा ऊल्लेख असल्याचे नमूद आहे. पाहुण्यांसाठी मोठा बैल किंवा बोकड शिजवण्याची पद्धत होती. घोडे, वांझ गायी, शेळ्या आणि म्हशींचे मांसही शिजवले जात असे. यजुर्वेदाच्या संहितेमध्ये मासेमारी करणा-यांसाठी ➪(पान २ वर)

# डोंगरावरून उडी घेउन तरूणाची आत्महत्या, वाचवताना आई-वडील दोघांचा मृत्यू



**छत्रपती संभाजीनगर :** वाळूज औद्योगिक वसाहत परिसरातील तिसगावजवळील खवड्या डोंगरावरून एका तरुणाने ऊडी घेतली, त्याला वाचवताना वडिलांचाही तोल गेला आणि त्यांना डोंगरावरून कोसळताना पाहून आईने पाठोपाठ ऊडी घेतली. तिघेही ऊंच कड्यावरून खोल खाणीमध्ये पडले. खडकावर आदळून त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी १ च्या सुमारास घडली. जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील कर्जत पिंपळगाव मधील कुणाल मुरलीधर चांदगुडे (वय १९) या तरुणाने आधी ऊडी मारली नंतर त्याला वाचविण्यासाठी वडील मुरलीधर दामोधर चांदगुडे (वय ४८) पुढे आले. त्यांचा तोल गेला असे लक्षात येताच आईनेही ऊडी मारली. यात संगिता मुरलीधर चांदगुडे यांचा मृत्यू झाला. हे सर्व जण शहरातील झाल्टा फाटा परिसरातील अक्षयबन सोसायटीसमोर राहत होते. कौटुंबिक वादातून ही घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे.घटनेबाबत प्रत्यक्षदर्शींनी सांगितले, की आत्महत्या करण्यासाठी आलेला कुणाल सकाळी १० पासूनच खवड्या डोंगराच्या धोकादायक कड्यावर ऊभा होता. संगिता या ऊंच कड्यावरून त्याला हात जोडून मागे फिरण्याची विनंती करत होत्या, तर वडील मुरलीधर खालच्या कड्यावर ऊभे राहून त्याला समजावत होते. मात्र, कुणाल ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. सुमारे ३ तास ➪(पान २ वर)





## लाडक्या बहिणींची संपूर्ण पडताळणी होणार-मुख्यमंत्री

**मुंबई / प्रतिनिधी-** लाडकी बहीण योजनेने महायुती सरकारला मोठे यश मिळवून दिले. मात्र त्याचा सरकारच्या तिजोरीवर भार पडला आहे. आता हा विरोधकांसाठी राजकीय विषय बनला आहे.लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कणखर भूमिका घेतली आहे. आता या संपूर्ण योजनेची पडताळणी केली जाईल. ज्या सरकारी कर्मचा-यांनी लाभ घेतला त्यांच्यावर शिस्तभंगाच्या कारवाईचे संकेत मुख्यमंत्र्यांनी दिले. त्यामुळे सरकारी कर्मचारी धास्तावले आहेत.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, योजनेच्या लाभार्थ्यांच्या पडताळणीसाठी केवायसी महत्त्वाचा विषय आहे. योजना सुरू केल्यानंतर मोठ्या प्रमाणावर लाभार्थीसंख्या होती. त्यामुळे प्रशासनाला लगेचच त्यांची तपासणी करणे शक्य नव्हते.त्यामुळे सरकार सत्तेत आल्यानंतर या संदर्भात स्पष्ट भूमिका घेण्यात आली आहे. योजनेच्या लाभार्थ्यांच्या पडताळणीत एक कोटी ६५ लाख महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे. त्यामध्ये कोणताही खंड पडणार नाही.काँग्रेस आणि अन्य विरोधक या योजनेच्या विरोधात न्यायालयात गेले. योजनेवर त्यांनी टीका केली. मात्र आता हेच विरोधक त्यावर सरकारला प्रश्न विचारत आहेत, असे सांगत त्यांनी काँग्रेसला धारेवर धरले.लाडकी बहीण योजनेबाबत राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनीही दोन दिवसांपूर्वीच लाभार्थ्यांची तपासणी होणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले होते. महिला व बालकल्याण विकास मंत्री आदिती तटकरे यांनी मात्र या संदर्भात वेगळी भूमिका घेतली होती. आता मुख्यमंत्रीच यासंदर्भात आक्रमक असल्याने बनावट लाभार्थी धास्तावले आहेत.

## 10 वर्षीय विद्यार्थिनीवर शाळेत अत्याचार; मुख्याध्यापकाला अटक

**नांदेड :** शहरातील श्रीनगर परिसरातील एका शाळेत दहा वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याच शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या ५० वर्षीय व्यक्तीने अल्पवयीन विद्यार्थिनीशी गैरकृत्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शाळेत असताना संबंधित मुख्याध्यापकाने मुलीसोबत गैरवर्तन केल्याचा आरोप आहे. यावेळी मुलीने आरडाओरड केल्यानंतर हा प्रकार ऊघडकीस आल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेनंतर घाबरलेल्या मुलीने आपल्या पालकांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर पालकांनी तातडीने भाग्यनगर पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.पालकांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत भाग्यनगर पोलिसांनी काल रात्री संशयित मुख्याध्यापकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. त्याच्यावर अल्पवयीन मुलांच्या लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करणा-या पोक्सो कायद्यासह अॅट्रॉसिटी कायद्यांतर्गतही गुन्हा नोंदवण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणातील ५० वर्षीय संशयित मुख्याध्यापकाला ताब्यात घेतले आहे. या घटनेची सखोल चौकशी सुरू असून, मुलीचे जबाब आणि ऊपलब्ध पुराव्यांच्या आधारे पुढील तपास केला जात आहे.या प्रकरणाचा तपास भाग्यनगर पोलिस करत आहेत. पोलिस निरीक्षक संतोष तांबे यांनी घटनेला दुजोरा देत पुढील तपास सुरू असल्याची माहिती दिली आहे. या घटनेनंतर शाळांमध्ये विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पालकांकडूनही या प्रकरणात कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.



# देशाला ऊर्जा क्षेत्रात आत्मनिर्भर करण्यासाठी अभियंत्यांनी योगदान द्यावे- पालकमंत्री

## ४१व्या राष्ट्रीय विद्युत अभियांत्रिकी अधिवेशनात आवाहन




अमरावती/प्रतिनिधीः-

महाराष्ट्र व देशातील अभियंत्याचीं देशाच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका राहिली आहे. आता २०४७ पर्यंत विकसित भारत करण्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी अभियंत्यांनी योगदान द्यावे, असे आवाहन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले. अंधारात राहणाऱ्या मेळघाटातील आदिवासी दुर्गम भागात अभियंत्यांच्या मेहनतीमुळे वीज पोचली असून अंतिम २२ गावांमध्ये ४० कोटी निधीतून सोलर लाईन टाकण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

येथील अभियंता भवनात दि. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स अमरावती सेंटरच्या वतीने आयोजित '४१व्या राष्ट्रीय विद्युत अभियांत्रिकी अधिवेशनात' ते बोलत होते. आमदार प्रवीण पोटे आणि प्रवीण तायडे, दि. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्सचे राष्ट्रीय अध्यक्ष मनीष कोठारी आदी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या उभारणीत अभियंत्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. महाराष्ट्र व देशाच्या उर्जा क्षेत्र विकासातही अभियंत्यांनी महत्वाची भूमिका वठविली आहे. दीर्घकाळ अंधारात असलेल्या एलिफंटा येथील ऐतिहासिक घारापुरी लेण्यांमध्ये ७ किमीच्या समुद्रातून केबल प्लेट टाकून राज्य शासनाच्या महावितरण आणि पारेषण कंपन्यांच्या अभियंत्यांनी अभूतपूर्व कार्य केले आहे. याची दखल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेत कौतुक केले असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर वाहिनी योजना प्रारंभिक अंमलबजवणी काळात अभियंत्यांच्या योगदानामुळे मिळालेल्या यशावर त्यांनी प्रकाश टाकला.

मेळघाटातील आदिवासी दुर्गम भागातील अंधारात राहणाऱ्या ३०० गांवामध्ये वीज पोचविण्यात अभियंत्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे.यातील शेवटच्या २२ गावांमध्ये ४० कोटींच्या निधीतून सोलर लाईनच्या माध्यमातून वीज पोचविण्योच शिवधनुष्यही अभियंत्यांनी उचलल्याचे त्यांनी सांगितले. सौर पंपाद्वारे वीज उपलब्ध करून देण्यात महारष्ट्राने देशात अग्रस्थान मिळविले आहे व त्याची दखल गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने घेतल्याचेही त्यांनी सांगितले. अभियंत्यांनी विकसित भारताचे लक्ष पूर्ण करण्यातही महत्वाचे योगदान द्यावे असेही ते म्हणाले. विद्युत क्षेत्रात उल्लेखनीय कार्यासाठी पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते महाराष्ट्र वीज वितरण कंपनीचे संचालक राजेंद्र पवार, एनआयटी इटानगरचे (अरुणाचल प्रदेश) संचालक डॉ. मोहन आवारे आणि मराठवाड्यातील प्रसिद्ध उद्योजक प्रताप पवार या अभियंत्यांचा इमिनंट इंजिनियर पुरस्काराने तर डॉ एस. हेमवती, डॉ.एस.जयंती आणि प्रियम जैन या अभियंत्यांचा यंग इंजिनिअर पुरस्काराने गौरव करण्यात आला. तत्पूर्वी, बावनकुळे यांच्या हस्ते कोनशिलेचे अनावरण करून इंजिनियर फिटनेस सेंटरचे उद्घाटन झाले. दि. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्सचे संयोजक आनंद जवंजाळ यांनी प्रास्ताविक केले.

कृत्रिम बुद्धिमत्ता व हरित तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्यासाठी देशात विद्युत निर्मितीचे उद्दिष्ट गाठण्याच्या उद्देशाने या दोन दिवसीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे.

पान १ व १० वरून

## हल्ली प्रत्येकालाच मधुमेह

असे विधान श्रवण कुमार यांनी केले आहे. मंत्र्यांचे हे विधान आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. लोक मंत्र्यांच्या टिप्पणीवर आश्चर्य व्यक्त करत आहेत. तर बिहारमधील विरोधी पक्ष आरजेडीने श्रवण कुमार यांच्यावर टीका केली आहे. आरजेडीचे प्रवक्ते एजाज अहमद यांनी सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडीओत म्हटले की, साखरेच्या वाढत्या दराचा फटका सामान्य ग्राहकांना बसत आहे. सामान्य माणूस सकाळची सुरु वात चहाचा घोट घेउन करतो किंवा चहामध्ये बिस्किट बुडवून खात असतो. एजाज अहमद पुढे म्हणाले, श्रवण कुमार मंत्री असून साखरेची किंमत कितीही वाढली तरी त्यांना परवडू शकते. मात्र ते सामान्य जनतेच्या समस्येबद्दल असंवेदनशील आहेत. केंद्र सरकारच्या धोरणामुळे साखरेचे भाव वाढले आहेत. पेट्रोलमध्ये मिश्रण करण्यासाठी इथेनालचे उत्पादन वाढवले आहे. यासाठी उसाचा वापर केला जातो, त्यामुळे साखरेचे भाव वाढले आहेत. अहमद यांनी यावेळी पंतप्रधान मोदींनाही लक्ष्य केले. त्यांनी म्हटले की, पंतप्रधान मोदी यांनी अनेकदा स्वतः चहा विकत असल्याचे म्हटले होते. त्यामुळे साखरेचे भाव वाढत असतील तर त्यांनी हस्तक्षेप करणे गरजेचे होते.

## इथेनॉलमुळे साखरेचे दर वाढले

अनुदान द्यावे लागले होते. परंतु, २०२१-२२ पासून साखर उद्योगाला कोणत्याही सरकारी अनुदानाची गरज पडलेली नाही. यावर्षी देशात साखरेचे एकूण उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी झाले आहे. अवकाळी आणि वाईट हवामानामुळे उसाच्या पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. सण-उत्सवांचे दिवस असल्याने बाजारात साखरेची मागणी अचानक वाढली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही साखरेचा पुरवठा कमी झाला आहे. तसेच व्यापा-यांनी केलेली साखरेची साठेबाजी आणि सट्टेबाजी यामुळेही दर वाढले आहेत, असे सरकारकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. दरम्यान, बाजारात साखरेचा किरकोळ भाव ८० रुपये प्रति किलोवर पोहोचल्यानंतर सरकारने ही कारणे दिली आहेत.

## ऐन सणात साखर महाग,

वाढवायचे आधीच निश्चित झाले होते. त्यामुळे मोठ्या व्यापा-यांनी मंदीच्या काळातच कमी दराने साखर खरेदी करून ती कारखान्यांच्या गोदामात साठवून ठेवली. आता बाजार कडाडल्यावर आम्ही आधीच साखर विकली असून आमच्याकडे स्टाक नाही, असा बनाव कारखानदार करत आहेत. रेकार्डवर नसलेली आणि उसाची रिकव्हरी चोरून तयार केलेली काळी साखर आता चढ्या दराने बाजारात आणली जात आहे. हा सर्व नफा प्रामाणिक शेतक-यांऐवजी काळा पैसा तयार करणा-या व्यापा-यांच्या घशात जात आहे.

## बालभारतीच्या 6 वीच्या इतिहासातून

अनेक शब्द आले आहेत. बहुदा या काळात आहाराचा भाग म्हणून माशांचाही परिचय झाला असावा, असा उल्लेख आहे. वैदिक वाङ्मयात धार्मिक विधींमध्ये आणि रोजच्या व्यवहारात विविध प्रकारच्या मांसाचे सेवन केले जात असल्याचे उल्लेख असल्याची माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाच्या प्रमुख प्रा. श्रद्धा कुंभोजकर यांनीही दिली.अशोका विद्यापीठातील इतिहासाच्या प्राध्यापक डॉ. उपिंदर सिंग यांच्याशी या संदर्भात ई-मेलद्वारे संवाद झाला. नवीन पुस्तकातील परिच्छेद मांसाहाराचे पुरावे वगळून आणि या युगाला धार्मिकता, शांतता आणि सुसंवादाचे प्रतीक म्हणून सादर करून वैदिक युगाचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न वाटतो. प्राचीन भारतात मांसाहाराचे विपुल ग्रंथीय आणि पुरातत्त्वीय पुरावे उपलब्ध आहेत, असे त्यांनी या संवादात नमूद केले. बालभारतीच्या इयत्ता सहावी ते आठवीच्या इतिहास समितीच्या अध्यक्ष आणि पुरातत्त्वशास्त्रज्ञ शुभांगना अत्रे यांनीही वैदिक काळात मांसाहार नोंदवला गेल्याचे मान्य केले. मात्र, पाठ्यपुस्तकात केलेल्या या बदलाचे समर्थन करताना त्या म्हणाल्या, शेतीची सुरु वात झाल्यानंतर वनस्पती-आधारित अन्न आले आणि तो त्यांच्या आहाराचा मुख्य भाग झाला, तर मांस हादेखील आहाराचा एक भाग होता. संबंधित उल्लेख प्रामुख्याने आहाराबद्दल नव्हते, तर ते संस्कृती आणि संस्कृतीच्या प्रगतीबद्दल होते. त्यामुळे लेखकांनी त्याचा उल्लेख केला नाही. हडप्पा संस्कृतीच्या प्रकरणात मांसाचा उल्लेख आहे.

## डोंगरावरून उडी घेउन तरूणाची

त्याला समजावण्याचे प्रयत्न सुरू होते. या बाबत वाळूज एमआयडीसी पोलीस आणि महापालिका अग्निशामक दलालाही नागरिकांनी कळवले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून अग्निशामक दलाच्या जवानांनी कुणालला वाचवण्यासाठी डोंगराच्या पायथ्याशी सुरक्षेची मोठी जाळी पकडून ठेवली. मात्र तो सातत्याने दिशा बदलत होता. त्यामुळे तो जाळीवर पडेलच याची शाश्वती नव्हती. त्यामुळे मुरलीधर हे त्याच्या दिशेने त्याला विनवण्या करत कड्यावर गेले, त्याचवेळी कुणालने डोंगरावरू न उडी घेतली.कड्यावरू न कोसळताना पाहून त्याला पकडण्यासाठी मुरलीधर धावले, पण त्यांचाही तोल गेला. ते भयंकर दृश्य पाहून संगिता यांनीही दोघांच्या पाठोपाठ उडी घेतली, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. खडकावर आदळल्याने तिघांनाही गंभीर दुखापत होउन, डोक्याला मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने मृतदेह खदाणीतून बाहेर काढले आणि रु ग्णवाहिकेतून उत्तरीय तपासणीसाठी घाटी रु ग्णालयात पाठवले.

## सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या घरी

उर्फ बंटी बाळकृष्ण वाकपांजर (वय २३, रा. शिलोरी), अक्षय बाळू जुनघरे (वय ३१, रा. नवसारी) व आकाश उर्फ पख्या सुरेश घुर्वे (रा. अमरावती) यांना अटक केली आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आले.

तपास पथकाने पारंपरिक तपासासोबतच तांत्रिक तपासावर भर दिला. सुमारे ८० सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. तसेच २१० कॉल डिटेल रेकॉर्ड्सचे बारकाईने विश्लेषण करण्यात आले. गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे सापळा रचून प्रथम ४ आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडे सखोल चौकशी केल्यानंतर टोळीतील इतर २ साथीदारांनाही अटक करण्यात आली.श्रीरंग चंद्रचूड रत्नपारखी,प्रतीक संतोष वारसे,आकाश उर्फ कोबरा विनोद कंगाले,साहिल उर्फ बंटी बाळकृष्ण वाकपाजर, अक्षय बाळू जुनघरे,आकाश उर्फ पख्या सुरेश घुर्वे यांना ताब्यात घेतले.त्यांच्याकडून ६७.०२ ग्रॅम दागिने, ७६ हजार ७०० रुपये रोख, ३ वाहने आणि ५ मोबाईल हॅंडसेट असा एकूण ११ लाख २२ हजार ६८६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्राथमिक तपासात ही टोळी बंद असलेल्या घरांची रेकी करून संधी साधून चोरीच्या घटना घडवत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि एसडीपीओ माधव गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पीआय अशोक लांडे, एपीआय संतोष गुर्जर, पीएसआय सागर हटवार, पीएसआय अजय आक्रे, परतवाडा ठाण्याचे ठाणेदार अजय आकरे यांच्यासह एलसीबी, परतवाडा पोलीस ठाणे आणि सायबर सेलच्या पथकाने पार पाडली.

## बालिकेवर अत्याचार करणाऱ्या

आरोप सिद्ध करण्यासाठी एकूण १० साक्षीदारांचे जबाब न्यायालयात नोंदवण्यात आले. न्यायालयाने पीडिता आणि इतर साक्षीदारांचे साक्षीपुरावे विश्वासार्ह मानून आरोपीला दोषी ठरवले.न्यायालयाने आरोपीला विविध कलमांखाली २० वर्षांच्या सक्त कारावासाची शिक्षा सुनावली. यासोबत १८ हजार रुपये दंड ही ठोठावला. दंड न भरल्यास अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.या खटल्यात पोलीस पैरवी अधिकारी पुरुषोत्तम माकोडे आणि अर्चना इंगळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## रामेश्वर चव्हाण यांची

शिंदे गटाची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाल्याचे मानले जात आहे. आगामी काळात शहरातील विकासकामांना गती देण्यासाठी सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.या कार्यक्रमाला दर्यापूर तालुक्यातील शिवसेना शिंदे गटाचे पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. रामेश्वर चव्हाण यांच्या पुन्हा निवडीमुळे शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मेळघाटात ऊबदार आणि

अजय गिरगावकर, दिनेश भुतडा, नितीन कोळी, अजय सदन, नानाजी चौधरी, कैलास लड्ढा, विनोद डागा, संजय लड्ढा, महेश बजाज, विजय भाजपाले, डॉ. सुरुची काकडे, डॉ. रवींद्र कडू, 'संजीवनी महिला व बालकल्याण संस्था' आणि सोनल आनंद ढगे यांचे आर्थिक सहकार्य लाभले. 'साद चिखलदरा' ही संस्था २००९ पासून मेळघाटातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि कौशल्य विकासासाठी सातत्याने कार्यरत आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रवींद्र कडू यांनी स्वतःच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यास सुरुवात केली होती. त्यांच्या या उपक्रमातून प्रेरणा घेऊन आज अनेक दाते पुढे येत असून दरवर्षी 'उबदार स्पर्श' अभियानाद्वारे २०० ते ३०० विद्यार्थ्यांपर्यंत मदत पोहोचवली जात आहे.मेळघाटातील कडाक्याच्या थंडीत आणि प्रतिकूल हवामानात विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकावी, या उद्देशाने हे अभियान राबवले जाते. या अभियानाअंतर्गत मडकी, माखला, नागुढाणा आणि बबईढाणा येथील जिल्हा परिषद शाळांमधील इयत्ता १ ली ते ५ वीच्या विद्यार्थ्यांना मदत देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उपस्थितांचा दांडगा प्रतिसाद यामुळे कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## गुरुदेवनगरात युवकाची

विशेष म्हणजे २० ऑगस्ट रोजीच शुभमचा वाढदिवस होता. वाढदिवसाच्या दिवशीच त्याचा जीवनप्रवास संपल्याने कुटुंबीयांसह मित्रपरिवार आणि संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ऐन तरुण वयात घडलेल्या या दुर्दैवी घटनेने गुरुदेव नगर परिसरावर शोककळा पसरली आहे.शुभमच्या पश्चात आई, वडील, एक बहीण तसेच मोठा आप्तपरिवार आहे. घरातील तरुण आधारवड अचानक निघून गेल्याने राऊत कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.कुटुंबीयांचा आक्रोश पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले.शुभमने हे टोकाचे पाऊल नेमके कोणत्या कारणातून उचलले, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## जुगार खेळणाऱ्या ९

अमरावती), रूपेश मारोतराव बोराळकर (वय ३७ वर्षे,रा.डोंगरयावली, ता.मोर्शी,जि.अमरावती), मोहन मुरलीधर मोहोड(वय ३६ वर्षे,रा. डोंगरयावली,ता.मोर्शी, जि.अमरावती.) शरद मधुकर माकोडे (वय ३७ वर्षे,रा.डोंगरयावली,ता. मोर्शी,जि.अमरावती),सागर विजयसिंग गहलोत (वय ३२ वर्षे,रा.सालबर्डी, ता.मुलताई,जि.बैतूल, मध्यप्रदेश),निलेश बाबाराव इंगोले (वय ३५ वर्षे,रा.डोंगरयावली,ता. मोर्शी,जि.अमरावती), शेख नईम शेख अहमद (वय ३४ वर्षे,रा.सालबर्डी, ता.मोर्शी,जि.अमरावती), योगेश राजेश देशमुख (वय २७ वर्षे,रा. डोंगरयावली,ता.मोर्शी, जि.अमरावती), आकाश रामदास खातरकर (वय ३२ वर्षे,रा.सालबर्डी,ता. मुलताई,जि.बैतूल,मध्य प्रदेश) असे असून काही इसम घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाले. मोर्शी पोलीस त्यांचा शोध घेत आहे. सदर प्रकरणी ताब्यात घेण्यात आलेल्या इसमांविरुद्ध कलम १२(अ),महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात ग्रेड पो.उप.नि.सुरेश कांबळे यांच्या नेतृत्वाखाली स्वप्निल बायस्कर,छत्रपती करपते, अथर्व कोहळे,वैभव ठाकरे यांनी केली.

## शुन्य वीज अपघाताचे

अखंडित व दर्जेदार वीज पुरवठ्यासाठी कटिबद्ध राहण्याची सूचनाही त्यांनी केली. यावेळी मुख्य अभियंता दिलीप दोडके (अमरावती), दत्तात्रय बनसोडे (अकोला), अधीक्षक अभियंता दिपक देवहाते व राजेश घाटोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संचालक पवार यांनी मानव संसाधन विभागाची सविस्तर आढावा बैठक घेतली. व्यवस्थापनाच्या विविध कल्याणकारी योजना प्रत्येक कर्मचाऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी तत्परतेने काम करण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. तसेच कर्मचाऱ्यांचे सर्व प्रलंबित दावे, पदोन्नती पॅनल्स आणि शिस्तभंग कारवाईशी संबंधित प्रकरणांचा निर्धारित वेळेत वेगाने निपटारा करण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या.

महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना वीज सेवेशी निगडीत काम करतांना त्यांचे मनोधैर्य उंच राखण्याकरीता आणि कर्मचाऱ्यांच्या सर्व समस्या निकाली काढून सुविधांचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहचविण्याकरीता अमरावती परिमंडळ मानव संसाधन विभामार्फत उपलब्ध करून दिलेल्या विशेष व्हॉट्स एप सेवेचा शुभारंभ संचालक पवार यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.संचालक (मानव संसाधन) यांचे तांत्रिक सहाय्यक डॉ.संतोष पाटणी यांनी कार्यक्रमा मागची भूमिका मांडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख यांनी केले. सुत्रसंचालन व्यवस्थापक विकास बांबल यांनी, तर आभार उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर यांनी मानले. या कार्यक्रमला कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे, विजयकुमार कासट, संजय शृंगारे, रविंद्र वांदिले, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी निशिकांत राऊत, व्यवस्थापक कल्पना भुले यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## राजेश बेठेकर मृत्यू प्रकरणी

केला आहे. यामुळेच राजेशचा मृत्यू झाल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

राजेशच्या मृत्यूला शाळा प्रशासन जबाबदार असल्याचे सांगत कुटुंबीयांनी संचालकांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली आहे. यामुळे पोलीस ठाण्यात काही काळासाठी तणाव निर्माण झाला होता. शाळेच्या संपूर्ण कार्यपद्धतीची चौकशी करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी घटनेची नोंद घेतली असून पुढील चौकशी सुरू केली आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, मृत्यूचे नेमके कारण आणि शाळा प्रशासनाची भूमिका याबत सखोल तपास केला जाईल. वैद्यकीय कागदपत्रे, शाळेचे रेकॉर्ड आणि संबंधित व्यक्तींचे जबाब नोंदवले जातील.या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली असून विविध सामाजिक संघटना आणि नागरिकांनीही या प्रकरणात निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.दरम्यान, राजेशच्या कुटुंबीयांनी न्याय मिळेपर्यंत लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. 'आम्हाला फक्त न्याय हवा आहे. शाळेने वेळेत लक्ष दिले असते तर आमचा मुलगा आज जिवंत असता,' अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.या प्रकरणामुळे महर्षी पब्लिक स्कूलच्या प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. आता पोलिसांच्या चौकशीतून नेमके काय निष्पन्न होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आवास योजनेतील

कामांचे पैसे गळप गेले आहे. मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांना मिळून आलेल्या रोजगार हमी मधील ९० दिवसाचे कामाचे पैसे मजुरांच्या खात्यात न टाकतात रोजगार सेवकांनी आपल्या हितसंबंधी व्यक्तीच्या खात्यात टाकले अशी शंका आहे. यामुळे घरकुल ,विहीर, गोठा या सर्व लाभार्थी या योजनेच्या लाभापासून अद्यापही वंचित आहे. या प्रकरणाची चौकशी करून गावकऱ्यांना न्याय देण्याची मागणी केली आहे. यावेळी अलका समरित,राजेंद्र घोंगडे, प्रकाश डुकरे, मंगेश लुंगे, संदीप समरित, राहुल लुंगे, राजेश समरित, प्रफुल लुंगे, श्याम कडू आदि उपस्थित होते.

## बडनेराचे जय हिंद चौक

ज्याची नोंद पोलीस दप्तरी आहे. असे अनेक लहान-मोठे अपघात येथे सतत होत असतात.त्यातच दर सोमवारी येथे मोठा आठवडी बाजार भरतो, जिथे खरेदीसाठी हजारो लोकांची आणि बाहेरगावच्या नागरिकांची तुफान गर्दी असते. एवढ्या गर्दीच्या दिवशी आणि संवेदनशील ठिकाणीसुद्धा एकही वाहतूक पोलीस नसल्याने सोमवारी वाहतुकीचा प्रचंड बोजवारा उडत आहे.अशीच गंभीर परिस्थिती बस डेपो परिसराची झाली आहे. डेपोजवळ दोन्ही बाजूंना हजारो नागरिकांची दाट वस्ती आहे. स्थानिक रहिवासी, शाळकरी मुले आणि वृद्धांना दैनंदिन कामासाठी हा मुख्य रस्ता ओलांडूनच जावे लागते. मात्र, डेपोजवळही वाहतूक पोलीस नसल्याने वाहने भरधाव वेगाने धावत आहेत. त्यामुळे रस्ता ओलांडताना नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत धरून चालावे लागत आहे.

**नागरिकांमध्ये तीव्र संताप**-गेल्या १५ दिवसांपासून या दोन्ही पॉईंटवर एकही कर्मचारी हजर नसल्याने वाहतुकीचे पूर्ण खोबरे झाले आहे. 'प्रशासन एखाद्या मोठ्या अपघाताची किंवा जीवितहानीची वाट पाहत आहे का? जर या पॉईंट्सवर काही अघटित घडले किंवा कोणाचा जीव गेला, तर त्याची जबाबदारी पोलीस प्रशासन घेणार का?' असा थेट प्रश्न स्थानिक नागरिक विचारत आहेत. ?वाहतूक शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन जय हिंद चौक आणि बस डेपो या दोन्ही पॉईंट्सवर पूर्ववत कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी जोरदार मागणी बडनेरावासीयांकडून केली जात आहे.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
[illegible] दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

[illegible]

जाहीरनामा/[illegible]

[illegible]

आदेशानुसार,
[illegible]

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, [illegible] प्रशासकीय इमारत, [illegible] अमरावती,
अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

[illegible] 129/19/2026

[illegible]

ही नोटीस [illegible] सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती [illegible]

[illegible]
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

**जाहीर नोटीस**

श्री.अंकुश अजयराव देशमुख [illegible]

[illegible]

सही/-
[illegible]

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय

[illegible]

जाहीरनामा

[illegible]

– विरुद्ध –

[illegible]

आदेशानुसार,
[illegible]

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार अमरावती यांचे न्यायालय
जन्म/मृत्यू बाबत जाहीरनामा

[illegible]

अर्जदार श्री.मनोज [illegible]
रा.किशोर नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
– विरुद्ध –
गैरअर्जदार- निबंधक जन्म मृत्यू, आरोग्य विभाग,
महानगर पालिका, अमरावती, ता.जि.अमरावती

[illegible]

आदेशानुसार,
तहसीलदार तथा तालुका
दंडाधिकारी, अमरावती

**जाहीर नोटीस**

[illegible]

सही/-
[illegible]

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# धोकादायक इमारतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

## शिवसेनेच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाची धावपळ

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

येथील नगर परिषद शाळा क्रमांक चारच्या धोकादायक इमारतीचा प्रश्न अखेर प्रशासनाच्या गांभीर्याने चर्चेत आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी शाळेच्या इमारतीची प्रत्यक्ष पाहणी करून सद्यस्थितीचा आढावा घेतला. शाळेचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, इमारत धोकादायक असल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. मात्र, हा गंभीर अहवाल समोर आल्यानंतरही विद्यार्थ्यांसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात न आल्याने पालकांमध्ये चिंता व्यक्त होत होती.



दरम्यान, धोकादायक इमारतीत विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालून शाळा सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला होता. निवासी उपजिल्हाप्रमुख सचिन परळीकर, विधानसभा प्रमुख बंडू वैद्य, तालुका प्रमुख अर्जुन भीमराव सुर्वे, शहर प्रमुख निखिल इंगोले, भागवत शिंदे, शिवा सावके, युवासेना शहर प्रमुख ओम इंगळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा उपस्थित करत प्रशासनाकडे पाठपुरावा केला.

यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी नगर परिषद शाळा क्रमांक चारला भेट देऊन इमारतीची पाहणी केली. इमारतीची झालेली पडझड, सद्यस्थिती आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रशासनाकडून माहिती घेण्यात आली. स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये इमारत धोकादायक असल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही पर्यायी वर्गखोल्यांची व्यवस्था न करणे हा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी संबंधित गंभीर विषय आहे, असे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. प्रशासनाने केवळ पाहणी न करता तातडीने विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली.

दरम्यान, शिवसेनेच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर नगर परिषद प्रशासनाने हालचाली सुरू केल्या असून, येत्या सोमवारपासून विद्यार्थ्यांसाठी पर्यायी वर्गखोल्यांची व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या पाहणीनंतर प्रशासन कामाला लागल्याचे दिसून येत आहे. मात्र, पर्यायी व्यवस्था करताना विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक व मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात का, याकडे आता पालकांचे लक्ष लागले आहे.

# नीती आयोग उपाध्यक्षांनी जाणून घेतल्या आकांक्षित जिल्ह्यातील समस्या

## धार्मिक-वन पर्यटन, कॅन्सर केंद्र, महिला बचत गट व उद्योगांना चालना मिळण्याची अपेक्षा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आकांक्षित जिल्ह्यांच्या पत्रकारांच्या दिल्ली अभ्यास दौऱ्यात वाशिम जिल्ह्यातील विविध समस्या आणि विकासाच्या संधींचे मुद्दे नीती आयोगाचे उपाध्यक्ष अशोक कुमार लाहिरी यांच्यासमोर मांडण्यात आले. सव्वादोन तासांच्या बैठकीत वाशिमसह गडचिरोली, नंदुरबार व धाराशिव जिल्ह्यांतील १२ पत्रकार सहभागी झाले.

वाशिम जिल्ह्याकडून पत्रकार सुनील कांबळे, प्रमोद लक्रस व दत्ता महल्ले यांनी जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित महत्त्वाचे प्रश्न निदर्शनास आणून दिले. वाशिमचे धार्मिक महत्त्व लक्षात घेता धार्मिक व वन पर्यटनाचा एकत्रित विकास करून स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. जिल्ह्यात कॅन्सरचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन स्वतंत्र कॅन्सर तपासणी केंद्राची गरजही मांडण्यात आली.

यावेळी वाशिमच्या महिला बचत गटांनी तयार केलेली उत्पादने नीती आयोगाचे उपाध्यक्ष अशोक कुमार लाहिरी यांना भेट देण्यात आली. बैठकीला प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोच्या अधिकारी जयदेवी पुजारी, श्रीयांका चटर्जी तसेच नीती आयोगाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्याच्या विकासाच्या मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाल्याचे पत्रकारांनी सांगितले.



### उद्योगांसाठी विशेष सवलतींची अपेक्षा

आकांक्षित जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना प्रोत्साहनपर भत्ता, विकास योजनांच्या प्रभावी निरीक्षणासाठी मनुष्यबळ वाढविणे आणि नवीन उद्योगांना विशेष सवलती देण्याची मागणी करण्यात आली.

### शेतकरी उत्पादक कंपन्यांना बळ देण्याची अपेक्षा

जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रक्रिया, मूल्यवर्धन, पॅकेजिंग व बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रोत्साहन देण्याचा मुद्दा मांडण्यात आला. यामुळे शेतमालाला योग्य दर मिळण्यासोबतच स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीला चालना मिळू शकते, असे निदर्शनास आणून देण्यात आले.

### बचत गटांच्या उत्पादनांना मिळावी बाजारपेठ

शेतकरी महिला बचत गट व 'उमेद'च्या महिला बचत गटांनी तयार केलेल्या चिया चॉकलेट, लाडू, हळद पावडर, इडली व ढोकळा पीठ या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळवून देण्याची मागणी करण्यात आली. हळद प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.

# राजीव गांधींच्या दूरदृष्टीमुळे भारताने तंत्रज्ञान क्षेत्रात घेतली मोठी झेप - माणिकराव ठाकरे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांची जयंती वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने २० ऑगस्ट रोजी स्थानिक शासकीय विश्राम भवन येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी काँग्रेस पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा गोवा राज्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे यांच्या हस्ते स्वर्गीय राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



यावेळी मार्गदर्शन करताना माणिकराव ठाकरे म्हणाले की, आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (ैद) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास मोठ्या वेगाने होत आहे. मात्र, भारतात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासाची दूरदृष्टी स्वर्गीय राजीव गांधी यांनी त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळातच दाखवून दिली होती. देशाला आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात पुढे नेण्यासाठी त्यांनी घेतलेले निर्णय आणि केलेले प्रयत्न अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आजची युवा पिढी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जगाच्या पाठीवर भारताचे नाव उंचावण्यासाठी सक्षम झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजूभाऊ चौधरी होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस ॲड. दिलीपराव सरनाईक, वाशिम जिल्ह्यातील आमदार अमित झनक यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नवनियुक्त पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नव्याने घोषित करण्यात आलेल्या कार्यकारिणीतील नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्ती प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पदाधिका-यांना नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात आली.

काँग्रेस पक्षाची विचारसरणी, संविधानिक मुल्ये आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून संघटन मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचे आवाहन नियुक्त पदाधिकाऱ्यांना करण्यात आले.

# वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय किटचे वाटप

**रिसोड :** माजी खासदार तथा माजी मंत्री अनंतराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद शाळा, रिसोड येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे किट वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. नगरसेवक सागर डांगे, नगरसेवक मयूर नकवाल, धनंजय मनवतकर आणि मंगल खिल्लारे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे किट वितरित करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# शाडू मातीपासून साकारूया पर्यावरणपूरक गणराय

## मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळातर्फे निःशुल्क कार्यशाळेचे आयोजन

**वाशिम :** गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाला पर्यावरण संवर्धनाची आणि संस्कारांची सुंदर जोड देण्याच्या उद्देशाने मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळ, वाशिम यांच्या वतीने शहरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क शाडू माती गणेशमूर्ती प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळ, मंत्री पार्क, वाशिम येथे आयोजित करण्यात आली आहे. 'कलेतून संस्कार आणि संस्कारातून पर्यावरण संवर्धन' या




संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देतानाच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची जाणीव त्यांच्या मनात रुजविण्याचा हा उपक्रम आहे. शाडू मातीपासून स्वतःच्या हातांनी गणरायाची मूर्ती साकारण्याचा आनंद विद्यार्थ्यांना मिळावा, तसेच 'माझा गणपती, माझ्या हातांनी' या भावनेतून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची चळवळ अधिक व्यापक व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. वाशिम शहरातील सर्व शालेय विद्यार्थ्यांनी तसेच गणेशमूर्ती साकारण्याची आवड असलेल्या विद्यार्थ्यांनी या निःशुल्क कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन कलात्मकतेसोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश आत्मसात करावा, असे आवाहन मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष मनीष मंत्री यांनी केले आहे. कार्यशाळेसाठी आयोजकांकडून शाडू माती ची व्यवस्था करण्यात आली आहे व तसेच सहभागी विद्यार्थ्यांनी सोबत पाण्याची बॉटल, हार्डबोर्ड/पॅड आणि एक ताट आणणे आवश्यक आहे.

'परंपरेला पर्यावरणाची साथ देऊया, कलेच्या माध्यमातून संस्कार रुजवूया आणि आपल्या हातांनी पर्यावरणपूरक गणराय साकारूया!' असा संदेश देत मंत्री पार्क गणेशोत्सव मंडळाने सर्व विद्यार्थी व पालकांना या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# वाशिममध्ये उद्या निरंकारी रक्तदान शिबिराचे आयोजन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

संत निरंकारी मिशनच्या सद्गुरू माता सुदीक्षाजी महाराज यांच्या असीम कृपेने संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने वाशिम येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत हे शिबिर संत निरंकारी सत्संग भवन, लाखाळा, वाशिम येथे होणार आहे.

या रक्तदान शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून खासदार संजय देशमुख,आमदार श्याम खोडे, पोलीस अधीक्षक नितेश खाटमोडे, स्वामी किशन महाराज करंजखेड, मनीष मंत्री, उपाध्यक्ष राजू भांदुर्गे. निवासी जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे , जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे ,माजी आमदार विजयराव जाधव. समाज सेवक वसंतराव धाडवे नगराध्यक्ष अनिल केंदळे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन ही सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी आध्यात्मिक संस्था असून, दरवर्षी देशभरात विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते. आतापर्यंत मिशनच्या माध्यमातून ९१७४ रक्तदान शिबिरांचे आयोजन करून १५ लाख युनिट्स पेक्षा जास्त रक्त संकलित केले आहे यामध्ये एका दिवसात ७० हजार लोकांनी रक्तदान करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये संत निरंकारी मिशनचे नाव नोंदविल्या गेले आहे मिशनच्या वतीने देशात असणारे विदेशात सुद्धा रक्तदान शिबिराच्या आयोजन करण्यात येते. मानवतेच्या कल्याणासाठी जात-पात, वर्ण-वंश, भाषा, प्रांत तसेच धर्म-संप्रदायाच्या नावावर असलेले भेदभाव दूर करून मानवतेची सेवा, मानव एकता आणि जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचा संदेश संत निरंकारी मिशनकडून दिला जातो. या सामाजिक उपक्रमात नागरिकांनी, मिशन परिवारातील सदस्यांनी तसेच नातेवाईकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान करावे, असे आवाहन संत निरंकारी मंडळ, वाशिम यांच्या वतीने करण्यात आले आहे. विशेष म्हणजे सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम सातत्याने पुढे जात आहे, ज्यामध्ये रक्तदानाबरोबरच स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, आणि आपत्ती व्यवस्थापनासारखे उपक्रमही समाविष्ट आहेत.


**जाहीर सूचना**

**दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे.**

**जुने नाव :** कौशल्या महादेव तराळे रा. अंत्रज ता. खामगाव जि. बुलढाणा हे नाव लग्न आधीचे आहे.

**सध्याचे नाव :** कौशल गजानन धोत्रे रा. चतारी ता. पातूर जि. अकोला हे नाव लग्नानंतरचे आहे. दोन्ही नावाची व्यक्ती मी एकाच आहे. शेत सर्वे नंबर २६० , शिवार रोहणा ता. खामगाव जि. बुलढाणा माझा शेत असून, मी एकटी वारस आहे. त्यामुळे सातबारावर माझे लग्नानंतरचे नाव टाकण्यात यावे,

**पत्ता :** कौशल गजानन धोत्रे
रा. महादेव मंदिर जवळ चतारी ता. पातूर जि. अकोला


# भोकर-काळेगाव रस्ता प्रकरणात उपअभियंता, कनिष्ठअभियंत्याला कारणे दाखवा नोटीस

## २४ ऑगस्टच्या आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनाची धावपळ

- तक्रारदाराचा संताप, अखेर उपमुख्य कार्यकारी अधिका-यांच्या सहीने नवे पत्र
- चौकशी अहवालानंतर कारवाईला विलंब ; 'नोटीस की केवळ औपचारिकता ?'
- जिल्हा परिषद आवारात दिवसभर चर्चेला उधाण

■ प्रतिनिधी | अकोला ■

**तेल्हारा तालुक्यातील बहुचर्चित भोकर-काळेगाव रस्ता व लहान पूल बांधकामातील कथित अनियमिततेच्या प्रकरणाला शुक्रवारी नवे वळण मिळाले. मोठ्या विलंबानंतर अखेर जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली. मात्र, या नोटीसच्या प्रक्रियेतच प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. विशेष म्हणजे, ज्या प्रभारी कार्यकारी अभियंता प्रकाश इंगळे यांच्या भूमिकेवरच तक्रारी आणि चौकशी अहवालाच्या अनुषंगाने प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे, त्यांच्याच सहीने सुरुवातीला तक्रारदार अरविंद पाटील यांना पत्र देण्यात आल्याने प्रकरण अधिकच तापले.**



तक्रारदार पाटील यांनी २४ ऑगस्टपासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा दिल्यानंतर प्रशासनाने अखेर हालचाल सुरू केली. मात्र, ही नोटीस कारवाई म्हणून बजावण्यात आली की उपोषण टाळण्यासाठी केलेला केवळ औपचारिक सोपस्कार, असा सवाल आता जिल्हा परिषद वर्तुळात उपस्थित होत आहे.

भोकर-काळेगाव रस्ता प्रकरणात आता उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांचा खुलासा निर्णायक ठरणार आहे. दहा दिवसांच्या मुदतीत ते काय स्पष्टीकरण देतात, चौकशी अहवालातील आक्षेपांना काय उत्तर देतात आणि प्रशासन त्या खुलाशाची कोणत्या पद्धतीने छाननी करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, २४ ऑगस्टच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर अचानक झालेली प्रशासनाची हालचाल आणि त्यानंतर पहिल्या पत्रातील गफलत यामुळे या संपूर्ण प्रकरणाभोवती संशयाचे ढग अधिकच गडद झाले आहेत. नोटीस बजावली म्हणून प्रकरणावर पडदा पडणार नाही; चौकशी अहवालातील आक्षेपांचे काय, जबाबदारी कोणाची आणि सार्वजनिक निधीच्या संभाव्य नुकसानीची भरपाई कोण करणार—या प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत भोकर-काळेगाव रस्ता प्रकरण शांत होण्याची चिन्हे दिसत नाहीत.

### २४ ऑगस्टच्या उपोषणाचा धसका?

भोकर-काळेगाव रस्ता प्रकरणात त्रयस्थ तांत्रिक तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरही तातडीने कारवाई झाली नाही. चौकशी अहवालात कामाच्या विविध बाबींवर आक्षेप नोंदविण्यात आल्याचा दावा तक्रारदाराकडून करण्यात आला आहे. त्यानंतरही प्रशासनाकडून केवळ खुलाशांच्या पातळीवर हालचाली सुरू असल्याने पाटील यांनी २४ ऑगस्टपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला. यामुळे शुक्रवारी अखेर प्रशासनाने संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याचे समोर आले. मात्र, कारवाईचा हा मुहूर्त उपोषणाच्या तीन दिवस आधीच का आला? हा प्रश्न आता चर्चेचा विषय बनला आहे. 'उपोषणाची घोषणा झाली नसती तर नोटीस कधी निघाली असती?' असा सवालही जिल्हा परिषद आवारात दबक्या आवाजात विचारला जात होता.

### 'आपलेच दात, आपलेच ओठ'ची चर्चा!

या प्रकरणात सर्वाधिक चर्चेत आलेला मुद्दा म्हणजे तक्रारदाराला देण्यात आलेले पहिले पत्र. संबंधित प्रकरणातील आरोपांच्या पार्श्वभूमीवर प्रभारी कार्यकारी अभियंता प्रकाश इंगळे यांच्या सहीनेच अरविंद पाटील यांना पत्र देण्यात आले. त्यामध्ये नोटीस बजावण्यात आल्याची माहिती देत २४ ऑगस्टचे उपोषण स्थगित करण्याची विनंती करण्यात आली.ष्हे पत्र पाहताच पाटील यांनी आक्षेप घेतला. ज्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरच प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यांच्याच सहीने तक्रारदाराला कारवाईची माहिती देणे कितपत योग्य? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

यानंतर जिल्हा परिषदेत काही काळ चांगलाच गोंधळ निर्माण झाला. प्रशासनाच्या लक्षात ही बाब आल्यानंतर अखेर या प्रकरणात दुरुस्ती करण्यात आली आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी लोखंडे यांच्या सहीने तक्रारदाराला नवीन पत्र देण्यात आले. यामुळे 'आपलेच दात, आपलेच ओठ' अशी उपरोधिक चर्चा जिल्हा परिषद आवारात रंगली. चौकशी, आरोप आणि कारवाईची प्रक्रिया एकाच यंत्रणेतील अधिकाऱ्यांच्या भोवती फिरत असल्याने निष्पक्षतेचा प्रश्न निर्माण होत नाही का? असा सवालही उपस्थित करण्यात येत आहे.

### चौकशी अहवाल गंभीर; मग जबाबदारी निश्चित कधी?

तब्बल १ कोटी ६४ लाख ६९ हजार रुपयांच्या भोकर-काळेगाव रस्ता व लहान पूल बांधकामाबाबत त्रयस्थ तांत्रिक तपासणी करण्यात आली आहे. तक्रारदाराच्या दाव्यानुसार, या तपासणीमध्ये कामाची गुणवत्ता, माप पुस्तिकेतील नोंदी, आरसीसी पाईपची संख्या, साहित्य चाचणी, मंजूर कामाच्या व्याप्तीतील बदल, गटारांचा निचरा आणि प्रत्यक्ष कामाच्या स्थितीसह विविध बाबींवर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. त्यामुळे आता केवळ 'नोटीस बजावली' एवढ्यावर प्रकरण संपणार की चौकशी अहवालातील प्रत्येक आक्षेपाची शहानिशा करून जबाबदारी निश्चित केली जाणार, हा खरा प्रश्न आहे. सार्वजनिक निधीतील कोट्यवधी रुपयांच्या कामात अनियमिततेचे आरोप झाले, तांत्रिक तपासणी झाली, अहवाल आला आणि त्यानंतर नोटीसही बजावली; मग प्रत्यक्ष कारवाईसाठी आणखी किती प्रतीक्षा? असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

### उपोषण रोखण्यासाठीची 'डेडलाइन' की कारवाईची सुरुवात?

प्रशासनाने तक्रारदाराला दिलेल्या नव्या पत्रामुळे आता आणखी एक प्रश्न निर्माण झाला आहे. दहा दिवसांचा खुलासा कालावधी देऊन तक्रारदाराने उपोषण स्थगित करावे, अशी विनंती करण्यात आली आहे. मात्र, उपोषण स्थगित झाले म्हणजे प्रकरण संपले असे मानले जाणार का? तक्रारदाराच्या मागण्या केवळ नोटीस बजावण्यापुरत्या मर्यादित नाहीत. दोषी आढळणाऱ्यांवर प्रशासकीय तसेच आवश्यक ती कायदेशीर कारवाई आणि सार्वजनिक निधीच्या वापराबाबत जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे आता प्रशासनासमोर खरी कसोटी आहे ती नोटीस काढण्याची नव्हे, तर तिच्यावर ठोस निर्णय घेण्याची.

### पहिल्याच पत्राने प्रशासनाच्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

या संपूर्ण घडामोडीत सर्वाधिक बोचरा मुद्दा म्हणजे पहिल्या पत्रावरील सही. तक्रारदाराच्या मते, प्रकरणात चौकशीच्या कक्षेत असलेल्या अधिकाऱ्याच्या सहीनेच त्यांना उपोषण स्थगित करण्याचे पत्र देणे हे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. नंतर ही चूक लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहीने नव्याने पत्र देण्यात आले. मात्र, पहिल्या पत्रामुळे निर्माण झालेला संशय केवळ दुसरे पत्र देऊन दूर होणार का? हा सवाल आता अनुत्तरित आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २६५ ■ शनिवार, २२ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# गरिबांच्या ताटातील घासावर डल्ला; एसआयओसह रेशन दुकानदारावर गुन्हा

## ३१.७७ लाखांच्या कथित गैरव्यवहारानंतर प्रशासनाची मोठी कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** गरिबांच्या ताटातील घासावरच डल्ला मारल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आल्यानंतर वर्धा तहसील कार्यालयातील धान्य पुरवठा विभागातील कथित गैरव्यवहाराला आता फौजदारी कारवाईचे वळण मिळाले आहे. स्वस्त धान्य वितरणातील नियमबाह्य धान्य मंजुरी, सायलेंट आरसी वळती आणि ई-पॉस प्रणालीच्या कथित गैरवापराच्या प्रकरणात निलंबित तालुका पुरवठा निरीक्षण अधिकारी मनिषा माजरखेडे आणि स्वस्त धान्य दुकानाशी संबंधित योगेश भाले यांच्याविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निलंबनानंतर थेट फौजदारी कारवाई झाल्याने पुरवठा विभागात खळबळ उडाली आहे.

नायब तहसीलदार अजय धर्माधिकारी यांच्या तक्रारीवरून अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील कलम ३ व ७ तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३६ (३) अन्वये कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणात प्रशासनाच्या तपासणीत गंभीर अनियमितता समोर आल्याचे तक्रारीत नमूद आहे.

तपासणीनुसार डी. बी. कुंभलवार यांच्या दुकानाच्या ई-पॉस मशीन क्रमांक १५०४००१००२६३ वर नियमबाह्य पद्धतीने शिधापत्रिका वळती करण्यात आल्याचा आरोप आहे. एकूण ६१९ अर्जांपैकी ३३७ अर्ज प्राप्त झाले होते. त्यांची पडताळणी केली असता २५ कार्डधारकांनी शिधापत्रिका वळती करण्यासाठी अर्जच केला नसल्याचे आणि त्यांनी कोणतेही धान्य उचलले नसल्याचे लेखी बयानात स्पष्ट झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. उर्वरित २८२ शिधापत्रिका नेमक्या कोणत्या आधारावर वळती करण्यात आल्या, हा प्रश्न प्रशासनासमोर उभा राहिला आहे.



माजरखेडे यांनी आपल्या लॉगिन आयडीचा वापर करून सायलेंट आरसी वळती केल्याचा गंभीर आरोप तपासणीत करण्यात आला आहे. तसेच एकाच दुकानात मोठ्या प्रमाणात आरसी वळती करून त्यानंतर धान्य उचल झाल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याचेही नमूद आहे.

**३१.७७ लाखांचा कथित धान्य घोटाळा :**

जानेवारी २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संबंधित दुकानाला नियमबाह्य पद्धतीने अतिरिक्त धान्य मंजूर करण्यात आल्याचे तपासणीत समोर आले. गहू, तांदूळ आणि ज्वारीच्या साठ्यात मोठी तफावत आढळल्याने शासनाचे सुमारे २६.८६ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे तपासणी अहवालात नमूद आहे. याशिवाय मार्च ते एप्रिल २०२५ मध्ये नियमबाह्य आरसी वळती केलेल्या कार्डधारकांना अतिरिक्त धान्य वाटप झाल्याने आणखी सुमारे ४.९१ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे एकूण आर्थिक अनियमिततेचा आकडा सुमारे ३१.७७ लाखांवर पोहोचतो.

**नियम डावलून सेल्समनची नियुक्ती**

योगेश भाले यांची संबंधित स्वस्त धान्य दुकानात सक्षम अधिकाऱ्याची परवानगी न घेता विक्री प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. माजरखेडे यांनी पदाचा गैरवापर करून नियमबाह्य पद्धतीने नियुक्ती केल्याचे प्रशासनाच्या कागदपत्रांत नमूद आहे. दुकानातील कमिशनची रक्कमही संबंधित सेल्समनच्या नावाने जमा केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणात जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी यापूर्वीच माजरखेडे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली होती. आता गुन्हा दाखल झाल्याने प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. पोलिसांकडून या संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू असून दोन्ही आरोपींचा शोध घेतला जात आहे. गरिबांच्या हक्काच्या धान्याच्या वितरणात नेमका किती गैरव्यवहार झाला आणि या प्रकरणामागे आणखी कोणाचे हात आहेत, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे.

---

नीलपंख म्हणे मला वाचवा, वर्धेच्या सौंदर्याला पुन्हा सजवा

# जनमाध्यमच्या बातमीचा इफेक्ट; प्रशासन जागे, झाडाझुडपांच्या साफसफाईला सुरुवात

**वर्धा जनमाध्यम :** शहराच्या सौंदर्याची ओळख असलेल्या पवनारजवळील नीलपंखाच्या दुरवस्थेवर शुक्रवारी वर्धा जनमाध्यमने प्रशासनाचे लक्ष वेधणारी बातमी प्रकाशित केली आणि या बातमीचा इफेक्ट आता प्रत्यक्ष घटनास्थळी दिसू लागला आहे. वृत्ताची दखल घेत प्रशासनाने नीलपंख परिसरातील झाडाझुडपे आणि वाढलेले गवत हटविण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून दुर्लक्षित अवस्थेत असलेल्या नीलपंखाला अखेर मोकळा श्वास मिळू लागला आहे.







फोटो - मोहन गिरडकर वर्धा

नीलपंख म्हणत होता, 'मला वाचवा' प्रशासन म्हणते, 'वर्धेचे सौंदर्य पुन्हा सजवा' काही वर्षांपूर्वी नागपूर-वर्धा मार्गावर पवनारजवळ उभारण्यात आलेले हे भव्य शिल्प वर्धेत प्रवेश करणाऱ्या नागरिकांचे आणि पर्यटकांचे लक्ष वेधून घेत होते. धातूच्या स्क्रॅपपासून कलात्मक पद्धतीने साकारण्यात आलेला नीलपंख वर्धेच्या सौंदर्याची वेगळी ओळख निर्माण करणारा ठरला होता. सेल्फी पॉईंट म्हणूनही या ठिकाणाला मोठी लोकप्रियता मिळाली होती.

मात्र कालांतराने देखभालीकडे दुर्लक्ष झाल्याने नीलपंखाभोवती झाडाझुडपे वाढली. शिल्पासोबत असलेली अक्षरेही हिरवाईच्या आड झाकली गेली. त्यामुळे लाखो रुपये खर्चून उभारलेल्या सौंदर्यस्थळाच्या देखभालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. याच मुद्द्यावर वर्धा जनमाध्यमने शुक्रवारी प्रशासनाचे लक्ष वेधत 'झाडाझुडपांत हरवला वर्धेचा नीलपंख' या आशयाची बातमी प्रसिद्ध केली होती.

या वृत्ताची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेत परिसराच्या साफसफाईला सुरुवात केली आहे. झाडाझुडपे हटविल्यामुळे नीलपंख शिल्प पुन्हा स्पष्टपणे दिसू लागण्याची चिन्हे आहेत. प्रशासनाच्या या तातडीच्या प्रतिसादामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, केवळ साफसफाईपुरतेच न थांबता या परिसराची नियमित देखभाल करण्याची मागणीही पुढे आली आहे.

बातमीचा इफेक्ट दिसला, आता देखभालीचा परिणामही दिसू द्या! शहराच्या प्रवेशद्वारावरील हे आकर्षण पुन्हा सुस्थितीत आणून वर्धेच्या सौंदर्यात भर घालावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. वर्धा जनमाध्यमच्या वृत्तामुळे प्रशासन हलले आणि नीलपंखाभोवतीची झाडाझुडपे हटविण्याची मोहीम सुरू झाली, हे जनमाध्यमांच्या सजग पत्रकारितेचे आणि लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविण्याचे फलित मानले जात आहे.

---

# स्मार्ट मीटरची सक्ती थांबवा; हिंगणघाटात जनआक्रोशाचा एल्गार

## रोहित पवारांच्या नेतृत्वात २४ ऑगस्टला मोर्चा

### शशिकांत शिंदे, अनिल देशमुख, अमर काळे यांची उपस्थिती

**हिंगणघाट, जनमाध्यम :** सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या माथी स्मार्ट मीटर लादण्याच्या निर्णयाविरोधात हिंगणघाटात आता जनआक्रोशाचा आवाज घुमणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सोमवार, २४ ऑगस्ट रोजी आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात भव्य जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, खासदार अमर काळे आणि युवा नेते सलील देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



स्मार्ट मीटरच्या माध्यमातून सर्वसामान्य ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता व्यक्त होत असून, वीज बिलांबाबत नागरिकांमध्ये असलेली नाराजी या मोर्चातून सरकारच्या निदर्शनास आणून दिली जाणार आहे. स्मार्ट मीटरची सक्ती नको, ग्राहकांना दिलासा हवा या मागणीसाठी नागरिक, शेतकरी, व्यापारी, कामगार तसेच पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

मोर्चापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात जनआक्रोश सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर मोर्चाला सुरुवात होईल. विठोबा चौक, मोहता चौक, तुकडोजी पुतळा चौक मार्गे मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. तेथे निवेदन सादवून स्मार्ट मीटरची सक्ती तातडीने थांबविण्याची मागणी केली जाणार आहे.

**वीज ग्राहकांच्या प्रश्नावर रस्त्यावर उतरणार**

स्मार्ट मीटरच्या नावाखाली ग्राहकांच्या खिशावर अतिरिक्त भार पडू नये, अशी भूमिका आयोजकांनी घेतली आहे. केवळ आश्वासने नकोत, तर ग्राहकांना दिलासा देणारा निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येणार आहे.

मोर्चाचे नेतृत्व आमदार रोहितदादा पवार करणार असून शशिकांत शिंदे, अनिल देशमुख, खासदार अमर काळे, सलील देशमुख यांच्यासह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. हिंगणघाटातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जनआक्रोशाची ताकद दाखवावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्धा जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले यांनी केले आहे.

---

# घोराडमध्ये डेंग्यूचा शिरकाव; अस्वच्छतेने नागरिक त्रस्त

## नाल्या तुंबल्या, रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग ; आरोग्य यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील तीर्थक्षेत्र घोराड गावात अस्वच्छतेने गंभीर स्वरूप धारण केले असून, डेंग्यूची लागण झाल्याची माहिती समोर आल्याने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील ठिकठिकाणच्या नाल्या तुंबल्या असून सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने रस्त्यालगत घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून रोगराईला पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

गावात डेंग्यूची लागण झाल्याचे समोर आल्यानंतर आरोग्य विभागाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात आरोग्य यंत्रणेची फारशी हालचाल दिसून येत नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. आरोग्य विभागाचे कर्मचारी गावात नियमितपणे फिरकतात का, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.



घोराडमध्ये रस्त्यांच्या कडेला कचऱ्याचे ढीग, तुडुंब भरलेल्या नाल्या आणि साचलेले सांडपाणी यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. अनेक ठिकाणी सांडपाण्याचे लोट वाहत असल्याने डासांची उत्पत्ती वाढली आहे. शासनाकडून आरोग्याच्या दृष्टीने विविध योजना राबविल्या जात असल्या तरी त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र कागदावरच सुरू असल्याचे चित्र दिसत असल्याची ग्रामस्थांची नाराजी आहे.


आशा सेविकांकडूनही घराघरांत नियमित भेटी दिल्या जात नसल्याच्या तक्रारी आहेत. तसेच काही नागरिकांपर्यंत आयुष्मान भारत कार्ड पोहोचले नसल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे. गावातील वाढता डासांचा प्रादुर्भाव आणि अस्वच्छता पाहता प्रतिबंधात्मक फवारणी, धूरफवारणी, नाल्यांची स्वच्छता आणि सांडपाण्याचा योग्य निचरा करण्याची तातडीची गरज आहे.

डेंग्यूचा प्रसार वाढण्यापूर्वी प्रशासनाने घोराड गावाची पाहणी करून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच आरोग्य व स्वच्छता व्यवस्थेत हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी, अशीही मागणी होत आहे.

---

# वाद मिटविण्याला 'मध्यस्थी'चा हातभार, न्यायव्यवस्था होणार गतिमान

**वर्धा जनमाध्यम :** न्यायालयीन प्रक्रियेला पर्याय नव्हे, तर पूरक व्यवस्था म्हणून मध्यस्थीचा प्रभावी वापर करण्याच्या दिशेने वर्धा जिल्ह्यात महत्त्वाचे पाऊल पडले आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या पुढाकाराने १६ ते २० ऑगस्टदरम्यान घेण्यात आलेल्या ४० तासांच्या मध्यस्थी प्रशिक्षणाला जिल्ह्यातील ४५ अधिवक्त्यांनी स्वयंस्फूर्त प्रतिसाद दिला. प्रशिक्षण घेतलेले अधिवक्ते आता प्रशिक्षित मध्यस्थ म्हणून विविध प्रकरणे परस्पर संमतीने निकाली काढण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. मध्यस्थी व सलोखा प्रकल्प समिती, सर्वोच्च न्यायालय आणि मुख्य मध्यस्थी केंद्र मुंबई यांच्या निर्देशानुसार हा उपक्रम राबविण्यात आला. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष हेमंत बी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राधिकरणचे सचिव संजीव सरदार यांच्या नेतृत्वात प्रशिक्षण पार पडले.



वाद निर्माण झाल्यानंतर प्रत्येक प्रकरणाचा निर्णय न्यायालयातूनच व्हावा, या पारंपरिक पद्धतीला मध्यस्थीमुळे पर्यायी मार्ग उपलब्ध झाला आहे. तटस्थ व प्रशिक्षित मध्यस्थाच्या सहाय्याने दोन्ही पक्ष संवाद साधून परस्पर संमतीने तोडगा शोधतात. मध्यस्थ कोणताही निर्णय लादत नसल्याने पक्षकारांच्या संबंधांमध्येही कटुता निर्माण होण्याची शक्यता कमी होते.

---

# प्रशासनिक भवनाला कुलूप; विद्यार्थ्यांचा संतापाचा ठिय्या

## पोलिस बोलावल्याने आंदोलन अधिक पेटले



**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील प्रशासनिक भवनाची चारही गेट ८ जुलैपासून बंद ठेवण्यात आल्याने विद्यार्थ्यांचा संताप अखेर रस्त्यावर आला. प्रशासनिक कामांसाठी विद्यार्थ्यांना कार्यालयांमध्ये प्रवेश मिळत नसल्याने गुरुवारी विद्यार्थ्यांनी प्रशासनिक भवनासमोर ठिय्या आंदोलन करीत विद्यापीठ प्रशासनाला जाब विचारला.

१९ ऑगस्ट रोजी झालेल्या विद्यार्थी महासभेत प्रशासनिक भवनाची सर्व गेट खुली करणे, प्रशासनिक कामकाज पूर्ववत करणे आणि कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांनी विद्यार्थ्यांशी सार्वजनिक संवाद साधणे, असे ठरले होते. मात्र मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्याने आंदोलन उभारण्यात आले. कॅन्टीन, झेरॉक्स, स्वच्छ पाणी, वॉटर कूलरची स्वच्छता, २४ तास ग्रंथालय, महिला वसतिगृहातील कर्फ्यू, वर्गांसाठी वाहन व्यवस्था, सर्व वसतिगृहांमध्ये मेस, वातानुकूलित वाचनकक्ष, शिक्षकांची कमतरता आणि तक्रारींचे पारदर्शक निवारण अशा प्रश्नांवर विद्यार्थी आक्रमक झाले आहेत.

'प्रश्न विचारले तर पोलिस?' असा सवालही आंदोलक विद्यार्थ्यांनी उपस्थित केला. मागण्यांवर संवाद साधण्याऐवजी प्रशासनाने पोलिस अधिकाऱ्यांना बोलावून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. विभागाध्यक्ष आणि शिक्षकांमार्फत आंदोलनापासून दूर राहण्यासाठी दबाव आणला जात असल्याचेही विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

प्रशासनिक भवनाची गेट तातडीने खुली करावी, कार्यालयीन कामकाज सुरळीत करावे आणि आंदोलनकर्त्यांवर दबाव आणू नये, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. प्रश्न सुटेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

---

# गहू-तांदूळ'चा आवाज रोज घुमतोय; पुरवठा विभाग मात्र झोपेत

## जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करण्याची नागरिकांची मागणी

**सेलू जनमाध्यम :** गहू तांदूळ... गहू तांदूळ...असा आवाज सकाळ होताच मोहल्ल्या-मोहल्ल्यात ऐकू येतो. शासनाच्या स्वस्त धान्य दुकानातून गरीब आणि गरजू नागरिकांना मिळणारे धान्य थेट खरेदीदारांच्या घशात घालण्याचा प्रकार सर्रास सुरू असल्याचा आरोप होत असून, या संपूर्ण व्यवहारावर पुरवठा विभागाचे नियंत्रण नेमके कुठे आहे, असा प्रश्न आता सेलू तालुक्यातून उपस्थित होत आहे. शिधाधारकांकडून धान्य घेणारे आणि ते विकत घेऊन काळ्या बाजारात वळविणारे यांच्यावर कठोर कारवाई झाली, तरच हा धंदा थांबेल, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

विशेष म्हणजे सेलू तालुक्यात धानाची शेती मोठ्या प्रमाणात होत नसतानाही बाजारात मोठ्या प्रमाणावर तांदूळ फिरत असल्याने या धान्याचा स्रोत नेमका कोणता, हा प्रश्न गंभीर बनला आहे. शिधापत्रिकाधारकांना मिळणारा तांदूळ स्वस्त दरात घेऊन पुढे तोच तांदूळ अधिक दराने विकण्याचे जाळे तर सक्रिय नाही ना, याची चौकशी होणे गरजेचे आहे.दि. २० ऑगस्ट रोजी सेलू शहरात टाटा एस वाहन क्रमांक एमएच ३२ एजे २४२६ मधून स्वस्त धान्य दुकानातील तांदळाची संशयास्पद वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याचा दावा शिवसेना सेलू शहराध्यक्ष ओम टवलारे यांनी केला. माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र संबंधित पुरवठा विभागाला माहिती देऊनही तातडीने कारवाई झाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

---

# पिपरी मेघे येथे दारूबंदी पथकाची धडक कारवाई;

## १.१० लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** पिपरी मेघे परिसरात अवैध देशी दारूची वाहतूक व साठवणूक करणाऱ्यावर रामनगर पोलिसांच्या दारूबंदी पथकाने धडक कारवाई केली. या कारवाईत आरोपीकडून देशी दारूसह एक ॲक्टिव्हा मोपेड असा एकूण १ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० ऑगस्ट रोजी दुपारी ३ ते ३.४५ वाजताच्या सुमारास पिपरी मेघे येथे दारूबंदी पथकाने कारवाई केली. यावेळी किसना गजानन काकडे वय २२ वर्षे रा. पिपरी मेघे वर्धा याच्यावर दारूबाबत छापा टाकण्यात आला. आरोपीच्या मालकीच्या होंडा कंपनीच्या ॲक्टिव्हा मोपेडच्या डिक्कीत झाकून ठेवलेली देशी दारू पोलिसांना आढळून आली. कारवाईदरम्यान टँगो पंच ९० एमएलच्या देशी दारूच्या १०० शिश्या जप्त करण्यात आल्या. या दारूची किंमत १० हजार रुपये असून, दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली ॲक्टिव्हा मोपेड अंदाजे १ लाख रुपये किमतीची आहे. त्यामुळे पोलिसांनी एकूण १ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात अप. क्र. ७९१/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ ई व ७७ अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक न करता सूचना पत्र देण्यात आले असून पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहेत.



ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली रामनगर पोलीस ठाण्याच्या ठाणेदार पौर्णिमा राखोंडे यांच्या निर्देशनात दारूबंदी पथकातील अवि. बनसोड, मनोज भोमले, मुकेश वांदिले व विकी अणेराव यांनी केली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पेलेट गन गोळीबार प्रकरणी राहुल गांधींच्या ठिय्या आंदोलनानंतर दिल्ली पोलिसांकडून अखेर FIR दाखल

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**राहुल गांधींनी दिल्ली डीसीपी कार्यालयाबाहेर केलेल्या ठिय्या आंदोलनानंतर, पेलेट गन गोळीबार प्रकरणी दिल्ली पोलिसांनी एफआयआर दाखल केला आहे. २० जुलै रोजी झालेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या मोर्चादरम्यान पेलेट गन गोळीबार प्रकरणी राहुल गांधींनी एफआयआर दाखल करण्याची मागणी करत ठिय्या आंदोलन केले. पोलिसांनी सुरु वातीला एफआयआर दाखल करण्यास टाळाटाळ केल्यानंतर राहुल गांधींनी पेलेट गनने गोळीबार केल्याने जखमी झालेल्या १९ वर्षीय तरु ण आणि त्याच्या कुटुंबियांसह डीसीपी कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन केले.

**जंतर मंतरवर सीजेपीचे आंदोलन**

नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणावरू न दिल्लीत काही दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांनी आंदोलन केलं होतं. या आंदोलनानंतर धर्मेंद्र प्रधान यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा देखील दिला. मात्र, या आंदोलनावेळी विद्यार्थ्यांनी २० जुलै रोजी काढलेल्या मोर्चाला रोखण्यासाठी पोलिसांकडून बळाचा वापर करण्यात आला. पोलिसांनी आंदोलक विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करत अश्रु धुराच्या नळकांड्या फोडल्या होत्या. यावेळी काही विद्यार्थी जखमी देखील झाले होते. यावेळी पोलिसांकडून विद्यार्थ्यांवर कथित पॅलेट गन्सचा वापर करण्यात आल्याचा आरोप आंदोलकांनी आणि विरोधकांनी केला होता. मात्र, हे आरोप सरकार आणि पोलिसांकडून फेटाळून लावण्यात आले होते. मात्र, विद्यार्थ्यांवर कथित पॅलेट गन्सचा वापर करण्यात आल्याच्या प्रकरणात राहुल गांधी यांनी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

**अखेर गुन्हा दाखल-** विद्यार्थ्यांवर कथित पॅलेट गन कोणी चालवली? या



प्रकरणात आतापर्यंत गुन्हा का दाखल झाला नाही? असे अनेक सवाल उपस्थित करत गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी राहुल गांधी हे पीडित विद्यार्थ्यांसह दिल्लीतील संसद मार्ग पोलीस ठाण्यात पोहोचले. जोपर्यंत पोलीस गुन्हा दाखल करत नाहीत, तोपर्यंत पोलीस ठाण्याच्या बाहेर आपण ठिय्या आंदोलन करण्याची भूमिका राहुल गांधी यांनी घेतली. अखेर पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आल्याचे वृत्त इंडियन एक्सप्रेसकडून देण्यात आले आहे.

**लेखी तक्रार केली होती पण-** CJP च्या संसद मोर्चादरम्यान पेलेट गनच्या गोळीबारात जखमी झालेल्या १९ वर्षीय साहिल लोछाब याच्यासह राहुल गांधी यांनी पोलीस उपआयुक्तकार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन केले. राहुल गांधी यांनी दिलेल्या माहितीनुसार, लोछाब यांनी १४ ऑगस्ट रोजी दिल्ली पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली होती, परंतु पोलिसांनी या प्रकरणातील तपास अधिका-याची कोणतीही माहिती देण्यास नकार दिला.

**राहुल गांधी काय म्हणाले?**

लोछाब यांनी १७ ऑगस्ट रोजी ईमेल आणि फोनद्वारे पुन्हा पाठपुरावा केला. मात्र, तरीही तपास अधिका-याचा कोणताही तपशील देण्यात आला नाही, तसेच तक्रार स्वीकारल्याची पोचपावतीही देण्यात आली नाही, असे गांधी म्हणाले. हा एक दखलपात्र गुन्हा असल्याने एफआयआर नोंदवणे बंधनकारक आहे, मात्र दिल्ली पोलीस तसे करत नाहीत, असा आरोपही गांधी यांनी केला.

# रूग्णालयातून नवजात बाळाची चोरी

## योजनांचा लाभ देण्याच्या बहाण्याने महिलेला गुंगारा

**नागपूर** : शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या बहाण्याने बुरखा घातलेल्या महिलेने प्रसूतीनंतर अवघ्या काही तासांच्या नवजात मुलीला तिच्या आजीची नजर चुकवून रु ग्णालयातून पळवून नेल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी डागा स्मृती शासकीय स्त्री रु ग्णालयात घडली. बाळाला घेउन अर्ज करण्याच्या बहाण्याने बाह्य रु ग्ण विभागाच्या दिशेने गेलेली महिला काही वेळातच बेपत्ता झाली. बाळ चोरीला गेल्याचे लक्षात येताच रु ग्णालय प्रशासनाला माहिती देण्यात आली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.



प्रभातशक्ती पाठराबे (३०), रा. गोळीबार चौक, नागपूर या महिलेला बुधवारी प्रसूतीसाठी डागा रु ग्णालयात दाखल करण्यात आले होते. गुरु वारी रात्री साडेबारा वाजताच्या सुमारास तिची सामान्य प्रसूती झाली. तिने एका गोंडस मुलीला जन्म दिला.शुक्रवारी सकाळी ११ ते १२ वाजताच्या दरम्यान बुरखा घातलेली एक अनोळखी महिला पाठवे यांच्या नातेवाइकांकडे गेली. बाळाला विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मदत करण्याचे तिने सांगितले.

योजनांचा लाभ मिळविण्यासाठी अर्ज करणे आवश्यक असल्याचे सांगून तिने कुटुंबीयांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर प्रसूत महिलेसोबत असलेल्या एका वृद्ध महिलेला बाळासह सोबत घेतले. अर्ज करण्याच्या बहाण्याने ती महिला बाळाला घेउन रु ग्णालयाच्या बाह्य रु ग्ण विभागाच्या दिशेने गेली. रु ग्णालयाच्या आतील भागातून सुमारे शंभर फूट अंतरावर गेल्यानंतर अर्ज भरू न येत असल्याचे सांगून तिने वृद्ध महिलेची नजर चुकवली. काही वेळाने बाळासोबत गेलेली महिला परत आली नाही. त्यामुळे पाठवे कुटुंबीयांनी रु ग्णालयाच्या विविध भागांत तिचा आणि बाळाचा शोध घेतला. मात्र महिला कुठेही आढळली नाही. त्यानंतर बाळाला पळवून नेल्याचा संशय बळावला आणि कुटुंबीयांनी रु ग्णालय प्रशासनाला माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेउन डागा रु ग्णालय प्रशासनाने तातडीने पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलिसांकडून रु ग्णालय परिसरातील परिस्थितीची माहिती घेण्यासह महिलेचा शोध सुरू करण्यात आला. नवजात बाळ चोरीला गेल्याची माहिती मिळताच पाठवे कुटुंबीयांचे नातेवाईक मोठ्या संख्येने रु ग्णालयात पोहोचले. त्यांनी रु ग्णालय प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचा-यांना धारेवर धरत घटनेबाबत तीव्र संताप व्यक्त केला. बाळाचा तातडीने शोध घेण्याची मागणी नातेवाइकांनी केली.

# दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलकांची मोठी गर्दी

## आरक्षणासाठी आर्थिक निकष लागू करण्याची मागणी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील जातीनिहाय आरक्षणाच्या विरोधात शुक्रवारी दिल्लीतील जंतरमंतरवर मोठ्या संख्येने लोक एकत्र आले आणि त्यांनी जोरदार निदर्शने केली. मात्र, या आंदोलनासाठी पोलिसांकडून केवळ सायंकाळी ४ वाजेपर्यंतचीच परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे रात्रीच्या वेळी आंदोलकांची गर्दी वाढल्यानंतर दिल्ली पोलीस आणि रॅपिड ?क्शन फोर्सने घटनास्थळी पोहोचून जमावाला पांगवण्यास सुरु वात केली.या आंदोलनाची हाक 'आरक्षण हटाओ आंदोलन' नावाच्या एका इन्स्टाग्राम पेजवरू न देण्यात आली. या आवाहनाला प्रतिसाद देत सकाळपासूनच मोठ्या संख्येने लोक जंतरमंतरवर पोहोचले. आंदोलकांमध्ये बहुतांश पुरु षांचा समावेश होता. अनेकांच्या हातात तिरंगा, तर काहींच्या हातात बॅनर, पोस्टर आणि भगवे झेंडे होते. यावेळी आंदोलकांनी जातीनिहाय आरक्षण आणि यूजीसीच्या नियमांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. सुरक्षेच्या कारणास्तव दिल्ली पोलिसांनी घटनास्थळी आणि आजूबाजूच्या परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. तसेच निदर्शनाच्या ठिकाणी बॅरिकेड्स लावून निमलष्करी दलाचे जवान तैनात करण्यात आले होते. अखिल भारतीय क्षत्रिय महासभेशी संबंधित एका आंदोलकाने सांगितले की, 'सरकारी मदत कोणाला द्यायची, हे ठरवताना आर्थिक स्थितीचा विचार व्हायला हवा. जातीचा विचार न करता गरीब व्यक्तीला शिक्षण, कोचिंग आणि इतर गरजांसाठी मदत मिळायला हवी.' सध्याच्या आरक्षण व्यवस्थेचे पुनरावलोकन करण्याची मागणी काही आंदोलकांनी केली. आरक्षणाचा लाभ अजूनही समाजातील सर्वात वंचित घटकांपर्यंत पोहोचत नसल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय धोरणांमध्ये बदल करू न, आरक्षण व्यवस्थेत 'क्रीमी लेयर'ची तरतूद लागू करण्याची मागणीही करण्यात आली. एका तरु णाने सरकारकडे श्वेतपत्रिकेची मागणी करत म्हटले की, 'गेल्या ८० वर्षांपासून दिल्या जाणा-या आरक्षणाचा आतापर्यंत कोणत्या जातीला किती फायदा झाला, हे सरकारने स्पष्ट करावे. आरक्षणाचा लाभ केवळ काही ठराविक जातींनाच मिळत आहे.

# शेतीच्या उत्पादकता वाढीसाठी डिजिटल ट्विन लर्निंग प्रकल्प

**मुंबई/प्रतिनिधी :**कृषि विभागाने राज्यातील शेतीचे उत्पादन वाढण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह तंत्रज्ञान, ड्रोन, आयओटी सेन्सर्स आणि डेटा ॲनालिटिक्सवर आधारित अभ्यास करावा. कापूस, सोयाबीन, तूर,उस,संत्रे,हळद,कांदा व मका या पिकांसाठी 'शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व 'डिजिटल ट्विन लर्निंग' प्रकल्प महाराष्ट्रात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यासाठी पहिल्या टप्प्यात दहा हजार शेतक-यांची निवड करावी असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे' शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व 'डिजिटल ट्विन लर्निंग' प्रकल्प सादरीकरणाबाबत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी बैठकीत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, ऑनलाईन व्ही.सी.व्दारे कृषी राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल, सहकार राज्यमंत्री ड? पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल,अपर मुख्य सचिव वित्त विकास चंद्र रस्तोगी, सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, नानाजी कृषी संजीवनी प्रकल्पाच्या प्रकल्प संचालक मीनल करनवाल, सकाळ समुहाचे अध्यक्ष प्रताप पवार, ऑक्सफर्ड विद्यापीठाचे प्राध्यापक अजित जावकर, मायक्रोस?फ टच्या सपना मोहरिया, कृत्रिम बुद्धिमत्ता व अग्रोटेक नाविन्यता केंद्राचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी पराग दाभाडे, ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश नलवडे यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हवामान बदल,पाणीटंचाई,जमिनीची घटती सुपीकता, कीड व रोगांचा वाढता प्रादुर्भाव,वाढता उत्पादन खर्च या आव्हानांवर मात करण्यासाठी बारामती येथील ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टने 'शेती क्षेत्रात आर्टिफिशीएल इंटेलिजन्स व 'डिजिटल ट्विन लर्निंग' प्रकल्प विकसित केला आहे. या प्रकल्पाचा विभागनिहाय पिकवार अभ्यास करावा.पिकांची वाढ, पाण्याची गरज, जमिनीतील ओलावा, हवामान, कीड-रोगांचा प्रादुर्भाव आणि संभाव्य उत्पादन याबाबत विविध स्रोतांमधून माहिती संकलित करू न एकत्रित सक्षम डिजिटल प्रणाली तयार करावी. मिळणा-या माहितीचे मशीन लर्निंगच्या माध्यमातून विश्लेषण करू न शेतक-यांना पीकनिहाय आणि शेतनिहाय सल्ला देण्याची गरज असून जेणेकरू न शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ होईल असेही ते म्हणाले.



# वॉक फॉर वॉटरसाठी ऊसळला जनसागर!

## महा वॉकथॉनमध्ये हजारो नागरिकांचा सहभाग

**यवतमाळ /प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्राला दूरदृष्टी देणारे राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आज शुक्रवारी जलसंधारण दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या महा वॉकथॉनसाठी यवतमाळात जनसागर उसळला. स्थानिक समता मैदानात सकाळी ६ वाजता हजारो यवतमाळकर माती वाचवा-पाणी जपा आणि सुरक्षित भविष्य घडवा हा संदेश देत तीन किलोमीटर चालले. यावेळी आमदार किसन वानखेडे, नगराध्यक्ष प्रियदर्शनी उइके, जिल्हाधिकारी विकास मीना, जलसंधारण अधिकारी भुमेश दमाहे, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख हरिहर लिंगनवार, श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, राजुदास जाधव, यशवंत पवार, आशिष कुलसंगे, समन्वयक संजय हातगावकर आदी वाकथानमध्ये सहभागी झाले.

**वॉक फॉर वॉटरचा संदेश-** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या संकल्पनेतून यावर्षी प्रथमच वॉक फॉर वॉटरचा संदेश देत संपूर्ण राज्यात आज एकाचवेळी महा वॉकथॉन चे आयोजन करण्यात आले होते. स्वांतर्त्य दिनाच्या पर्वावर १५ ऑगस्टपासून संपूर्ण महाराष्ट्रात सुरू झालेल्या जलसंधारण सप्ताहाची सांगतासुद्धा या वाकथानने



करण्यात आली. या माध्यमातून माती आणि पाणी वाचवण्यासाठी राज्यव्यापी लोकचळवळ उभारली जावी आणि हवामान बदलाच्या या काळात पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व पटवून देणे, मातीचे महत्व जपणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आजच्या कार्यक्रमानिमित्त दिलेल्या संदेशात म्हटले आहे. हा उपक्रम एका सप्ताहापुरता मर्यादित न राहता स्वातंत्र्य दिन ते २६ जानेवारी २०२७ प्रजासत्ताक दिनापर्यंत तो जलसंधारण अभियान म्हणून अविरत सुरू राहील. या मोहिमेतून जलयुक्त शिवार २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, अमृत सरोवर आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली जाणार आहे.

यवतमाळ येथे आज पहाटे ६ वाजता समता मैदानात माध्यमिक शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, विविध शासकीय विभागातील अधिकारी, कर्मचारी, नागरिक, तरु ण, तरु णींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वाकथानसाठी संपूर्ण राज्यातून यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक २५ हजार स्पर्धकांनी ऑनलाइन नोंदणी केली. यातील २० हजारांवर स्पर्धक प्रत्यक्ष स्पर्धेत सहभागी झाले. पालकमंत्री संजय राठोड यांच्या आवाहनाला प्रतिसाद देउन शासकीय कार्यक्रमात हजारो नागरिक सहभागी होण्याचा हा प्रसंग ऐतिहासिक ठरला. आजच्या स्पर्धेत जेन झीचा सहभाग लक्षणीय ठरला.


# 11 वी ऑनलाइन प्रक्रियेतील विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत अद्याप प्रवेश निश्चित न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांनी या अंतिम फेरीत प्रवेश निश्चित करू न घेण्याचे आवाहन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने केले आहे. संचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १५,५२,६७८ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून १३,४३,४१८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. मात्र, काही विद्यार्थ्यांनी अद्याप प्रवेश निश्चित न केल्यामुळे ही विशेष फेरी आयोजित करण्यात आली आहे. या फेरीसाठी २३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर २३ ऑगस्ट दुपारी १ वाजल्यापासून २४ ऑगस्ट सायंकाळी ६ वाजेपर्यंत नवीन विद्यार्थ्यांना नोंदणी, भाग-१ मधील दुरु स्ती तसेच भाग-२ भरू न अर्ज लॉक करण्याची सुविधा उपलब्ध राहणार आहे.

# महाराष्ट्रातील बँक चळवळ संपवण्याचा अमित शहांचा डाव; राउतांचा गंभीर आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :**संसदेच्या पावसाळी अधिवेशनात गोंधळात आणि घाईघाईने मंजूर करण्यात आलेल्या नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कार्पोरेशन (सुधारणा) विधेयक २०२६ च्या आडून महाराष्ट्रातील सहकार चळवळ आणि नागरी सहकारी बँकांचे जाळे मोडून काढण्याचे केंद्राचे मोठे षड्यंत्र आहे, असा गंभीर आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राउत यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना मराठीत पत्र लिहिले आहे. त्याशिवाय, याबाबतची माहिती त्यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून सुद्धा दिली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, त्यांनी या प्रकरणावरू न राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही जाब विचारला आहे. परंतु, राउतांनी केलेल्या गंभीर आरोपांमुळे महाराष्ट्राच्या बँकिंग क्षेत्रात खळबळ उडाली आहे. खासदार संजय राउत यांनी शुक्रवारी (२१ ऑगस्ट) प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी म्हटले की, अमित शहा हे मुंबईत आले. परंतु, ते संसदेत आले नाहीत. आम्ही त्यांची तिथे वाट पाहात होतो. मात्र, शहा जेव्हा मुंबईत आले तेव्हा त्यांनी फोर्टच्या शारदा सदन इमारतीच्या दुस-या मजल्यावरील नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव्ह फायनान्स अँड डेव्हलपमेंट कार्पोरेशनचे उद्घाटन केले. ही संस्था सर्व नागरी सहकारी बँकांची प्रमुख (अपेक्स संस्था) म्हणून काम करेल, असे जाहीर करण्यात आले. या निर्णयाचा महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांना मोठा फटका बसणार आहे. महाराष्ट्रातील बँकांवर वर्चस्व मिळवण्यासाठी किंवा त्या बंद पाडण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी संसदेत एक विधेयक घाईघाईने मंजूर करू न घेण्यात आले, असे राउतांनी सांगितले.

तसेच, महाराष्ट्र हे सहकार चळवळीतील अग्रगण्य राज्य आहे. सहकाराची मुहूर्तमेढ याच भूमीत रोवली गेली आहे. असे असतानाही या निर्णयाबाबत महाराष्ट्रातील एकाही घटकाचे किंवा बँकेचे मत विचारात घेतले गेले नाही. या धोरणामुळे राज्यातील बँकांवर काय परिणाम होईल, याचा कोणताही



अभ्यास करण्यात आला नाही. गुजरातमधील एका घोटाळेबाज बँकेला वाचवण्यासाठी तिचे विलीनीकरण नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव्ह फायनान्स अँड डेव्हलपमेंट कार्पोरेशनमध्ये करण्यात आले आणि त्याद्वारे तेथील भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न झाला. राज्यातील नागरी सहकारी बँकांचे अस्तित्व धोक्यात आणणारा हा निर्णय होत असताना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री काय करत होते? त्यांना या विषयातील गांभीर्य कळते का? असा सवाल राउत यांनी केला आहे.

अमित शहा जाता जाता महाराष्ट्रावर मोठा दरोडा टाकण्याचा प्रयत्न करत आहेत, असा आरोप राउतांनी केला आहे. त्यांचा हा मनमानी कारभार आणि भ्रष्टाचार महाराष्ट्राला उद्ध्वस्त करणारा आहे. आता महाराष्ट्राने काय करायचे? अमित शहा आणि गुजरातच्या दारात भीक मागायला जायचे का? हा अत्यंत गंभीर विषय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना कळत नसेल आणि ते जर याचे स्वागत करत असतील, तर ते बाळासाहेबांचा कोणता विचार पुढे नेत आहेत? हजारो लोकांची रोजीरोटी या सहकार क्षेत्रावर अवलंबून आहे. सर्व काही गुजरातच्या घशात घालण्यासाठी आणि शहा यांच्या मर्जीतील संस्थांचा फायदा करू न देण्यासाठीच हा सर्व प्रपंच सुरू आहे, असेही यावेळी खासदार संजय राउत म्हणाले आहेत.

# कुख्यात बुकी सोंटू जैनकडच्या छापेमारीत ईडीच्या हाती लागले घबाड

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर : ऑनलाइन गेमिंग आणि बेटिंगच्या माध्यमातून करण्यात आलेल्या कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या तपासाचे चक्र अधिकच गतिमान झाले आहे. या पार्श्वभूमीवर, मनी लाँडरिंग प्रकरणात ईडीने १८ ऑगस्ट रोजी नागपूर, गोंदिया आणि अहमदाबाद येथील तब्बल १२ ठिकाणी छापेमारी केली. आरोपी अनंत नवरतन जैन उर्फ सोंटू जैन आणि त्याच्या साथीदारांशी संबंधित ठिकाणांवर मारलेल्या छाप्यात ३० लाख ३० हजार रु पयांची रोकड, दोन बँक लॉकर, सुमारे १.७० कोटी रु पये किमतीची तीन आलिशान वाहने आणि सुमारे ५ कोटी रु पये मूल्याची १०० हून अधिक बँक खाती गोठविण्यात आल्याची माहिती आहे. नागपूर शहरातील सायबर क्राइम पोलिस ठाण्यात सोंटू जैन आणि इतरांविरु द्ध दाखल करण्यात आलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीने मनी लाँडरिंगचा तपास सुरू केला. तपासात सोंटू जैनने अल्पावधीत मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत तक्रारदाराला ऑनलाइन गेमिंगमध्ये मोठ्या प्रमाणात पैसे गुंतविण्यास प्रवृत्त केल्याचे समोर आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, डायमंडएक्सचेंज डाट काम, वुल्फ७७७ डाट काम, वर्ल्ड७७७ डाट काम यांसह विविध ऑनलाइन गेमिंग प्लॅटफार्ममध्ये कथित फेरफार केली जात होती, असा आरोप आहे. त्यानुसार, तक्रारदार विजयाच्या स्थितीत पोहोचला की तांत्रिक त्रु टी किंवा ग्लिच निर्माण होत असे. त्यामुळे त्याला जिंकलेली रक्कम मिळत नसे. अशा कथित फसव्या आणि फेरफार केलेल्या पद्धतीने आरोपी सोंटू आणि त्याच्या साथीदारांकडून तक्रारदाराची तब्बल ५८ कोटी ४२ लाख रु पयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तक्रारदाराला ठरावीक कुरिअरमार्फत रोख रक्कम देण्यास सांगितले जात होते. रकमेची ओळख आणि हिशेब ठेवण्यासाठी हवाला पद्धतीतील टोकन नोटांचाही वापर करण्यात येत होता. सोंटू जैनने सांगितलेल्या एजंट अकाउंटमध्ये बँक हस्तांतरणाद्वारेही पैसे जमा केले जात होते. तपासात विविध व्यक्ती आणि संस्थांच्या नावावर असलेल्या अनेक म्युल बँक अकाउंट्सचा वापर गुन्ह्यातून मिळालेली रक्कम स्वीकारणे, तिचे स्तर बदलणे आदींसाठी झाल्याचे आढळले. काही रक्कम बनावट आयात व्यवहारांच्या नावाखाली परदेशात पाठविण्यात आल्याचे ईडीने म्हटले आहे. छापेमारीदरम्यान ईडीने ११ मोबाइल फोन आणि एक लॅपटाप जप्त केला असून, त्यामध्ये बेकायदा गेमिंग व्यवहार आणि आर्थिक देवाणघेवाणीशी संबंधित महत्त्वाचे डिजिटल पुरावे असण्याची शक्यता आहे. याशिवाय सुमारे १६.५० कोटी रु पये मूल्याच्या स्थावर मालमत्तांशी संबंधित आक्षेपार्ह कागदपत्रेही जप्त करण्यात आली आहेत. या आधारे आर्थिक व्यवहारांचा आणि मालमत्तांच्या स्रोताचा तपास केला जात आहे. या कारवाईमुळे कुख्यात सोंटूच्या आर्थिक साम्राज्यावर मोठा घाव बसल्याचे मानले जात आहे.



### महाराष्ट्र गट–ब संयुक्तमुख्य परीक्षा–२०२५

# एकापेक्षा अधिक गुणवत्ता यादीत नाव आले तरी नियुक्ती एका संवर्गातच

**मुंबई, दि. २१ :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा-२०२५ च्या निकालासंदर्भात उमेदवारांमध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. एकाच उमेदवाराचे नाव एकापेक्षा अधिक संवर्गांच्या गुणवत्ता यादीत आले असले, तरी प्रत्यक्ष नियुक्ती केवळ एका संवर्गातील पदावरच होणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. आयोगाने १४ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा-२०२५ चा निकाल प्रसिद्ध केला. दिनांक १७ मे २०२६ रोजी घेण्यात आलेल्या या परीक्षेच्या निकालामध्ये सहायक कक्ष अधिकारी संवर्गातील ३ पदे, राज्य कर निरीक्षक संवर्गातील २७९ पदे आणि दुय्यम निबंधक (श्रेणी-१)/मुद्रांक निरीक्षक संवर्गातील ८४ पदे अशा एकूण ३६६ पदांचा समावेश आहे. या परीक्षेसाठी अर्ज करताना उमेदवारांनी मुख्य परीक्षेतील या तीनही संवर्गांकरिता विकल्प दिले होते. निकाल जाहीर करीत असतांना आयोगाने प्रचलित कार्यपद्धतीनुसार संवर्गनिहाय उपलब्ध पदे, उमेदवारांची गुणवत्ता, सामाजिक व समांतर आरक्षण व उमेदवाराने दिलेले विकल्प इ. बाबी निकाल तयार करीत असतांना विचारात घेण्यात आल्यात. त्यानुसार वरील तिन्ही संवर्गाची यादी आयोगाच्या संकतेस्थळावर दिनांक १४ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यामुळे गुणवत्ता यादीतील या तीनही संवर्गाचे उमेदवार हे एकापेक्षा अधिक संवर्गातील गुणवत्ता यादीत आलेले दिसून येतात. उमेदवारांनी अर्ज दाखल करीत असतांना वरील तीनही संवर्गाकरिता विकल्प दिलेला आहे. तो विकल्प विचारात घेउनच संवर्गनिहाय निकाल प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. एक उमेदवार एकापेक्षा अधिक संवर्गाच्या गुणवत्तायादीमध्ये दिसत असला तरी प्रत्यक्षात त्याने दिलेल्या विकल्पानुसार सदर उमेदवाराची या तीनही संवर्गापैकी फक्त एकाच संवर्गातील पदावर नियुक्ती होणार आहे. उर्वरित संवर्गातील पदे रिक्त राहणार आहेत. शासनाने नियुक्ती आदेश दिल्यानंतर विहित कालावधीमध्ये संबंधित उमेदवार त्याच्या पदावर रु जू न झाल्यास ते पद रिक्त राहणार असून त्या पदाकरिता प्रतिक्षा यादीमधून आयोगाकडून शासनास शिफारस करण्यात येणार आहे. निकालासंदर्भात विविध समाजमाध्यमांवर प्रसारित होत असलेल्या संदेशांमुळे उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण होउ नये, यासाठी आयोगाने ही वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. उमेदवारांनी अधिकृत माहितीकडे लक्ष द्यावे, असे आवाहनही आयोगाने केले आहे.

# केंद्रीय योजनांच्या निधीचा परिपूर्ण विनियोग करण्यास प्राधान्य द्यावे

## -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, दि. २१ :** राज्यात केंद्रीय योजनांच्या अमंलबजावणीसाठी उपलब्ध होणा-या निधीचा प्रभावी आणि वेळेत विनियोग करण्यास सर्व विभागांनी प्राधान्य द्यावे. केंद्रीय निधीच्या परिपूर्ण विनियोगास प्राधान्य देत यावर्षी विनियोगाचे प्रमाण ९५ टक्क्यांपेक्षा जास्त राहील याची खबरदारी विभागप्रमुखांनी घ्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित केंद्रीय योजनांच्या निधीच्या उपलब्धतेसह त्याच्या विनियोगाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, निवासी आयुक्त(गुंतवणूक) महाराष्ट्र सदन सुशील गायकवाड यांच्यासह सर्व संबंधित विभागांचे अपर मुख्य सचिव,प्रधान सचिव,सचिव उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राकडे राज्याच्या विविध योजनांसाठी उपलब्ध असलेल्या निधीला केंद्रीय योजनांच्या निधीची जोड देउन त्याचा अधिक प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने विभागांनी नियोजन करावे. केंद्रीय निधीचा पूर्ण क्षमतेने वापर करत विकासकामांना अधिक गती देता येईल. पुढील वर्षी सुमारे १६ ते १७ हजार कोटी रु पयांचा केंद्रीय निधी खर्च करण्याची क्षमता असून, त्यातील मोठा हिस्सा भांडवली खर्चाचा आहे. त्यामुळे हा केंद्रीय निधी खर्च करण्यास विभागप्रमुखांनी प्राधान्य द्यावे. विहित मुदतीत योजनांच्या व्यापक अमंलबजावणीसाठी हा निधी विनियोगात आणल्या जाईल यासाठी विभागांनी त्याची जबाबदारी निश्चितपणे स्वीकारावी, असे मुख्यमंत्री यांनी सूचित केले. तसेच केंद्रीय क्षेत्रातील योजनांचा किती निधी कोणत्या विभागाकडे उपलब्ध आहे, त्यापैकी किती निधी खर्च झाला आहे आणि किती निधी शिल्लक आहे, याचा विभागनिहाय आढावा घेउन निधीचा वेळेत विनियोग करण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. लेखा प्रक्रियेतील अडचणींमुळे निधीचा विनियोग रखडत असल्यास त्या अडचणी तातडीने दूर कराव्यात, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. केंद्र शासनाने एखाद्या योजनेसाठी नवीन लेखा प्रणाली किंवा तांत्रिक बदल निश्चित केल्यास त्याची अंमलबजावणी तातडीने करावी. कामांसाठी कट ऑफ डेटची वाट न पाहता विभागांनी सेंस ऑफ अर्जन्सीने काम करण्याची गरज आहे. निश्चित कालमर्यादेत कार्यवाही न झाल्यास संबंधित निधीबाबत कठोर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. गेल्या दोन तीन वर्षात खर्च करण्यात आलेल्या निधीचे अवलोकन करु न सर्व विभागांनी गांभीर्याने विचार करू न आपल्या विभागातील त्रु टी दूर कराव्यात. तसेच निधी विभागांकडून खर्च झालेला असून तो लेखांकनात प्रतिबिंबित होत नसल्यास त्याची कारणे स्पष्ट करावीत आणि निधी खर्च झालेला नसेल तर तो वेळेत कसा खर्च करता येईल, याचे नियोजन करावे, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. केंद्रीय निधीच्या विनियोगाचा नियमित आढावा घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या स्तरावर प्रभावी यंत्रणा उभारावी. दर तीन महिन्यांनी निधीच्या वापराचा आढावा घेउन त्यासंबंधीचे निर्देशक निश्चित करावेत, अशी सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. केंद्रीय योजनांच्या निधीचा अधिकाधिक आणि परिणामकारक वापर करू न विकासकामांना गती देणे हा या आढाव्याचा मुख्य उद्देश असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## विकासाची सप्तधारा

सात हा आकडा आपल्याकडे शुभ मानला जातो. जसे की सात सूर, सात रंग, तसेच पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्राला उद्देशून संबोधन करताना 'विकसित भारताची सप्तधारा' योजना जाहीर केली; कारण त्यात भारताच्या बदलत्या गरजांचे प्रतिबिंब पडले आहे. २०१४ साली जेव्हा मोदी प्रथम पंतप्रधान झाले, तेव्हा त्यावेळचे विषय शौचालय, रस्ते, वीज, बँक खाती हे होते. त्यावर मोदी यांच्या भाषणांचा भर असायचा. पण आज संपूर्ण भारत विकसित देशाच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे आणि त्यामुळे हे प्रश्न आज तितक्या प्रमाणात राहिले नाहीत, अगदी गावखेड्यातही राहिले नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाबाबत सांगायचे तर असे म्हणता येईल की ते भाषण नव्हते तर एक घोषणा होती. नंतरच्या निवडणुकांत चांद्रयान, शंभरहून अधिक उपग्रहांचे प्रक्षेपण असे मुद्दे आले. आता मोदी यांनी 'सप्तधारा'चा मुद्दा विकसित भारत बनवण्याच्या दृष्टीने प्रमुख मुद्दा केला आहे. सप्तधारेमध्ये उत्पादन शक्ती मिळवणे, कृषी आणि अन्न प्रक्रिया, तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्णता, गती शक्ती, संरक्षण, हरित आणि नील अर्थव्यवस्था यांचा समावेश आहे. या प्रत्येक मुद्द्याद्वारे सरकारला त्या त्या समाजघटकांना मजबूत करण्याची क्षमता प्राप्त करता येईल आणि सरकार आपल्या नागरिकांना विकसित भारताच्या दिशेने नेईल, असा मोदींचा मनोदय आहे. मोदी यांनी म्हटले की, भारत केवळ मोठा होऊन विकसित होणार नाही, तर अधिक सक्षम,'सेल्फ रिलायंट' म्हणजेच आत्मनिर्भर आणि जागतिक दृष्ट्या स्पर्धात्मक होईल तेव्हाच भारत विकसित होईल. मोदींची योजना महत्त्वाकांक्षी आहे, पण त्याचे यश तरुणांच्यावर अवलंबून आहे. मोदी यांच्या या योजनेत गती शक्ती, व्हॅल्यू चेन्स, कृषी आणि अन्न प्रक्रिया, तरुणांना उपलब्ध असलेले अन्न जसे की मिलेट्स आणि मसाले, ड्रोन्स आणि रोबोटिक्स वगैरे तंत्रज्ञान, शिवाय आरोग्याचे महत्त्व म्हणजे योगा आणि आयुर्वेद या मार्गाने मोदी यांना तरुणांना सक्षम करायचे आहे आणि त्यातून भारताला विकसित बनवायचे आहे. भारतात ६५ टक्के मतदारांचे वय ३५ वर्षांच्या आत आहे आणि त्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे हेच मतदार निवडणुकीचे निकाल ठरवत असतात आणि त्यांच्यावर बहुतेक राजकीय पक्षांची भिस्त असते.

याच कारणामुळे भाजपने आपल्या नेत्यांमध्येही तरुणांचा भरणा केला आहे आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नवीन हे ४५ वर्षांचे आहेत. यापूर्वी एकही भाजपचा नेता इतका तरुण नव्हता. त्यामुळे भाजपची ही बदललेली व्यूहरचना भाजपला निश्चितच बळ देणारी आहे. प्रथम मतदारांची संख्या ही दीर्घकालीन गुंतवणुकीची असेट असते. त्याची दखल भाजपने घेतली आहे आणि म्हणूनच विकसित भारत बनण्याच्या दृष्टीने हाच मतदार सर्वात योग्य आहे.भाजपने हे कधीच ओळखले आहे की, ३५ वयाच्या आत असलेला इतक्या मोठ्या संख्येने असलेला मतदार ज्या पक्षाकडे आहे, तो पक्षच या देशावर राज्य करणार,ही काळ्या दगडावरची रेघ आहे. त्याचबरोबर पक्षाने हे ओळखले आहे की, नव्या मतदारांना थेट संवाद हवा आहे. आज मोदी यांनी तरुणांना हाक दिली आहे आणि त्यांनी असे प्रतिपादन केले होते की, सप्तधाराचे सात प्रवाह भारताची अर्थव्यवस्था मजबूत करतील; कारण यात सप्तधारेतच भारताचे भविष्य घडवणारे घटक आणि म्हणून विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करणारे घटक आहेत. त्यामुळे मोदी यांनी आखलेल्या या योजनेत सात इंजिन्स आहेत आणि त्याद्वारे तरुण आणि महिलांना सक्षम करून देशाला मोठी झेप घ्यायची आहे. मोदी यांनी भारताला विकसित भारताकडे घेऊन जाताना जुने मुद्दे मागे टाकले आहेत; कारण आजकालच्या पिढ्यांना त्या भाषणांमध्ये रस नाही. त्यामुळे मोदी यांनी ते मुद्दे टाळून आजच्या मतदारांना हवे तेच मुद्दे घेतले आहेत आणि ही मोदी यांच्यासाठी स्पृहणीय बाब आहे. भाजपचा पिता मानला जाणारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही तरुणांचे महत्त्व ओळखले आहे आणि म्हणूनच सरसंघचालक मोहन भागवत यांनी तरुणांशी संवाद साधण्याचा मनोदय व्यक्त केला. भाजप आणि संघाला अचानक या तरुणांशी संवाद साधण्याची गरज वाटलेली नाही, तर त्यांना माहीत आहे की, हाच तरुणांचा वर्ग उद्याच्या भारताचे आशास्थान आहे; कारण आकडेवारी हेच सांगते की, भारत हा तरुणांचा देश आहे आणि यामुळे येथे मूलभूत बदल घडवण्याची शक्ती तरुणांमध्येच आहे.जर २०४७ पर्यंत देशाला विकसित भारत बनवायचे असेल, तर या वर्गाकडे पाठ फिरवायला चालणार नाही. हे सर्वात अगोदर भाजपने ओळखले आहे आणि म्हणूनच अभिजीत दीपके यांचे आंदोलन चिरडले नाही, पण भाजपने तरुणांचा आवाज ऐकला आणि त्याकडे लक्ष दिले. भाजप सत्तेवर आला तोच तरुणांच्या मतांमुळे. भाजपचे तरुण नेते हेमांग जोशी यांनी सांगितले की, आम्ही जास्तीत जास्त तरुणांना नकारात्मक नरेटिव्हपासून दूर राखत आहोत आणि त्यांना जास्तीत जास्त विकसित भारताच्या दिशेने पुढे नेत आहोत. भारताचे प्राधान्यक्रम बदलत गेले आहेत, पण या सर्वांत एक बाब सामायिक आहे, ती म्हणजे युवकांची शक्ती आणि त्यांचा उपयोग करून घेणे. तेच समाजाने केले आहे. २०१६ मध्ये युवकांना 'स्टार्टअप इंडिया'मध्ये संधी देणे हा भाग होता, तर आता स्टार्टअपच्या माध्यमातून पूर्ण व्हॅल्यू चेन विकसित करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. महिलासंबंधित मुद्देही बदलले आहेत. ज्या महिला रात्रीच्या अंधारात शौचास जायला निघत होत्या, त्या आज विमाने चालवण्यापर्यंत मजल मारू लागल्या आहेत. २०१५ मध्ये केवळ ४० टक्के भारतीयांकडे बँक खाती होती, आज प्रत्येकाकडे ती असतात आणि सरकारी मदत थेट बँक खात्यात जमा होते. देशाचा विकास सरकारला कोणत्या दिशेने न्यायचा आहे, ते प्राधान्यक्रमांच्या माध्यमातूनही उत्तम समजून येते. यात आणखी एक विशेष बाब आहे, ती म्हणजे विद्यार्थ्यांना नीट आणि तत्सम परीक्षांसाठी मोफत कोचिंग मिळण्याची व्यवस्था केली आहे. हे सप्तधारेशी संबंधित नसले तरीही त्या आनुषंगानेच आहे.

# शेतकरी कर्ज 'मुक्त' का होत नाही?

या वर्षी सरकारने शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत कर्जमाफीची घोषणा केली आहे. अशा कर्जमाफी अनेक सरकारांनी,अनेक वेळा केल्या पण शेतकरी कायमचा 'कर्जमुक्त' का होत नाही हा खरा प्रश्न आहे.

शेतकरी दर ४-५ वर्षांनी कर्जबाजारी होतो व कर्जमाफीची मागणी करतो. सत्तेत टिकून राहण्यासाठी व शेतकरी वर्गाची नाराजी टाळून राजकीय लाभासाठी सरकार पण शेतकऱ्यांच्या मागणीच्या दबावाला बळी पडून थातुरमातूर कर्जमाफी करते. सरकारला खरंच शेतकरी कर्जाच्या विळख्यातून बाहेर निघावा असे वाटते का? सरकार जी कर्जमाफी देते, तिचा नक्की शेतीवर व शेतकऱ्यावर काय परिणाम होतो ? याचा विचार करण्याची वेळ आली आहे. यामागे सरकारचा काय हेतू असू शकतो हे तपासणे ही गरजेचे आहे. कर्ज थकविणाऱ्यांनाच कर्जमाफी मिळते, म्हणून नियमित कर्जफेड करणारे शेतकरी ही कर्ज थकवू लागले आहेत.

**एका दाण्याचे शंभर दाणे करणारा शेतकरी कायम कर्जबाजारी का राहतो? इतकी बरकत असलेल्या धंद्याचा मालक कर्जबाजारी का? कारण त्याला कर्जबाजारी ठेवण्याचे सरकारचे धोरण.**



### शेतीच्या शोषणाचे धोरण

शेतकरी नेते शरद जोशी म्हणायचे, की शेतकरी कायम गरीब, दरिद्री आणि कर्जबाजारी राहावा म्हणून सरकार जाणीवपूर्वक प्रयत्न करत असते. शेतकरी नेहमीच चांगल्या प्रतीचा शेतीमाल तयार करण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी तो कधीच कोणतीच तडजोड करत नाही. शेतीसाठी तो उत्तम बियाण्यांची निवड करतो. शेतीची चांगली निगा राखतो. नांगरणी, पेरणी, खुरपणी ही सगळी कामे ऊन, पाऊस वा कडाक्याच्या थंडीची तमा न बाळगता, जंगली प्राण्याची भीती असताना स्वतःच्या जिवाची पर्वा न बाळगता तो रात्री-बे रात्री पाणी भरायला व शेतीमाल राखायला शेतात जातो. उत्कृष्ट शेतीमाल तयार करतो. शेतकऱ्याने 'मूठभर पेरले, तर पायली भर घेऊन येतो.' म्हणजे एका दाण्याचे शंभर दाणे करणारा शेतकरी कायम कर्जबाजारी का राहतो? इतकी बरकत असलेल्या धंद्याचा मालक कर्जबाजारी का? कारण त्याला कर्जबाजारी ठेवण्याचे सरकारचे धोरण.

### लुटीची हत्यारे

सरकारकडून विविध निर्बंध लावत आवश्यक वस्तू कायद्याचा व परराष्ट्र व्यापार कायद्याचा वापर करून, राज्य बंदी, साठ्यांवर मर्यादा, निर्यात शुल्क, निर्यात कर, निर्यातबंदी, आयात कर मुक्त आयाती, असे शेतीमालाचे भाव पाडण्याचे अनेक मार्ग अवलंबले जातात. १९५१ मध्ये, पहिली घटना दुरुस्ती करून परिशिष्ट ९ घुसवले व शेतकऱ्यांचा न्याय मागण्याचा अधिकारही हिरावून घेतला. या हत्यारांचा वापर करून सरकारने शेतकऱ्यांची प्रचंड लूट केली आहे.

### उणे अनुदानाद्वारे प्रचंड लूट

ओईसीडी या मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय संस्थेने केलेल्या अभ्यासात सिद्ध झाले आहे, की भारतातील शेतकऱ्यांना लाखो कोटी रुपये उणे अनुदान मिळते, २०२३ च्या अहवालात नमूद केले आहे, की एका वर्षात भारतातील शेतकऱ्यांना उणे अनुदान देऊन १२० बिलियन डॉलरला लुटले. म्हणजे जवळजवळ १२ लाख कोटी रुपये एक वर्षात लुटले. २००० ते २०१६ या कालावधीत भारतातील शेतकऱ्यांना ४५ लाख कोटी रुपये उणे अनुदान मिळाले होते. हा शेतकऱ्यांवर सरकारने घातलेला दरोडाच आहे.

### धोरणात्मक बदल

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत लिहिले आहे, की शेतीमालाचा उत्पादन खर्च भरून निघेल येवढे भाव मिळता कामा नये. कारण समाजवादी व्यवस्थेतील कारखानदारी वाढायची असेल, तर शेतीमधील वरकड उत्पादन हे कारखानदारीकडे वळविले पाहिजे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या प्रास्ताविकात व्ही. टी. कृष्णमाचारी यांनी स्पष्टपणे नमूद केलेले आहे. हेच धोरण पुढे कायम राहिल्यामुळे सरकारे कुणाचीही असोत ते शेतीमालाच्या भावात हस्तक्षेप करतात. शेतीमाल स्वस्त राहिला पाहिजे, यासाठी सरकारे प्रयत्नशील असतात. परिणामी, शेतकऱ्याला कधीच नफा मिळत नाही. सरकारला हे कळत नाही, की वारंवार कर्जमाफी का द्यावी लागते? आपण जर शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्ज दिले, तर तो जी शेती करतो त्यात त्याला नफा होऊच दिला नाही तर बँकेचे व्याज व कर्ज शेतकरी कसा फेडू शकेल ?

### माफी नको, स्वातंत्र्य द्या

सरकारला खरंच शेतकऱ्यांचे भले करायचे असेल, तर त्या पैशातून सरकारने शेतीसाठी पायाभूत सुविधा उभ्या करून द्याव्यात. त्याला चांगली वीज म्हणजे पूर्ण दाबाने २४ तास वीजपुरवठा केला तर ऐन पीक पाण्याअभावी सुकणार नाही आणि त्याला चांगले उत्पादन होईल. जगभर शेतीत जे जे तंत्रज्ञान वापरले जाते, ते भारतातील शेतकऱ्याला सहज मिळाले पाहिजे. जगाच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी जगभरात जे जीएम तंत्रज्ञान वापरले जाते, ते उपलब्ध झाले तर आपला शेतकरी जगातील शेतकऱ्यांसारखे जास्त उत्पादन तयार करू शकेल. त्याने चांगला शेतीमाल पिकवला, तर त्याला बाजारपेठेचे स्वातंत्र्य पाहिजे. म्हणजे तो ते जगाच्या पाठीवर कुठेही विकू शकेल.

प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध झाले, तर तो जास्त उत्पन्न घेऊन नफा कमवू शकेल. उत्पादन खर्च कमी झाला व उत्पादन वाढले तर तो शेतीमाल स्वस्त पण विकू शकेल. जर सरकारने शेतीमालाच्या व्यापारातील हस्तक्षेप कमी/बंद केला, तर शेतकरी जास्त उत्पादन जगभर विकेल. त्यामुळे देशाचा बाजार सुधारेल व शेतकऱ्याला जास्त नफा झाला तर देशाचा जीडीपी वाढेल. देशातील लोकांना अन्नधान्य स्वस्त मिळाले, तर करदात्यांचे पैसे वाचतील व सरकारला वारंवार कर्जमाफी द्यावी लागणार नाही. त्या वेळी शेतकरी खऱ्या अर्थाने 'कर्जमुक्त' होईल. शेतकऱ्याला कर्ज घेण्याची गरजच पडली नाही किंवा शेतकऱ्यांनी जर कर्ज घेतले तर ते फेडण्याची त्याची ऐपत होईल म्हणजे तो 'कर्जमुक्त' होईल.

### शेतकरी कर्ज बुडवा नाही

शेतकरी कर्ज बुडवा नाही, पण सरकारचे धोरणच असे आहे, की तो कायम कर्जातच राहिला पाहिजे. तोट्यात असून सुद्धा शेतकरी, बायकोचे दागिने मोडून तर कधी घरातील शेळी, बकरी विकून तर कधी खासगी सावकाराचे कर्ज काढून बँकेचे कर्ज नवे-जुने करतो. ऊस, कांदा, कापूससारख्या नगदी पिकांना चांगले दर मिळाले, तर शेतकऱ्यांनी कर्जफेड केली आहे हे बँकांचे दप्तर सांगेल. आपल्या मुख्यमंत्र्यांनी पण म्हटले, की कर्जमाफीच्या आधी ९५ टक्के शेतकऱ्यांनी कर्ज भरलेले आहे. सरकारने शेतीमालाच्या व्यापारातून बाजूला व्हावे म्हणजे शेतकऱ्याला त्याच्या शेतीत नफा होऊन तो आपोआपच कर्ज मुक्त होईल.

**सीमा नरोडे**
मो.७३५०५२५८७२

# 'मनरेगा'चा नवा अवतार 'व्हीबी-रामजी'

वीस वर्षांपासून अमलात असणाऱ्या ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) च्या जागी मोदी सरकारने 'विकसित भारत ग्यारंटी फॉर रोजगार अँड आजीविका मिशन (ग्रामीण) उर्फ VB G - RAM -G असे लांबलचक नाव देऊन नवीन कायदा पास करून योजना आणली. ग्रामीण रोजगार,मनरेगा वर काम करणाऱ्या अनेक तज्ज्ञांनी नवीन कायद्याच्या तरतुदींवर बरीच टीका केली बरीच होती. पण त्याला न जुमानता केंद्र सरकारने डिसेंबर २०२५ मध्ये मनरेगा कायदा रद्द करून नवीन कायदा पारित केला होता.

आता १ जुलै २०२६ पासून व्हीबीरामजी योजना कार्यान्वित झाली आहे. पहिल्या महिन्याची आकडेवारी केंद्र सरकारने जाहीर केली आहे. त्यानुसार जुलै महिन्यात ७० लाख कुटुंबातील व्यक्तींना ७.५ कोटी श्रम दिवसांचे काम दिले गेले.जुलै २०२५ मध्ये ज्यावेळी मनरेगा अमलात होती त्या महिन्यात हे आकडे अनुक्रमे १४० लाख कुटुंबातील व्यक्तींना १५ कोटी श्रम दिवस असे होते. म्हणजे पहिल्याच महिन्यात नवीन योजनेने फक्त ५० टक्के रोजगार निर्मिती केली.

गेल्या पाच वर्षात मनरेगा सुरू असताना सरासरी दर महिन्याला २२ कोटी श्रम दिवसांचा रोजगार दिला गेला. यावरून नवीन योजना कोणत्या दिशेने जाणार याचे सुतोवाच होऊ लागले आहे.मनरेगा योजना मागेल त्याला, त्याच्या गावात काम अशा स्वरूपाची होती. ग्राम पंचायतीला काम काढायचे अधिकार सुपूर्द केलेले होते. गावाला कोणत्या स्थानिक पायाभूत सुविधांची गरज आहे त्याप्रमाणे ग्राम पंचायत आपल्या गावातील प्रकल्प ठरवायची..

त्यातील एकूण मजुरांच्या ७५ टक्के महिला असायच्या. त्यांना गावातच काम मिळाल्यामुळे घरकाम, मुलांकडे लक्ष देता येत होते.नवीन योजनेत कोणत्या गावात काय प्रकारचे काम असणार यासाठी केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेणे अनुस्युत आहे. म्हणजे निर्णयाचे केंद्रीकरण होणार आहे.

राजकीय अर्थव्यवस्थेत मेरिट कमी पॉवर डायनॅमिक्स जास्त काम करत असते. उघड आहे ग्रामीण भागातील राजकीय दृष्ट्या ताकदवर, राज्यकर्त्या पक्षाचे धन दांडगे आपल्याला हवी असणारी कामे / प्रकल्प मंजूर करून घेणार. ती कामे जनतेच्या





निकडीच्या प्राधान्यक्रमातील असतीलच याची शाश्वती नाही.असे काम मागणाऱ्या मजुराच्या गावात असेलच असे नाही. त्यामुळे मजुरांची विशेषतः महिलांची कुचंबणा होणार आहे. काम का घर अशा द्विधावस्थेत त्या राहणार आहेत. मुलांना टाकून दुसऱ्या गावात त्या जाण्याची शक्यता कमीच. त्या देशातील श्रम बाजारात महिलांचा सहभाग कमी होत असताना त्यात ही नवीन भर पडणार आहे.

पूर्वीच्या मनरेगा योजनेचा वेतनावरील १०० टक्के खर्च आणि लागणाऱ्या मालाचा (सिमेंट वगैरे) ७५ टक्के खर्च केंद्र सरकार उचलत असे. मालावर होणाऱ्या खर्चाचा फक्त २५ टक्के खर्च राज्य सरकारांवर पडत असे. आता वेतन आणि लागणाऱ्या मालाच्या एकूण खर्चाच्या ४० टक्के खर्च त्या त्या राज्याने उचलायचा आहे. राज्य सरकारांच्या तिजोरीवरील ताण लक्षात घेता त्यांनी अशा रोजगार निर्मिती कार्यक्रमाला कमी प्राधान्य देणार हे उघड आहे.

मनरेगा जाऊन व्हीबी रामजी येणार हे नक्की झाल्यावर अनेक राज्य सरकारांचा ग्रामीण रोजगार हमी योजना राबवण्याचा उत्साह ओसरू लागला आहे. हे पुढील आकडेवारीवरून दिसते.या वित्त वर्षाच्या पहिल्या चार महिन्यात एप्रिल-जुलै, मनरेगा तीन महिने आणि व्हीबीरामजी १ महिना कार्यरत आहे. त्या चार महिन्यात फक्त ७० कोटी श्रम दिवसाचे वेतन दिले गेले. २०२३-२४ आणि २०२५-२६ वित्त वर्षात याच चार महिन्याचे आकडे अनुक्रमे १२८ कोटी आणि ११९ कोटी श्रम दिवस होते.

VBG RAM -G ची इमारत मनरेगाच्या कबरीवर उभी केली जाणार आहे अशी टीका अनेकांनी केली होती. त्याचे प्रत्यंतर पहिल्या महिन्या पासून येऊ लागले आहे. डावे फॅशन म्हणून सारखे गरिबांच्या नावाने गळा काढतात अशी टीका केली जाते. या अर्थ अडाणी लोकांना हे कळत नाही की याचा संबंध शंभर कोटी लोकांच्या क्रयशक्तीशी आणि म्हणून देशाच्या जीडीपी वृद्धीशी आहे. याचा संबंध देशातील सामाजिक, राजकीय असंतोषशी आहे. याचा संबंध शासनाला कल्याणकारी योजनांवर कमी पैसे खर्च करावे लागण्याशी आहे.ही उजवी मंडळी स्वार्थी आहेतच पण ही मंडळी व्यापक आणि दीर्घकालीन विचार करू शकत नाहीत हा खरा प्रॉब्लेम आहे.

**संजीव चांदोरकर**

## खरीप हंगामातील 'वारे झाले न्यारे'

ग्रामीण भागात आजही सामाजिक प्रतिष्ठा शेतीशी निगडीत असल्याने जमिन ओस पडू नये,यासाठी माणसे जीवाचा आटापिटा करतात.जे असेल नसेल विकतात आणि शेती करतात. मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी सुरुवातीपासूनच पावसाने दगा दिला. त्यामुळे सर्वाच्यांच कपाळावर चिंतेच्या आठ्या उमटल्या आहे. ही स्थिती सुधारण्याची शक्यता नाही, तर चिघळण्याचीच अधिक आहे. शेतीच्या दृष्टीने जुलै महिना महत्वाचा ठरतो. त्या खालोखाल ऑगष्ट महिन्याला महत्व आहे. हे वास्तव असले तरी निसर्गाने पुन्हा शेतक-यांविरुध्द एल्गार पुकारलेला आहे.

पाऊस गेल्या कित्येक दिवसापासून गायब आहे. एकंदर हवामान बदलाचे परिणाम अधिकाधिक बेभरवश्याचे होत आहे. काही ठिकाणी भरपूर पाऊस तर काही ठिकाणी तूरळक अशी विरोधाभासाची स्थिती आहे. जमतेम पावसावर खरीपाचे क्षेत्र पेरणी खाली आले आहे. यंदा भरगोस उत्पन्न होईल या आशेने शेतकऱ्यांनी उधार पाधार करून प्रेरणी केली. नियमित कर्ज भरणारा शेतकरी तो सुद्धा या वर्षी थकित झाला. पावसाने दिलेल्या खंडाने व कडक उन्हामुळे पिके सुकू लागली आहे. तर काही ठिकाणी पिकांची वाढ खुंटली आहे. त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होत आहे. नापिकी शेतक-यांच्या पाचीला पुजलेली आहे. शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे म्हटल्या जाते पण निर्सग व सरकार दरबारी शेतक-यांची अवहेलनाच होत आहे. पावसाविणा आलेल्या संकटामुळे शेतकरी हतबल झाला असून कल्याणकारी आणि विकसीत राज्याचा टेभा मिरवणा-यांना हे नक्कीच भूषणावह नाही.

**गंगाधर घुरडे**
वाठोडा शुक्लेश्वर

## खालावलेली नीतीमत्ता

तेलंगणामधे दहाव्या इयत्तेत शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांनी आपल्याच शाळेच्या मुख्याध्यापिकेचा पैशाच्या लालसेने २७ वेळा चाकूचा वार करून अंत केला. त्या विद्यार्थ्यांनी त्या पैशातून महागडा आय फोन खरेदी केला. रोख रक्कमही त्यांच्याकडे मिळाली. दुसऱ्या एका घटनेत केरळमधील एका तेरा वर्षाच्या मुलीने महागडा फोन आणि दुचाकी घेण्यासाठी मित्रांच्या मदतीने आजोबांची हत्या केली. तिसऱ्या एका घटनेत एका वयस्कर बाईंना मुंबई पुणे रेल्वे प्रवाशांची साखळी चोर म्हणून पोलिसांनी अटक केली. या तिनही घटना मन सुन्न करणाऱ्या आहेत. सध्याच्या विभक्त कुटुंब पद्धतीमुळे मुलांचे पालकत्व मोबाईलकडे सोपवले गेले आहे असे मत एका खटल्याच्या निमित्ताने न्यायाधीशांनी नोंदवले आहे.शिक्षणाचे ध्येय पैसा मिळवणे आणि स्वैराचार असे झाले आहे. हे बदलण्यासाठी सर्वांना धर्मशिक्षण मिळण्याची आवश्यकता आहे.केवळ भौतिकविकास मनुष्याला सुखी करु शकत नाही;मनोविकास आवश्यक आहे. त्यासाठी मनाची मशागत करायला हवी. उत्तम संस्काराशिवाय हे साध्य होऊ शकत नाही.

**संध्या काटदरे**

## महागाईचा नवा डोस, आता साखरही झाली कडू!

श्रावणाच्या ऐन सणासुदीच्या दिवसात एकीकडे आधीच गॅस सिलिंडर, खाद्यतेल, डाळी आणि इतर सर्वच जीवनावश्यक वस्तू आणि भाज्यांचे भाव वाढलेले असताना गेल्या काही दिवसांपासून साखरेच्या दरातही सातत्याने वाढ होत आहे. महिन्याभरापूर्वी जी साखर ३८ ते ४० रुपये किलो दराने मिळत होती ती आता थेट तब्बल ६० ते ६५ रुपयांवर जाऊन पोहोचली आहे.दुसरीकडे श्रावण महिन्यानंतर येणारे गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि दिवाळी या सणांमुळे मिठाई उत्पादक आणि घरगुती ग्राहकांकडून साखरेची मागणी प्रचंड वाढली असून साखरेचे दर येणाऱ्या काही दिवसात शंभरी गाठतील अशी भीती सर्वसामान्यांकडून व्यक्त होत आहे. अशा महागाईच्या परिस्थितीत सर्वसामान्यांच्या सण-उत्सवांचा आनंद साखरेच्या चढ्या दरात विरघळून जाऊ नये, यासाठी सरकारने महिनाभराच्या वाढत्या आलेखाची दखल घेऊन साखरेच्या खुल्या बाजारातील दरवाढीवर नियंत्रण ठेवावे.सतत वाढणाऱ्या महागाईमुळे गृहिणींचे बजेट कोलमडू नये, ही अपेक्षा आहे.


**-प्रदीप मोरे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# यवतमाळ नगर परिषदेचा कारभार बेभरोसे..!

## मुख्य रस्त्यांवरील एलईडी व स्ट्रीट लाईट बंद — नगरपरिषद प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी






**यवतमाळ, दि. २१ :** यवतमाळ नगरपरिषदेचा कारभार सध्या नेमका कोणाच्या भरोशावर सुरू आहे, असा संतप्त सवाल शहरातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासकीय राजवट संपल्यानंतर जनतेने निवडून दिलेले नगराध्यक्ष, नगरसेवक व पदाधिकारी नगरपरिषदेत सक्रियपणे उपलब्ध राहून शहराच्या विकासाला दिशा देतील, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहता नागरिकांच्या अपेक्षांना मोठा धक्का बसल्याचे चित्र आहे.

नगरपरिषदेत लोकप्रतिनिधींची उपस्थिती आणि नागरिकांशी थेट संवाद हा स्थानिक स्वराज्य संस्थेचा गाभा मानला जातो. मात्र गेल्या एक-दोन महिन्यांपासून नगराध्यक्ष, पदाधिकारी व संबंधित लोकप्रतिनिधी नियमितपणे उपलब्ध नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. विविध कामांसाठी नगरपरिषदेत येणाऱ्या नागरिकांना संबंधितांची भेट न झाल्याने वारंवार चकरा माराव्या लागत असल्याचे सांगितले जात आहे. लाखो रुपये खर्चून उभारलेल्या केबिन धूळ खात आहेत नगराध्यक्ष व पदाधिकाऱ्यांसाठी प्रशस्त आणि आकर्षक केबिन तयार करण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाने मोठा खर्च केला. रंगरंगोटी, फर्निचर, दुरुस्ती आणि इतर सुविधांवरही निधी खर्च करण्यात आला. नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांच्या केबिनचीही मोठ्या प्रमाणात सजावट करण्यात आली. मात्र या केबिनचा नियमित वापर होत नसल्याची चर्चा शहरात सुरू आहे. नगराध्यक्षांचा कारभार कार्यालयात नियमितपणे न चालता घरूनच चालत असल्याचा दावा काही प्रत्यक्षदर्शी नागरिकांकडून करण्यात येत आहे. हा दावा खरा असेल तर जनतेच्या पैशातून उभारण्यात आलेल्या प्रशस्त कार्यालयीन सुविधांचा उपयोग नेमका कशासाठी, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कारभार घरूनच करायचा असेल तर लाखो रुपये खर्चून केबिन उभारण्याची गरज काय होती? असा सवालही नागरिक करत आहेत. शहरातील रस्ते, स्वच्छता, नाल्या, पथदिवे, वाहतूक व्यवस्था आणि मूलभूत नागरी सुविधांबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी प्रलंबित आहेत. मात्र या समस्यांवर ठोस उपाययोजना करण्याऐवजी कार्यालयीन केबिन आणि सुविधांवर होणारा खर्च अधिक महत्त्वाचा ठरतोय का, अशी टीका होत आहे. लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर शहरासाठी विकासाचा स्पष्ट अजेंडा राबविला जाईल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात अनेक प्रश्न अद्यापही जैसे थे असल्याने निवडणूक झाली, लोकप्रतिनिधी आले; पण नागरिकांच्या समस्यांचे काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

**मुख्य रस्त्यांवरील एलईडी, स्ट्रीट लाईट बंद**




**रम्यान, यवतमाळ शहरातील प्रमुख रस्त्यांसह विविध भागांमध्ये बसविण्यात आलेले एलईडी आणि स्ट्रीट लाईट अनेक ठिकाणी बंद अवस्थेत असल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. नगरपरिषदेने मोठा निधी खर्च करून पथदिवे आणि एलईडी यंत्रणा उभारली; मात्र देखभाल-दुरुस्तीअभावी त्याचा अपेक्षित फायदा नागरिकांना मिळत नसल्याची परिस्थिती आहे. अनेक भागांमध्ये रात्री अंधाराचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. अंधाऱ्या रस्त्यांचा फायदा अवैध धंदे करणारे आणि गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक घेऊ शकतात, अशी भीती नागरिक व्यक्त करीत आहेत. त्यामुळे बंद पथदिवे तातडीने सुरू करण्याची मागणी होत आहे**

# खुनाच्या प्रयत्नातील फरार आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात

## नांदेडहून उमरखेडमध्ये येताच डीबी पथकाची शिताफीने अटक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २१ :** खुनाचा प्रयत्न करून गेल्या काही दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देत फरार असलेल्या आरोपीला उमरखेड पोलिसांच्या डीबी पथकाने अखेर अटक केली. नांदेडहून उमरखेडकडे येत असल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले. ही कारवाई २० ऑगस्ट रोजी सायंकाळी करण्यात आली.

आकाश रविप्रसाद दीक्षित (वय २५, रा. शिवाजी वॉर्ड, उमरखेड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ९ ऑगस्ट रोजी खुनाचा प्रयत्न केल्यानंतर आरोपी फरार झाला होता. याप्रकरणी उमरखेड पोलिस ठाण्यात गंभीर गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून, तेव्हापासून पोलिस त्याचा शोध घेत होते. दरम्यान, आरोपी नांदेडहून उमरखेड शहरात येत असल्याची गोपनीय माहिती डीबी पथकाला मिळाली. माहितीची खातरजमा करून पथकाने तातडीने सापळा रचला. आरोपी शहरात दाखल होताच त्याला घेराव घालून ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई डीबी पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक शरद लोहकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप ठाकूर व अतुल तागडे यांनी केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमर खिल्लारे करीत आहेत.

# रंगकाम करणाऱ्या वडिलांच्या कष्टांना मुलाच्या यशाची सलामी..! हर्षल पाटील 'टॅक्स असिस्टंट'

## अठरा विश्व दारिद्र्याच्या घरातून मुंबईत शासकीय नोकरीपर्यंतचा संघर्षमय प्रवास

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. २१ :** हलाखीची आर्थिक परिस्थिती, वडिलांचा रंगकामाचा व्यवसाय, आईची मिळेल ते काम करण्याची धडपड आणि घरातील मर्यादित साधने अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पाटीपुरा परिसरातील हर्षल अनिल पाटील या तरुणाने एमपीएससीच्या परीक्षेत यश मिळवत वस्तू व सेवा कर विभागात टॅक्स असिस्टंट म्हणून मुंबई येथे शासकीय सेवेत प्रवेश केला आहे. हर्षलच्या या यशामुळे कष्टकरी कुटुंबाच्या संघर्षाला जणू यशाचे शिखर लाभले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या 'शिका' या संदेशाला जीवनाचा आधार मानून हर्षलने शिक्षणाची कास सोडली नाही. वडील रंगकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असताना आईनेही मिळेल ते काम करून मुलांच्या शिक्षणाला हातभार लावला. हर्षलला एक धाकटी बहीण असून, चार जणांच्या कुटुंबाचा गाडा चालवताना पालकांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. विशेष म्हणजे, हर्षलने महागडे क्लासेस किंवा खासगी शिकवणीचा आधार न घेता अभ्यासिकेत तासन्तास अभ्यास करून एमपीएससी परीक्षेची तयारी केली. कोविड काळात स्वतः शिकवणी वर्ग सुरू करून परिसरातील विद्यार्थ्यांना शिकवतानाच त्याने स्वतःच्या स्पर्धा परीक्षेची तयारीही सुरू ठेवली. इतरांच्या हातात पुस्तक देताना त्याने स्वतःच्या आयुष्याचेही पुस्तक घडविले आणि अखेर त्याच्या मेहनतीला यश मिळाले. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या यवतमाळ दौऱ्यात पाटीपुराशी असलेल्या ऋणानुबंधाचा उल्लेख झाला होता. आता याच पाटीपुरातील कष्टकरी कुटुंबातील तरुणाने मुंबईत शासकीय सेवेत स्थान मिळवले आहे. हर्षलच्या संघर्षाची आणि यशाची दखल केंद्रीय मंत्री आठवले यांनीही घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. हर्षलचे यश हे केवळ एका तरुणाचे यश नसून 'परिस्थिती कितीही कठीण असो, शिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर नशिबाचा चेहराही बदलता येतो' याचे प्रेरणादायी उदाहरण ठरले आहे.

# आदिवासी विद्यार्थी-युवकांचा जिल्हा परिषद समोर बेमुदत लाक्षणिक उपोषण..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**शासनाच्या प्रलंबित धोरणांवर संताप**



**यवतमाळ, दि. २१ :** आदिवासी विद्यार्थी आणि बेरोजगार युवकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी यवतमाळ जिल्हा परिषदेसमोर बेमुदत लाक्षणिक उपोषण आंदोलन सुरू करण्यात आले आहे. अनेक वर्षांपासून शैक्षणिक, रोजगार आणि वसतिगृहाशी संबंधित प्रश्न प्रलंबित असल्याने आंदोलकांनी शासनाच्या भूमिकेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

आदिवासी विशेष पदभरतीअंतर्गत १२ हजार ५०० हून अधिक रिक्त पदांची भरती तातडीने सुरू करावी, तसेच पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील प्रलंबित १७ संवर्गांची भरती प्रक्रिया पूर्ण करावी, अशी प्रमुख मागणी आहे. तलाठी भरतीत पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील जागा जिल्हानिहाय स्पष्ट करून नवीन जाहिरात काढावी, तसेच पवित्र प्रणालीतील शिक्षक भरतीमध्ये आदिवासी समाजाच्या आरक्षित जागा उपलब्ध करून द्याव्यात, अशीही मागणी करण्यात आली. १४ ऑगस्ट २०२६ रोजीचा वसतिगृहविषयक शासन निर्णय रद्द करावा, TRTIच्या जाचक अटी शिथिल करून प्रशिक्षण वर्ग सुरू करावेत, वसतिगृहातील DBT योजना रद्द करून पूर्वीप्रमाणे केंद्रीकृत भोजन व्यवस्था सुरू करावी आणि प्रवेशासाठीची वयोमर्यादा हटवावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. वसतिगृह व आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला १० कोटी रुपयांचे जीवनविमा संरक्षण द्यावे, तसेच गडचिरोलीतील आश्रमशाळेतील अल्पवयीन मुलीच्या हत्येप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली. मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला असून शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे.

# थोडक्यात



## बेंबळा धरणाच्या विसर्गाने ३ हजार एकर शेती बाधित..! शेतकऱ्यांना हेक्टरी ७५ हजारांची नुकसानभरपाई द्या

**यवतमाळ :** बेंबळा धरणाचे तब्बल २० दरवाजे एकाच वेळी उघडल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग झाला. त्यामुळे बाबूळगाव तालुक्यातील नांदुरा, नांदे, सावंगी, वाटखेड, हस्तापूर, वाटखेड खुर्द, वाटखेड बुद्रुक, पालोती, प्रतापपूर, कानगोवकुळ, खडकसावंगा व पिंपळशेंडा परिसरातील सुमारे ३ हजार एकर शेती बाधित होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचा आरोप आम आदमी पक्षाने केला आहे. पुराच्या पाण्यामुळे उभी पिके, सुपीक माती, पाणी मोटारी, पाइपलाइन तसेच अन्य शेती साहित्याचे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. धरणाचे दरवाजे उघडण्यापूर्वी संभाव्य शेती नुकसानीचा विचार करण्यात आला होता का, पाण्याचा विसर्ग किती होता आणि दरवाजे किती काळ उघडे ठेवण्यात आले, याची सखोल चौकशी करण्याची मागणी पक्षाने केली आहे.

बाधित सर्व गावांमध्ये तातडीने शेतनिहाय पंचनामे करून पीक, सुपीक माती, विहीर, पंप, पाइपलाइन व इतर नुकसानीची नोंद घ्यावी. सुमारे ३ हजार एकर क्षेत्राचे विशेष सर्वेक्षण करून बाधित शेतकऱ्यांना प्रति हेक्टर ७५ हजार रुपये तातडीची नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच विसर्गाची अधिकृत माहिती सार्वजनिक करून निष्काळजीपणा आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले असून, बेंबळा प्रकल्प विभागालाही प्रत देण्यात आली. शेतकऱ्यांना तातडीने न्याय न मिळाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आपतर्फे देण्यात आला.

यावेळी जिल्हा समन्वयक मोबीन शेख, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत देवकते, जिल्हा आरटीआय प्रमुख अविनाश धनेवार, शहर समन्वयक आकाश चमेडीया, गुणवंत इंदूरकर, शुभम चांदेकर, तालुका महिला अध्यक्ष उषा श्रीराम, उमरखेड शहर अध्यक्ष बल्लेश्वर टाले आदी उपस्थित होते.

# तातार शाहाबाबा दर्गाहचे मुजावर अयाज बाबू अपर पोलीस अधिक्षकांच्या हस्ते सन्मानित

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २१ :** उमरखेड शहराला सुफी संतांची भूमी म्हणुन ओळख लाभली आहे. उमरखेड च्या अनेक भागात सुफी संतांची समाधी स्थिरावली आहे. या विभुतीपैकी तातार शाह बाबाही याच भूमीत अवतारीत झाले आहेत . त्यांचा ऊर्स संदल दरवर्षीप्रमाणे यंदाही पारंपारिक पद्धतीने सर्वधर्म समभावाचे काटेकोरपणे आचरण अवलंबीत उत्साहात साजरा झाला, संतांच्या शिकवणीनुसार दर्गाहचे मुजावर अयाज बाबू यांच्या मार्गदर्शनानुसार शासनाच्या नियमानुसार अनुयायांनी शांततामय पद्धतीने उत्सव साजरा केल्याबद्दल अप्पर पोलीस अधिक्षक अशोक थोरात यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.


दि . १४ ऑगस्ट रोजी शहरात पार पडलेल्या या ऊर्स संदलमध्ये दर्गाचे सर्व कमिटी व सदस्यांनी पोलीस प्रशासनाने घालून दिलेल्या अटीनुसार शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करीत शांततेत ऊर्स संदल मिरवणूक शहरातील पारंपारिक मार्गाने काढून तातार बाबांच्या सर्वधर्म समभाव शिकवणीचा शांततामय मार्गाचा पायंडा कायम ठेवल्याबद्दल पोलीस प्रशासनाकडून दर्गाह कमेटीचे कौतुक करण्यात आले . सर्व जातीधर्मिक लोकांशी निगडीत असलेल्या या पवित्र ऊर्स उत्सवाच्या आयोजनाची परंपरा अखंडीत कायम राहावी यासाठी पोलीस प्रशासनाने त्यांच्या कार्याची दखल घेत उमरखेड येथे यवतमाळ जिल्ह्याचे अप्पर पोलीस पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या शुभहस्ते मुजावर अयाज बाबु व वजाहत मुजावर यांना सन्मानित करण्यात आले . यावेळी स्टेशनचे ठाणेदार शंकर पांचाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मी मलकुवार ,गोपनीय विभागाचे संतोष राठोड ,किरण राठोड यांच्यासह दर्गाह कमेटीचे सदस्य हजर होते .

# मुडाणा–गौळ मार्गावर वृक्षांची अवैध कत्तल उघड..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**लाकडाने भरलेला ट्रक जप्त**





**महागाव, दि. २१ :** मुडाणा ते गौळ मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या वृक्षांची पूर्वपरवानगी न घेता कथितरीत्या अवैध कत्तल करून लाकडाची वाहतूक केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता शुभम काळे यांच्या सतर्कतेमुळे लाकडांनी भरलेला ट्रक पकडण्यात आला असून तो पुढील चौकशी व कारवाईसाठी वन विभागाच्या ताब्यात देण्यात आला आहे.

मुडाणा-गौळ मार्गावर चार ते पाच मनुष्य क्रेन-कटरच्या साहाय्याने रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे तोडत होते. याचवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता शुभम काळे या मार्गाने जात असताना त्यांच्या निदर्शनास हा प्रकार आला. त्यांनी संबंधित व्यक्तींकडे झाडे तोडण्याबाबतची परवानगी आहे का, अशी विचारणा केली असता कोणतीही पूर्वपरवानगी नसल्याचे समोर आले. यानंतर काळे यांनी तातडीने वन विभाग आणि पोलीस प्रशासनाला या प्रकाराची माहिती दिली. कारवाईची चाहूल लागताच क्रेनचा चालक वाहनासह घटनास्थळावरून पसार झाल्याची माहिती समोर आली. लाकडाने भरलेला ट्रक जप्त करून पुढील कारवाईसाठी महागाव येथील वनविभाग कार्यालयाच्या आवारात ठेवण्यात आला आहे.

## जाहिरनोटीस

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, पुसद, जि. यवतमाळ यांचे कार्यालय, पुसद**
**एम.आर.सी. ८१/३५८/२०२६**
**दिनांक : १०/०८/२०२६**

**जन्मनोंदणीबाबत हरकती मागविण्यात येत आहेत**

सर्व नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री. सौ. संदीप सुंदरसिंग चव्हाण, रा. कृष्णानगर, ता. पुसद, जि. यवतमाळ यांनी त्यांचे वहिणीचे नाव श्रीमती वच्छला सुंदरसिंग चव्हाण, रा. कृष्णानगर, ता. पुसद, जि. यवतमाळ यांची जन्मनोंद करण्यासाठी अर्ज सादर केला आहे.

अर्जदाराच्या अर्जानुसार वच्छला सुंदरसिंग चव्हाण यांचा जन्म दिनांक ०१/०२/१९९० रोजी त्यांच्या राहत्या घरी, मौजा कृष्णानगर, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे झाला आहे. सदर जन्माची नोंद उपलब्ध नसल्यामुळे जन्मनोंदणी करण्यासाठी अर्जदाराने आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांसह दिनांक ०५/०८/२०२६ रोजी अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.

सदर प्रकरणी जन्म-मृत्यू नोंदणी कायद्याच्या कलम १३(३) अन्वये जन्मनोंद करण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित आहे. त्यामुळे सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार संदीप सुंदरसिंग चव्हाण, रा. कृष्णानगर यांच्या अर्जानुसार वच्छला सुंदरसिंग चव्हाण यांच्या जन्मनोंदणीबाबत कोणाची काही हरकत, आक्षेप अथवा दावा असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत स्वतः उपस्थित राहून अथवा आपल्या वकिलामार्फत या कार्यालयात लेखी स्वरूपात आवश्यक पुराव्यांसह हरकत/आक्षेप नोंदवावा. निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, संबंधित प्रकरणी कोणास काही म्हणणे नाही असे गृहीत धरून उपलब्ध कागदपत्रे व नियमानुसार सदर अर्जावर पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी प्रसिद्धीसाठी देण्यात येत आहे.

**स्वाक्षरी/-**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, पुसद**
**जि. यवतमाळ**

# शेजारी राहणाऱ्या महिलांचा 'फ्रीस्टाइल' राडा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**परस्परविरोधी गुन्हे दाखल**

**झरी, दि. २१ :** मुकुटबन येथील वार्ड क्रमांक १ मध्ये शेजारी राहणाऱ्या दोन महिलांमधील किरकोळ वादाचे रूपांतर थेट हाणामारीत झाले. बुधवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घडलेल्या या घटनेनंतर दोन्ही महिलांनी एकमेकींविरुद्ध तक्रारी दाखल केल्याने मुकुटबन पोलिसांनी परस्परविरोधी गुन्हे नोंदविले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शीतल रवी अक्केवार (३५) आणि वनमाला सुरेश बोरवार (४२), दोघीही रा. मुकुटबन, या शेजारी राहतात. वनमाला बोरवार या आरसीसीपीएल सिमेंट कंपनीत मजुरी करतात. बुधवारी कामावरून घरी आल्यानंतर त्या घरासमोरील अंगणात कपडे धूत असताना शीतल अक्केवार यांनी कंपनीत काम मिळत नसल्याबाबत साहेबांकडे आपण काही सांगितले का, अशी विचारणा केली. यावरून दोघींमध्ये वाद झाला. वाद वाढल्यानंतर शीतल यांनी शिवीगाळ करून मारहाण केल्याचा आरोप वनमाला यांनी केला आहे. यात त्यांच्या डोक्याला, उजव्या डोळ्याला आणि खांद्याला दुखापत झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, वनमाला यांचे पती सुरेश बोरवार व शेजाऱ्यांनी मध्यस्थी करून भांडण सोडविले. वनमाला यांच्या तक्रारीवरून शीतल अक्केवार यांच्याविरुद्ध BNS कलम ११८(१), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर शीतल यांनीही तक्रार दाखल केल्याने वनमाला बोरवार यांच्याविरुद्ध BNS कलम ११५(२), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुदाम आसोरे व बीट जमादार अमित पोयम करीत आहेत.

# जलसंवर्धनासाठी 'महा वॉकेथॉन'मध्ये उसळला जनसागर !

## माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांचा जन्मदिवस

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. २१ :** मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जन्मदिवसानिमित्त आयेजित आज २१ ऑगस्ट रोजी जिल्ह्यात "जलसंधारण दिन" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त जलसंधारण सप्ताहांतर्गत मृद व जलसंवर्धनाविषयी जनजागृतीसाठी समता मैदान येथे आयोजित 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' स्पर्धेसाठी जिल्ह्यातील २४ हजार २७४ नागरिकांनी नोंदणी करून उत्स्फूर्त सहभाग नोंदवत अभूतपूर्व उपस्थिती नोंदविली. तसेच माती वाचवा, पाणी जपा आणि सुरक्षित भविष्य घडवा असा संदेश दिला. स्पर्धकांना योगासनाचे धडे, मृद व जलसंवर्धनाची शपथ देण्यात आली. त्यानंतर सकाळी ७ वाजताच्या सुमारास आमदार किसन वानखेडे व जिल्हाधिकारी विकास मीना यांनी महा वॉकेथॉनला हिरवी झेंडी दाखवून महा वॉकेथॉनला सुरुवात करण्यात आली. ३ किलोमीटरची महा वॉकेथॉन स्पर्धा संपल्यानंतर या वॉकेथॉन स्पर्धेतील ईश्वर चिठ्ठीने विजयाची निवड करण्यात आली. यात २५ हजारांचे प्रथम पारितोषिक शिवम संदिप बुटले, १५ हजारांचे द्वितीय पारितोषिक वेद यादव तर १० हजारांचे तृतीय पारितोषिक पायल रेड्डी या विद्यार्थ्यांनी पटकावला. या विजेत्यांना रोख बक्षिसे व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यासोबतच १८ स्पर्धकांना प्रत्येकी ३ हजार रुपये प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. यावेळी आमदार किसन वानखेडे, नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके, जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष धोत्रे, उप वनसंरक्षक नवनीत मिश्रा, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, तरुण-तरुणी, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पुसद, जि. यवतमाळ यांचे कार्यालय, पुसद**

## जाहिरनोटीस

**आवेदक- श्री.सी./ सुरेश शामराव तडसे रा. माणिकडोह ता. पुसद जि. यवतमाळ**

**अनावेदक- मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद सचिव, ग्राम पंचायत, माणिकडोह ता. पुसद जि.यवतमाळ**

ज्याअर्थी अर्जदार नामे श्री. सौ सुरेश शामराव तडसे पुसद जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुलगी नामे श्री/सी/श्रीमती पूर्वा सुरेश तडसे रा माणिकडोह यांच्या जन्माची नोंद न्यायालयात जन्म / मृत्यू नोंदणी कायद्याचे कलम १३ (३) प्रमाणे दिनांक १०/१२/२००२ रोजी त्यांच्या जन्म त्यांचे राहत्या घरी मौजा माणिकडोह ता. पुसद जि. यवतमाळ येथे झाला आहे. या बाबत यांच्या जन्माची नोंद मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद सचिव, ग्रामपंचायत माणिकडोह पंचायत समिती पुसद यांना घेण्याकरीता आदेश देण्यात यावा याकरीता दि. १७/०८/२०२६ रोजी अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहे. या करीता एम.आर.सी. ८१/ ४०२ /२०२६ तहसिल कार्यालय, पुसद च्या वतीने मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद सचिव, ग्रामपंचायत माणिकडोह यांना पत्र देण्यात येत आहे. ज्याअर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार नामे, श्री. सुरेश शामराव तडसे रा. माणिकडोह स्वतः आई/ मुलगा/ मुलगी / वडील /भाऊ बहिण/पूतण्या/आजोबा नामे श्री सौ. पूर्वा सुरेश तडसे रा माणिकडोह ता. पुसद यांच्या जन्माची नोंदणी बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हि जाहिर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपण स्वत. हजर अगर आपले वकिला मार्फत हजर राहुन आपली हरकत अथवा आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवावा, अन्यथा कोणालाही काहीही सांगवयाचे नाही असे गृहीत धरुन सदरहु अर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिली आहे.

**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, पुसद**

# देखभालीकरीता निधी नसल्याने मलशुध्दीकरण केंद्र बंद

■ दुसरेही युनिट बंद पडण्याच्या मार्गावर ■ १५० कोटी रू. खर्च पाण्यात जाणार

■ आरोग्यदाई योजनेला भंगारात जाण्यापासून वाचवा ■ माजी नगरसेवक प्रदीप बाजड यांनी केली मागणी

**अमरावती/का.प्र..**

जल प्रदूषण रोखण्यासाठी २ मलनिस्सारण शहरात केंद्र कार्यरत होती.परंतु प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या दुर्लक्ष व निष्क्रियतेमुळे १ मलनिस्सारण केंद्र गेल्या ३ वर्षांपासून देखभालीला केवळ १ कोटी ४० लक्ष निधीच्या अभावाने बंद पडले आहे.अशा महत्वपूर्ण कामाकरीता डी.पी.डी.सी मधुन पालकमंत्री यांना म.न.पा.कडून वारंवार मागणी असूनही निधी मिळू नये आणि लोकप्रतिनिधी आग्रही असू नये ही बाब बेजबाबदारपणाची असल्याचा आरोप माजी नगरसेवक प्रदीप बाजड यांनी केला आहे.

संपूर्ण शहरातील आरोग्यदायी ठरणारी व म.न.पा.चा स्वच्छतेचा मोठा खर्च कमी करणारी भुयारी गटर योजना ही शहरासाठी महत्वपूर्ण आहे. शहरातील घाणपाणी पेढी नदीत जाऊ नये म्हणून २ मलनिस्सारण केंद्र लालखडी येथे अंबा नाल्या लगत निर्माण होऊन गेल्या १३ वर्षांपासून कार्यान्वित झाली. शहरातील घाण सांडपाणी नदीत सोडण्यापुर्वी मल वेगळा करून पाणी शुध्दीकरणाची प्रक्रिया करून नंतरच पाणी नदीत सोडून जल प्रदूषण रोखण्यासाठी २ मलनिस्सारण केंद कार्यरत होती.परंतु प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्या दुर्लक्ष व निष्क्रियतेमुळे १ मलनिस्सारण केंद्र गेल्या ३ वर्षांपासून देखभालीला केवळ १ कोटी ४० लक्ष निधीच्या अभावाने बंद पडले. अशा महत्वपूर्ण आवश्यक कामाकरीता डी.पी.डी.सी मधुन मा.पालकमंत्री यांना म.न.पा.कडून वारंवार मागणी असुनही निधी मिळू नये आणि लोकप्रतिनिधी आग्रही असु नये ही बाब बेजबाबदारपणाची आहे.त्यातच आता दुसरेही युनिट बंद पडण्याच्या मार्गावर आहे. ही बाब संपूर्ण १५० कोटी रू. खर्चावर पाणी फेरणारी आहे. भुयारी गटर योजनेतील ५ टप्पा पैकी केवळ २ टप्प्यातील भुयारी गटार योजनेचे काम पुर्णत्वावर जायला १६ वर्ष लागले.अद्यापही या योजनेचे ३ टप्प्यातील काम लोकप्रतिनिधी यांच्या ३-४ टर्म होऊनही अद्याप पुर्ण करू शकले नाही.

बडनेरा येथे १६ कि.मी. व शेगाव नाका ते शेगाव येथील येथे २ कि.मी. भुयारी पाइप लाईन २० वर्षांपासून जमीनित गाडून निरुपयोगी पडलेले आहेत. आता १ मलनिस्सारण केंद्र ३ वर्षांपासून बंद व दुसरे बंद पडण्याच्या मार्गावर असल्याने मलनिःसारणच काम ठप्प होऊन शहरातील संपूर्ण घाण मल पेढी नदीच्या प्रवाहात जाऊन नदीचे पाणी प्रदुषित करेल.तसेच या प्रकल्पातील आवारात सुरक्षा रक्षक असतांनाही सातत्याने होणाऱ्या यांत्रिकी साहित्याच्या चोऱ्या थांबविण्यासाठी सुरक्षा कडक करून संबंधितांवर जबाबदारीचा अंकुश ठेवावा.आणि या प्रकरणी आपण गांभीर्याने व तत्परतेने प्रत्यक्ष अवलोकन करून करोडो रु.खर्चाच्या आरोग्यदाई योजनेला भंगारात जाण्यापासून वाचवावे अशी विनंती माजी नगरसेवक प्रदीप वि. बाजड यांनी केली आहे.

## श्री मारोती संस्थानची (काकडा) जमीन कुळ कायद्याखाली लाटण्याचा डाव उधळला

### महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या पाठपुराव्याला यश;तहसीलदारांनी फेटाळले खरेदी प्रकरण

**अमरावती/का.प्र.**



अचलपूर तालुक्यातील मौजा काकडा येथील श्री मारोती संस्थानच्या (श्री राम व हनुमान मंदिर) मालकीची शेतजमीन कुळ कायद्यांतर्गत खरेदी करण्याचा प्रयत्न कायदेशीर लढ्याअंती हाणून पाडण्यात आला आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि संस्थानच्या विश्वस्तांनी नोंदवलेल्या आक्षेपानंतर, अचलपूरचे तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी ३० जुलै २०२६ रोजी हा अर्ज खारीज करून देवस्थानच्या बाजूने महत्त्वपूर्ण निकाल दिला.

काकडा (ता.अचलपूर) येथील श्री मारोती संस्थानच्या मालकीची शेत गट क्र. १२६ ही जमीन आहे. सदर शेतजमीन कुळ कायद्यांतर्गत खरेदी करून मिळण्यासाठी पंजाबराव महादेवराव पाटील व इतरांनी अचलपूर तहसीलदारांकडे अर्ज दाखल केला होता. या अर्जाला संस्थानचे विश्वस्त आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाने कायदेशीर विरोध दर्शवला.या प्रकरणात महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने राज्य पदाधिकारी श्री. अनुप जयस्वाल, मयुर दीक्षित आणि सुरेंद्र प्रजापती यांनी सविस्तर आक्षेप दाखल केला. या शेतजमिनीबाबतचे कुळ खरेदी प्रकरण यापूर्वीच ३० नोव्हेंबर १९६६ रोजी रद्द झालेले आहे, याकडे त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. जुन्या निकालाचा संदर्भ देत, आता नव्याने दाखल करण्यात आलेले कुळ कायद्यांतर्गत खरेदीचे प्रकरण त्वरित रद्द करून दप्तरी दाखल करण्याची मागणी महासंघाने केली.संस्थानच्या वतीने प्रकाश बोंडे,अनिल बोंडे, गजानन बोंडे, हरीश पाटील, रामेश्वर बोरकर, राहुल वैद्य, सुनील बोंडे, देवानंद ठाकरे, प्रशांत बोंडे , सुरेश बोंडे, अविनाश बोंडे, विलास बोंडे, राधेश्याम नाथे, रामदास पांडे, प्रकाश अलाटकर व इतरांनी आपली बाजू सक्षमपणे मांडली.दोन्ही बाजूंचे साक्ष व पुरावे तपासल्यानंतर, अचलपूरचे तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी अंतिम आदेश पारित केला.

## चुरणी ते कोटमी फाटा मुख्य रस्त्याची दयनीय अवस्था

### तात्काळ दुरुस्तीसाठी बाबुलाल मावस्कर यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**मेळघाट/वार्ताहर**

चुरणी ते कोटमी फाटा हा मेळघाट परिसरातील नागरिकांसाठी आणि वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा मुख्य रस्ता मानला जातो. मात्र, गेल्या काही काळापासून या रस्त्याची अत्यंत दयनीय स्थिती झाली आहे. रस्त्यावर जागोजागी खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले असून,यामुळे प्रवाशांचे हाल होत आहेत.या गंभीर समस्येची दखल घेत स्थानिक सामाजिक कार्यकर्ते बाबुलाल मावस्कर यांनी थेट जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून रस्ता तात्काळ दुरुस्त करण्याची मागणी केली आहे.

प्रवाशांचे हाल आणि अपघातांचे सत्रया मुख्य रस्त्यावरून दररोज शेकडो नागरिक, विद्यार्थी आणि नोकरदार ये-जा करतात. रस्त्याची चाळण झाल्यामुळे वाहनचालकांना कसरत करत वाहने चालवावी लागत आहेत. खड्ड्यांमुळे दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. अनेक वाहनचालक यात गंभीर जखमी झाले आहेत. तसेच, खराब



रस्त्यामुळे वाहनांचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.रुग्ण आणि विद्यार्थ्यांची गैरसोयसर्वात मोठी अडचण आरोग्य सुविधेच्या वेळी निर्माण होते. चुरणी व परिसरातील गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी अमरावती किंवा परतवाडा येथे घेऊन जाताना या खडतर प्रवासामुळे रुग्णांचे हाल होतात. वेळेवर वैद्यकीय मदत मिळण्यात खड्ड्यांचा मोठा अडथळा निर्माण होत आहे. तसेच, शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.प्रशासनाला तीव्र आंदोलनाचा इशारायापूर्वी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार मागण्या करूनही कोणतीही कारवाई न झाल्याने अखेर बाबुलाल मावस्कर यांनी अमरावती जिल्हाधिकाऱ्यांचे दार ठोठावले आहे. त्यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, लोकप्रतिनिधी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने या समस्येकडे सोयीस्कर पाठ फिरवली आहे.हा मुख्य रस्ता आमच्या परिसराची जीवनवाहिनी आहे. रस्त्याच्या दुरवस्थेमुळे दररोज नागरिकांचा जीव धोक्यात येत आहे. आता अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार गेल्यानंतर तरी सुस्त प्रशासन जागे होणार का, आणि चुरणी ते कोटमी फाटा या मुख्य रस्त्याचे काम तात्काळ सुरू करून नागरिकांना या त्रासातून मुक्त करणार का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

■ जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले असून, जर प्रशासनाने या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती किंवा डांबरीकरण सुरू केले नाही, तर ग्रामस्थांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

**-बाबुलाल मावस्कर, सामाजिक कार्यकर्ते**

## चांदूर रेल्वे स्टेशनचा कायापालट करा; रेल रोको कृती समितीची मागणी

### खासदार अमर काळे व आमदार प्रताप अडसड यांना निवेदन

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांदूर रेल्वे स्टेशनचा जीर्णोद्धार, प्रवाशांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच प्रमुख एक्सप्रेस गाड्यांना थांबा देण्याच्या मागणीसाठी रेल रोको कृती समितीच्या वतीने अध्यक्ष नितीन गवळी यांच्या नेतृत्वाखाली खासदार अमर काळे व आमदार प्रताप अडसड यांना निवेदन देण्यात आले.

नागपूर–भुसावळ रेल्वे मार्गावरील चांदूर रेल्वे स्टेशनवर चांदूर रेल्वे शहरासह परिसरातील हजारो नागरिक, विद्यार्थी, व्यापारी, कर्मचारी व प्रवासी रेल्वे प्रवासासाठी अवलंबून आहेत. मात्र, स्टेशनवर अनेक आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. रेल्वे स्टेशनच्या इमारतीचे व परिसराचे



आवश्यक जीर्णोद्धार करून मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, स्वच्छ व सुरक्षित वेटिंग हॉल उभारावा, दोन्ही प्लॅटफॉर्मवर पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी, आधुनिक कोच इंडिकेटर बसवावेत तसेच प्लॅटफॉर्मची उंची नियमानुसार वाढवावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय ११२०३/११२०४ नागपूर–मडगाव एक्सप्रेस तसेच १२४०५/१२४०६ भुसावळ–हजरत निजामुद्दीन गोंडवाना सुपरफास्ट एक्सप्रेस या महत्त्वाच्या गाड्यांना चांदूर रेल्वे स्टेशनवर नियमित थांबा देण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने स्टेशनवर आरपीएफची नियमित व पुरेशी सुरक्षा व्यवस्था करावी आणि स्टेशन परिसरातील आवश्यक ठिकाणी आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशी मागणी करण्यात आली. विशेषतः रात्रीच्या वेळी प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असून त्याकडे तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे समितीने निवेदनात म्हटले आहे.सर्व मागण्यांचा गांभीर्याने विचार करून संबंधित रेल्वे अधिकाऱ्यांकडे प्रभावी पाठपुरावा करावा, आवश्यक निधी व मंजुरी उपलब्ध करून द्यावी आणि कामे प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी नितीन गवळी, मेहमूद हुसेन, विनोद जोशी, सतीश चौधरी, अजय हजारे, अमोल देशमुख, विनोद लहाने, मंगेश डाफ, हर्षल वाघ, सुमेध सरदार आदींची उपस्थिती होती.

## कोरोनायोद्ध्यांच्या हक्कासाठी गजानन खंडाळेंचा लढा यशस्वी

### खा.बळवंत वानखडे यांच्या मध्यस्थीने उपोषणाची सांगता ठोस कारवाईचे आश्वासन

**अमरावती/का.प्र.**

कोरोना महामारीच्या काळात जीवाची पर्वा न करता रुग्णसेवा बजावणाऱ्या कोरोनायोद्ध्यांच्या न्याय्य हक्कांसाठी स्वर्गीय र.ग.कर्णिक श्रमिक कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष गजानन खंडाळे यांनी उभारलेल्या लढ्याला अखेर यश आले.जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर १२ ऑगस्टपासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाची खासदार बळवंत वानखडे यांच्या मध्यस्थीने यशस्वी सांगता करण्यात आली.

खा. वानखडे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा केली आणि संपूर्ण प्रकरणाची माहिती जाणून घेतली. कोरोनायोद्ध्यांच्या प्रश्नांवर ठोस कारवाई करण्याचे आश्वासन त्यांनी दिल्यानंतर उपोषणकर्त्यांना ज्यूस पाजून उपोषणाची सांगता करण्यात आली. यावेळी अमरावती महापालिकेचे माजी महापौर तथा विद्यमान विरोधी पक्षनेते विलास इंगोले आणि काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलू शेखावत यांनीही मध्यस्थीची भूमिका बजावली.



शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील पदभरतीमध्ये कोरोना काळात सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना डावलून इतरांची भरती करण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. तसेच बाह्यस्रोत कंत्राट क्रिस्टल कंपनीला दिल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी अधिकार नसतानाही ६० पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांचा क्रिस्टल कंपनीमध्ये समावेश केल्याचा दावा संघटनेने केला आहे. या प्रकरणी संघटनेच्या वतीने संबंधित अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच कामगार उपायुक्त यांच्याकडे वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला. मात्र, सकारात्मक निर्णय होत नसल्याने अखेर आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात आला. याबाबत ४ ऑगस्ट रोजीच आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता.

संघटनेचे प्रदेशाध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी स्वतः अमरावती येथे उपस्थित राहून जिल्हाध्यक्ष गजानन खंडाळे, जिल्हा कार्याध्यक्ष प्रविण शेगोकार, जिल्हा सचिव बबलू यादव यांच्यासह सर्व पदाधिकारी व आंदोलनकर्त्यांच्या भूमिकेचे कौतुक केले. गजानन खंडाळे यांच्या नेतृत्वाखाली लढा पुढेही सुरूच राहणार, असा निर्धार संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आला.आंदोलनात गजानन खंडाळे, बबलू यादव, टेकराज धोटे, मंगला मेश्राम, कोमल पाटील, उमेश कछवार, सुभाष सिरसाट, रोहन ठाकरे, गोपाल गाडेकर, निर्मला इंगळे, सुनील गायकवाड, आकाश पाटील, सागर सिराम, संजय शिंदे, सागर मोहोड आदींचा सहभाग होता.

# अचलपूर न.प. प्रशासनाने ठोस उपाययोजना राबवावी

**नागरिकांची मागणी**

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरातील वाहतुकीची वर्दळ असलेल्या मुख्य रस्त्यावरील सर्व शाळांसमोर गतिरोधक अभावी अपघाताच्या प्रमाणात वाढ होत असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

जुळ्या शहरातील अनेक भागात मोकाट श्वानामुळे विद्यार्थ्यांना शाळेत ये - जा करणे कठीण झाले आहे.मुख्य रस्त्यावरील सर्व शाळांसमोर तातडीने गतिरोधक निर्मिती करण्या सोबतच मोकाट श्वानामुळे भीतीच्या वातावरणातून विद्यार्थ्यांची सुटका करण्यासाठी ठोस उपाययोजना अचलपूर नगर परिषद प्रशासनाने राबविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. जुळ्या शहरातील अनेक मुख्य रस्त्यावरील शाळेसमोर गतिरोधक नसल्याने लहान-मोठे अपघात घडतात .यात अनेक विद्यार्थी गंभीर जखमी सुद्धा झाले आहे.यामुळे शहरातील वाहतुकीची वर्दळ असलेल्या सर्व शाळा,महाविद्यालय समोर गतिरोधकाची निर्मिती अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून झाल्यास मोठी सुविधा विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा दृष्टीने उपलब्ध होऊ शकते.

■ जुळ्या शहरातील महत्त्वपूर्ण ठिकाणी गतिरोधकाची आवश्यकता असल्यास तिथे लवकरच गतिरोधक निर्माण केले जाणार आहे आणि जुळ्या शहरात पुढील आठवड्यात मोकाट श्वानांच्या निर्बीजीकरण प्रक्रियेला सुद्धा सुरुवात होणार आहे.

**-धीरज कुमार गोहाड,मुख्याधिकारी, अचलपूर नगर परिषद**



■ विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा दृष्टीने जुळ्या शहरातील मुख्य रस्त्यावरील असलेल्या विविध शाळेसमोर गतिरोधक निर्मिती संदर्भात अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाचे अधिकारी-कर्मचारी यांच्याकडून आढावा घेतला जाणार आहे. आणि संबंधित अधिकारी याबाबत लवकरच पाहणी करणार आहे.त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडून आलेल्या अहवालानंतर आवश्यक असलेल्या ठिकाणी तत्काळ गतिरोधकांची निर्मिती केली जाणार आहे.

**दिपाली जवंजाळ, बांधकाम सभापतीं,अचलपूर**

■ जुळ्या शहरात मोकाट श्वानांची निर्बीजीकरण प्रक्रिया तात्पुरत्या स्वरूपात नगरपरिषद प्रशासनाकडून लवकर सुरू होणार आहे.आणि मुख्य रस्त्यावरील शाळा,महाविद्यालय समोर गतिरोधक निर्मिती संदर्भात संबंधित बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याशी चर्चा करून निर्णय घेतला जाणार आहे.

**-अभय माथने,स्वीकृत नगरसेवक, अचलपूर .**

■ गेली मार्च २०२३ वर्षापासून तर जून २०२५ वर्ष एकूण २ वर्ष २ महिन्यात अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात रेबीज इंजेक्शन ची संख्या पाहता जवळपास ५ हजार १२१ नागरिकांना श्वान चावल्याचे स्पष्ट होते .यामुळे भटक्या व मोकाट श्वानाचा हैदोस किती वाढला आहे ? हे या आकडीवरून स्पष्ट होते .सोबतच मुख्य रस्त्यावरील शाळा ,महाविद्यालय समोर गतिरोधक निर्मिती झाल्यास विद्यार्थ्यांना मोठी सुविधा उपलब्ध होऊ शकणार आहे.

**-सागर पुरोहित**

## संक्षिप्त

### जागतिक छायाचित्र दिन साजरा



**चांदूर रेल्वे**-जागतिक छायाचित्र २०२६ दिनानिमित्त चांदूर रेल्वे तालुक्यातील फोटोग्राफर व्हिडिओग्राफर मित्र परिवारातर्फे श्रावण शुभपरवाच्या बुधवारला सर्वप्रथम चंद्रशेखर आझाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन व हारार्पण करून चांदूर रेल्वे तून बाईक रॅली काढण्यात आली.त्यानंतर हॉटेल गणराज येते येथे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कॅमेऱ्याचे पूजन करून उपस्थित मान्यवरांचे वृक्ष व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले या कार्यक्रम करिता अध्यक्ष म्हणून राकेश जैन उपस्थित होते.प्रमुख पाहुणे म्हणून संजय कोल्हे, राजीव शिवणकर सक्षम बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तथा साप्ताहिक सक्षम पुकारचे संपादक मनोज ढाकूळकर, सुनील सदावर्ते, अक्षय वानखडे,आनंद राऊत उपस्थित होते.यावेळी सर्व फोटोग्राफर व्हिडिओग्राफर मित्रांनी जागतिक छायाचित्र२०२६ दिना निमित्ताने आप आपले मनोगत मांडले.तालुका फोटोग्राफर व्हिडिओग्राफर मित्रपरिवाराचे संजय कोल्हे ,राजू वडतकर राकेश जैन, राजीव शिवणकर, मनोज ढाकूळकर, अक्षय वानखडे,विशाल आमले, सुनील सदावर्ते,निखिल मेटे, हिमांशू कडू,तेजस यादव,श्रवण काळे,ऋषिकेश गोखे, संग्राम खंडाते, रोशन बांगळे,करण ठाकरे,साहील करवाडे शुभम गवई, धिरज ईश्वरकर, शुभम चोपकर,आनंद राऊत,निखिल वाहणे,कार्तिक राऊत,अनिकेत बागडे,हार्दिक रामटेके उपस्थित होते. प्रास्ताविक तेजस यादव तर आभार प्रदर्शन धिरज ईश्वरकर यांनी मानले.

### स्व. सुधाकरराव नाईक यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**अमरावती**-जलक्रांतीचे जनक तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे विभागीय आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जलसंधारण व कृषी विकास क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाचे स्मरण करण्यात आले.यावेळी अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) संजय जाधव, अपर आयुक्त (विकास/आस्थापना) संतोष कवडे, सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) वैशाली पाथरे, तहसीलदार अनिता झाडे, सागर ढोमसे, नायब तहसीलदार श्यामसुंदर देशमुख, संजय मुरतकर तसेच विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान जलसंधारणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. पावसाचे पाणी अडविणे, पाण्याची बचत व योग्य वापर करणे, भूजलपातळी वाढविणे तसेच उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले.



### चांदूर रेल्वेतील महाविद्यालयास पुस्तके भेट



**चांदूर रेल्वे**-शहरातील महिला आर्टस् कॉमर्स कॉलेजच्या ग्रंथालयास प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांच्याकडून विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे संस्थापक सदस्य प्रा. डॉ. एम. आर. देशमुख (काजळीकर) यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी पुस्तके भेट देण्यात आली. प्राचार्य डॉ. तुषार देशमुख, अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. विजय कापसे, गृह अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. अनिता धुर्वे, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. अनुप आत्राम, सर्व तासिका तत्त्वावरील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### नेत्र चिकित्सालयाद्वारे १९३ विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी



**अमरावती** - दिशा ग्रुपच्या फिरते नेत्र चिकित्सालयाच्या माध्यमातून चिखलदरा तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा, आडनदी येथे विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात शाळेतील एकूण १९३ विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली.ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेच्या ठिकाणीच आवश्यक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे, तसेच दृष्टीदोषांचे वेळेवर निदान करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांची दृष्टी तपासणी व आवश्यक प्राथमिक नेत्र तपासणी करण्यात आली. पुढील तपासणी किंवा उपचाराची आवश्यकता असलेल्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यात आले.या उपक्रमासाठी शासकीय आश्रमशाळा,आडनदीचे प्राचार्य योगेश साहेबराव रोकडे,अधिक्षक पवन मोटेवार व सर्व शिक्षकवृन्द यांचे सहकार्य लाभले.दिशा ग्रुपच्या फिरते नेत्र चिकित्सालयाच्या माध्यमातून ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांपर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेत्र आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास तसेच दृष्टीदोषांचे लवकर निदान होण्यास मदत होत आहे.

# इतिहासाशी खेळू नये...

बालभारती या पाठ्यपुस्तकातील सहावीच्या इतिहास विषयक वेदकालीन आहारासंबंधी आधीचा मजकूर बदलून वेदकालीन जनसमुदाय फक्त वनस्पतीजन्य आहार घेत असत असे नमूद करण्यात आल्याची बातमी आज एका वृत्तपत्राने प्रसिद्ध केली आहे. म्हणून मी सहज एआय कडून वेदकालीन आहाराविषयी माहिती मागविली. चॅट जिपीटी या एआय ने पुरवलेली माहिती खाली देत आहे.

उपलब्ध वैदिक वाङ्मयाचा एकत्रित विचार केला तर 'वेदकालीन सर्व लोक शाकाहारी होते' असे म्हणणे ऐतिहासिकदृष्ट्या योग्य नाही. उलट,प्रारंभीच्या वैदिक आणि ब्राह्मणग्रंथांत मांसाहार व पशुयज्ञाचे स्पष्ट पुरावे आहेत. मात्र पुढील काळात अहिंसा, प्राणिमात्रांविषयी करुणा आणि शाकाहार यांना वाढते महत्त्व मिळाले. त्यामुळे हा विषय कालानुसार बदलणारा आहे.

१. ऋग्वेदात मांसाहाराचे उल्लेख- ऋग्वेदात पशुयज्ञांचे अनेक उल्लेख आहेत. काही सूक्तांमध्ये अश्व, मेंढा, बोकड, बैल इत्यादी प्राण्यांचा यज्ञाशी संबंध दिसतो. उदाहरणार्थ,ऋग्वेद १०.२७.१७ मध्ये मेंढ्याचे मांस शिजवण्याचा उल्लेख आढळतो. अथर्ववेदातही घोडा, मेंढी, बकरा आणि बैल यांसारख्या प्राण्यांचा अन्नाच्या संदर्भात उल्लेख आहे. याचा अर्थ असा की प्राण्यांचे मांस खाण्याची प्रथा वैदिक समाजाला अपरिचित नव्हती.

२. पशुयज्ञ आणि मांसाहार- याहून अधिक स्पष्ट चित्र ब्राह्मणग्रंथांमध्ये, विशेषतः शतपथ ब्राह्मण मध्ये मिळते.

यज्ञात पशूचा बळी दिल्यानंतर त्याच्या शरीराचे विविध भाग कोणत्या ऋत्विजाला मिळावेत याचेही वर्णन आढळते. ऐतरेय ब्राह्मणात तर पशूच्या शरीराच्या विविध भागांचे पुरोहितांमध्ये वाटप करण्याचे सविस्तर वर्णन आहे. म्हणजे पशुयज्ञ हा केवळ प्रतीकात्मक विधी नव्हता; काही प्रसंगी त्यातून प्राप्त झालेले मांस खाल्ले जात होते.

३. गोमांसाबाबत विशेष महत्त्वाचा पुरावा - हा सर्वांत वादग्रस्त मुद्दा आहे. शतपथ ब्राह्मण ३.१.२.२१ मध्ये गायी किंवा बैलाचे मांस न खाण्याचा उपदेश आढळतो. परंतु त्याच संदर्भात याज्ञवल्क्य म्हणतो:- 'अहम् एनम् अद्मि यद् अल्पशः...' याचा आशय असा घेतला जातो की 'मांस चांगले/कोवळे असेल तर मी ते खातो.' या विरोधाभासावरून त्या काळात गोमांसभक्षणाबाबत सर्वमान्य निषेध निर्माण झालेला नव्हता, असे दिसते. म्हणूनच 'वैदिक हिंदू कधीही गोमांस खात नव्हते' हा दावा वैदिक-ब्राह्मण साहित्याशी पूर्णपणे सुसंगत नाही.

४. पण त्याच काळात शाकाहारी आहारही होता- याचा दुसरा भाग तितकाच महत्त्वाचा आहे. वैदिक समाज मांसाहारीच होता असेही म्हणता येणार नाही. दूध, दही, तूप, धान्य, जव, तांदूळ, डाळी, फळे आणि वनस्पतीजन्य पदार्थ हे आहाराचे महत्त्वाचे घटक होते. शतपथ ब्राह्मणात वनस्पती, धान्य आणि डाळी यांचा उल्लेख वारंवार येतो. त्यामुळे अधिक अचूक निष्कर्ष असा: वैदिक समाजाचा आहार मिश्र होता. शाकाहारी तसेच मांसाहारी. मांस रोजच्या आहाराचा अनिवार्य भाग होता असे म्हणण्यापेक्षा, विशिष्ट यज्ञ, समारंभ, पाहुणचार किंवा विशेष प्रसंगी मांसाहाराला धार्मिक-सामाजिक मान्यता होती, असे म्हणणे अधिक सुरक्षित आहे.

५. नंतरच्या हिंदू वाङ्मयात मोठा बदल - इथे महाभारत विशेष महत्त्वाचे आहे. महाभारताच्या शांतीपर्व आणि अनुशासनपर्वात मांसाहार आणि अहिंसा यावर विस्तृत चर्चा आहे. विशेषतः अनुशासनपर्वात 'मांस खाण्यात दोष काय आणि न खाण्यात पुण्य काय?' असा प्रश्नच उपस्थित केला जातो. पुढे मांसत्याग आणि अहिंसा यांचे मोठे समर्थन केले जाते. अभ्यासकांच्या मते हा भाग मांसाहाराविषयी बदलत्या धार्मिक-सामाजिक दृष्टिकोनाचे महत्त्वाचे द्योतक आहे. मनुस्मृतीतही स्थिती सरळ 'मांस पूर्णपणे निषिद्ध' अशी नाही. धार्मिक विधीने संस्कारित केलेले मांस आणि स्वतःच्या इच्छेने केलेला मांसाहार यांच्यात भेद केला आहे; परंतु त्याच वेळी मांसत्यागाचे मोठे नैतिक महत्त्व सांगितले आहे.

६. मग 'हिंदू धर्म मूलतः शाकाहारी आहे' ही कल्पना कुठून आली?- याचे उत्तर हिंदू धर्माच्या दीर्घ ऐतिहासिक उत्क्रांतीत आहे. एक साधारण प्रवाह असा दिसतो: प्रारंभीचा वैदिक काळ?पशुयज्ञ व मांसाहाराला मान्यता उत्तरवैदिक/उपनिषदकाल? यज्ञाच्या स्वरूपात व धार्मिक विचारांत बदल बौद्ध-जैन प्रभाव + अहिंसेचे वाढते महत्त्व महाभारत, धर्मशास्त्रे, पुराणे? मांसाहाराविषयी अधिक नैतिक संकोच नंतरच्या भक्तीपरंपरा व वैष्णव-संप्रदाय? शाकाहाराला विशेष धार्मिक प्रतिष्ठा म्हणून आजच्या काळातील 'शाकाहार म्हणजेच हिंदू धर्म' ही धारणा संपूर्ण वैदिक इतिहासावर मागे नेऊन लागू करता येत नाही.



७. पुराणांचे काय?- पुराणांमध्येही दोन्ही प्रवाह दिसतात. काही ठिकाणी यज्ञीय पशुबळी किंवा विशिष्ट प्रसंगी मांसाहाराला मान्यता आहे, तर अनेक पुराणपरंपरांमध्ये अहिंसा, दया, प्राणिरक्षण आणि मांसत्याग यांना पुण्यकारक मानले आहे. म्हणून पुराणांबाबतही एकच वाक्य 'पुराणे मांसाहार निषिद्ध म्हणतात' किंवा 'पुराणे मांसाहाराला अनुमती देतात'असे म्हणणे अचूक ठरणार नाही. म्हणून 'वेदकाळातील लोक शाकाहारी होते का?' या प्रश्नाचे सर्वांत प्रामाणिक उत्तर आहे नाही, सर्व लोक शाकाहारी नव्हते; वैदिक समाजात मांसाहार अस्तित्वात होता आणि काही धार्मिक विधींशी त्याचा संबंध होता. परंतु शाकाहारही मोठ्या प्रमाणावर प्रचलित होता. पुढील हिंदू परंपरेत अहिंसा आणि मांसत्यागाचे महत्त्व क्रमशः वाढत गेले.

**किशोर देशपांडे**

## त-ड-का

### कामगार चौक..!

हातावर पोट असणाऱ्याना
कामगार नाका हे आशास्थान
जेथे कामगार व सेवायोजक
गरजेनुसार वाटाघाटीतून
करती सेवेचे आदान प्रदान ..!

शहरामध्ये कामगार चौक
संकल्पना आली अस्तित्वात
प्रातः काळी उभय पक्ष
अटीनुसार मजूरीदर ठरतात..

असंघटीत कामगारांची
स्थिती आहे विदारक
काम मिळाले तर दाम मिळते
नाहीतर दिवस जाई निरर्थक ..

अकुशल अर्धकुशल..
श्रमिकांचे प्रमाण दिसते जास्त
सौदाशक्ति कमी असल्याने
शाश्वती नसते मजुरी मिळेल रास्त..!



**प्रा. अशोक सारडा, मेहकर**
मो.९४२१३९४३३९
(आज मेहकरला शेगावच्या दिंडीचे आगमन होत आहे त्यानिमित्त प्रासंगिक)

जलसंधारण दिन विशेष

# जलसंधारण:जलसमृद्ध, दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा भक्कम पाया

पाणी म्हणजे शेतीचा श्वास आणि विकासाचा आधारआहे. बदलते हवामानआणि घटती भूजल पातळी यामुळे जलसंधारणाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे जतन करून तो जमिनीत मुरवणे, ही काळाची गरज आहे. जलसंधारणातून मातीला नवजीवन, शेतीला आधार आणि भावी पिढ्यांना सुरक्षित भविष्य देण्याची ताकद आहे.

महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर असून, त्यापैकी १७४.७३ लाख हेक्टर क्षेत्र शेतीखाली आहे. राज्यातील सुमारे ८२ टक्के शेती पावसावर अवलंबून असल्याने पावसाच्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. राज्यातील २४१ लाख हेक्टर क्षेत्र पाणलोट विकासासाठी पात्र असून, त्यापैकी १८२.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर मृद व जलसंधारणाची विविध कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित क्षेत्रावरही नियोजनबद्ध पद्धतीने कामे सुरू आहेत.

महाराष्ट्र शासनाने जलसंधारणाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून विविध प्रभावी योजना राबविल्या आहेत आणि राबवत आहे. राज्याला जलसुरक्षिततेच्या दिशेने सक्षमपणे पुढे नेण्यासाठी मृद व जलसंधारण विभाग सातत्याने कार्यरत असून जलस्त्रोतांचे संवर्धन, भूजल पुनर्भरण, विकेंद्रित जलसाठ्यांची निर्मिती आणि शाश्वत जलव्यवस्थापनाला प्राधान्य दिले जात आहे.

**जलयुक्त शिवारातून गावांच्या जलसमृद्धीकडे**

जलयुक्त शिवार अभियानामुळे राज्यातील अनेक गावांमध्ये जलसाठे वाढले, विहिरींच्या पाणीपातळीत सुधारणा झाली आणि संरक्षित सिंचनाला चालना मिळाली. ज्या शेतकऱ्यांना पूर्वी वर्षातून एकच पीक घेता येत होते,अशा अनेक भागांत दुबार पिकांच्या संधी निर्माण झाल्या आहेत. जलसंधारणामुळे निर्माण होणारे संरक्षित सिंचन केवळ शेतीपुरते मर्यादित राहत नाही, तर ग्रामीण बाजारपेठ,रोजगार,दुग्धव्यवसाय आणि लघुउद्योगांनाही चालना देते.

जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील यशानंतर जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत राज्यातील ५,८५८ गावांमध्ये सुमारे १.४३ लाखांहून अधिक कामे प्रस्तावित झाली आहेत. त्यापैकी १.२४ लाखांपेक्षा अधिक कामे पूर्ण झाली आहेत. जुलै २०२६ अखेर या अभियानावर २,३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी खर्च करण्यात आला आहे.

**गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार-पाण्यासोबत मातीलाही नवजीवन**

'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' ही योजना पर्यावरण आणि शेती यांचा सुंदर समन्वय साधणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे पाणीसाठवण क्षमता वाढते, तर तोच सुपीक गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची गुणवत्ता आणि उत्पादनक्षमता सुधारण्यास मदत होते.

२०२३-२४ ते २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३,३०५ जलाशयांमधून ९८०.५० लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला असून, तो सुमारे १ लाख ९३ हजार एकर क्षेत्रावर पसरविण्यात आला आहे. यासाठी सुमारे ३४५ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, ८१,११४ स.घ.मी. पाणीसाठा पुनर्स्थापित झाला आहे. म्हणजेच जलसंधारण हे शेतीला केवळ पाणी देत नाही, तर जमिनीलाही नवजीवन देते.



**भूजल पुनर्भरण-भविष्याच्या जलसुरक्षेची गुरुकिल्ली**

भूजल पुनर्भरण हा जलसंधारणाचा अत्यंत महत्वाचा नैसर्गिक फायदा आहे. गेल्या काही दशकांत भूजलाचा मोठ्या प्रमाणावर उपसा झाल्यामुळे अनेक भागांत विहिरी कोरड्या पडणे, बोअरवेलची खोली वाढणे आणि उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता कमी होणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. याचा शेतीसोबतच संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होतो.

पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवून जमिनीत मुरविले, तर भूजल पातळी सुधारण्यास मदत होते. ही प्रक्रिया केवळ शेतीसाठी नव्हे, तर पिण्याच्या पाण्याच्या दीर्घकालीन उपलब्धतेसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे. भविष्यातील गंभीर पाणीटंचाईचे संकट टाळायचे असेल, तर भूजल संवर्धन आणि पुनर्भरणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.

**जलसंधारण म्हणजे पर्यावरणाचेही संवर्धन**

जलसंधारणाचा पर्यावरणावरही अत्यंत सकारात्मक परिणाम होतो. एखाद्या भागात पाणी टिकून राहिले, तर तेथील जैवविविधतेला आधार मिळतो. वृक्षसंवर्धनाला चालना मिळते, जमिनीतील ओलावा टिकतो आणि नैसर्गिक परिसंस्था मजबूत होण्यास मदत होते. अनेक ठिकाणी जलसंधारणाच्या कामांनंतर स्थानिक जैवविविधता आणि जलचरांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याची उदाहरणे दिसून येतात. त्यामुळे जलसंधारण ही केवळ विकासाची योजना नसून निसर्गाशी असलेले आपले नाते अधिक दृढ करण्याची प्रक्रिया आहे.

**हवामान बदलाच्या आव्हानाला जलसंधारणाचे उत्तर**

आज हवामान बदल हे जगासमोरील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक आहे. पावसाचे स्वरूप बदलत आहे. काही दिवसांत अतिवृष्टी आणि त्यानंतर दीर्घ काळ पावसाचा खंड असे चित्र अनेक भागांत दिसून येते. अशा परिस्थितीत केवळ मोठी धरणे किंवा पारंपरिक सिंचन व्यवस्था पुरेशी ठरणार नाही.

गाव पातळीवर पाणी अडवणे, पाणलोट विकास करणे, नैसर्गिक जलमार्ग जिवंत ठेवणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे आणि स्थानिक जलस्त्रोत मजबूत करणे हा शाश्वत मार्ग आहे. हवामान बदल आणि पर्जन्यमानातील अनिश्चिततेचा विचार करून मृद व जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि लघु सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती दिली आहे. आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यावरही भर दिला जात आहे.

**गुणवत्तापूर्ण कामे आणि कालबद्ध अंमलबजावणी**

या सर्व उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्येमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाची महत्वपूर्ण भूमिका आहे.विभागाच्या नव्या प्रशासकीय आकृतिबंधाला मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्पांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळाली आहे. मंजूर कामे मूळ आराखड्यानुसार आणि निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. गुणवत्तापूर्ण कामांसाठी स्वतंत्र मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या असून, मालगुजारी तलावांच्या पुनरुज्जीवनासारख्या महत्त्वाच्या उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसंधारण अधिक परिणामकारक करण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे.

**प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून ५.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर कामे**

केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये १४० प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या माध्यमातून सुमारे ५.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर जलसंधारण, भूजल पुनर्भरण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेला चालना देणारी विविध कामे सुरू आहेत.या योजनेचे एकूण प्रकल्पमूल्य १,२५१.११ कोटी रुपये असून, जुलै २०२६ अखेर सुमारे १,००३ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे.

मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन, सिमेंट बंधारे, पाणलोट विकास, नाला खोलीकरण, भूजल पुनर्भरण आणि लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या जलसंवर्धन उपक्रमांची प्रभावी सांगड घालत महाराष्ट्र जलसुरक्षिततेच्या दिशेने भक्कम वाटचाल करत आहे. नाला खोलीकरणाबरोबरच बांबू लागवडीसारख्या पर्यावरणपूरक उपक्रमांवरही भर देण्यात आला आहे. विदर्भातील मालगुजारी तलावांची कामे वेळेत पूर्ण करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा दृष्टिकोन केवळ पाणी साठविण्यापुरता मर्यादित नसून जलस्त्रोतांचे दीर्घकालीन संवर्धन सुनिश्चित करणारा आहे.

**जलसंधारण दिनातून राज्यव्यापी लोकचळवळ**

महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्राला दूरदृष्टी आणि व्यापक दिशा देणारे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने राज्यात १५ ते २१ ऑगस्ट २०२६ दरम्यान 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यात येत आहे.या अभियानाचा महत्वाचा भाग म्हणून आज २१ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांत 'महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर' आयोजित करण्यात आली आहे.'माती वाचवा,पाणी जपा,सुरक्षित भविष्य घडवा'हा या अभियानाचा मुख्य संदेश आहे.सर्व जिल्ह्यांत ३ कि.मी. 'वॉक फॉर वॉटर' आणि सामूहिक मृद व जलसंधारण शपथ आयोजित करण्यात आली आहे. नागरिक,युवक, विद्यार्थी, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांना या उपक्रमातून जलसंधारणाच्या लोकचळवळीशी जोडण्याचा प्रयत्न आहे.

युवकांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ देत त्यांना या लोकचळवळीशी डिजिटल माध्यमातून जोडण्यासाठी 'रील चॅलेंज' स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. माती संवर्धन, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, पाणलोट विकास आणि जलसंधारणाच्या नाविन्यपूर्ण कल्पना समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

**प्रत्येक थेंब जपूया,महाराष्ट्र जलसमृद्ध करूया**

जलसंधारण ही केवळ शासनाची योजना नाही, तर शासन आणि समाजाच्या सामूहिक सहभागातून यशस्वी होणारी लोकचळवळ आहे. शासन योजना आखू शकते, निधी उपलब्ध करून देऊ शकते, जलसंधारणाची कामे उभी करू शकते; पण त्या जलस्त्रोतांचे संवर्धन आणि पाण्याचा जबाबदारीने वापर करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे.

शासनाचे दूरदृष्टीचे धोरण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रभावी नेतृत्व, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे सहकार्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या बळावर जलसमृद्ध, दुष्काळमुक्त आणि शाश्वत महाराष्ट्र घडविण्याचा आपला संकल्प अधिक दृढ होत आहे.

जलसंधारण दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव ठरू नये. तो प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनातील संकल्प बनला पाहिजे. घरातील पाणी असो, शेतातील पाणी असो किंवा गावातील जलस्त्रोत-प्रत्येक थेंब जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.


चला, जलसंधारण दिनानिमित्त आपण सर्वजण संकल्प करूया..

**पाणी अडवूया.. पाणी जिरवूया..**
**माती वाचवूया.. पाणी जपूया..**
**आणि जलसमृद्ध, दुष्काळमुक्त महाराष्ट्र घडवूया!**

**-संजय राठोड**
मंत्री, मृद व जलसंधारण,
महाराष्ट्र शासन

# नुटा ज्यांचा श्वास .... असे आदरणीय भाऊ

आज नुटा बुलेटीनला पन्नास वर्षाचे आयुष्य लाभले. ज्या बी.टी भाऊंनी आयुष्यभर नुटा बुलेटिन च्या माध्यमातून श्वास घेतला. आपल्या वैचारिक भूमिका मांडल्या.त्याला पन्नास वर्षाचे आयुष्य लाभले.एखाद्या संघटनेच्या वैचारिक भूमिकाची मांडणी करणाऱ्या मुखपत्राला सातत्यपूर्ण, यशस्वी पन्नास वर्षे पूर्ण होणे ही फार मोठी उपलब्धी आहे. मनुष्य आयुष्याच्या पन्नाशीच्या कालावधीमध्ये जवळजवळ सगळे इतीकर्तव्य पूर्ण करतो. नुटा चे हे पूर्णत्व प्रगभत्व पाहून भाऊंनी अंतिम श्वास घेतला असेल का?माणसाच्या लौकिक अस्तित्वात जगण्या मरणातले अंतर म्हणजे एक श्वासच नाही का! कुणाला किती वर्षांचे आयुष्य लाभते ते ज्याने त्याने घेतलेल्या श्वासावर अवलंबून असते.एकाच आयुष्यात भाऊंना किती मोठा नुटा परिवार जोडता आला. ज्यांची नावेही त्यांना माहित नाही असे किती सदस्य त्यांचे आप्तेष्ट झाले, नुटा परिवारातील घटक बनले. एका आयुष्याची इतकी मोठी इतीकर्तव्यता म्हणजे प्रत्येक घेतलेल्या श्वासाचे मोल आहे. नुटा आणि भाऊ यांना आयुष्य आणि श्वास याप्रमाणे वेगळे करता येणार नाही. कुटुंब प्रमुखाच्या नसण्याने निर्माण होणारी उणीव, जाणवणारी पोकळी कधीही भरून येणारी नसली तरी देखील त्यांनी दिलेला विचार पुढे चालण्यासाठी बळ देणारा असतो. भाऊ आपल्या सर्वांसाठीच बाप माणूस. सगळ्यांच्याच आयुष्यात बापाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.भाऊंचा विचार म्हणजे उज्वल वर्तमान आणि प्रगल्भ भविष्याकडे वाटचाल करणारा वैचारिक वारसा आहे. आपल्या नुटा या वैचारिक बीजाचे आज विशाल वृक्षात रूपांतर होताना पाहणे, त्याला फळाफुलांनी भरलेले पाहून पूर्णत्वाची, आश्वस्ततेची सुखद अनुभूती घेत असताना अखेरचा श्वास भाऊंनी घेतला.ज्याला अंगा खाद्यावर खेळवले ते आपले मूल आज सगळ्या अवस्थांमधून जाऊन त्याच्या जीवनातील उत्तरार्धाच्या प्रवासाकडे यशस्वी वाटचाल करत आहे. तेव्हा आपण बाप म्हणून निवांततेचा आणि आश्वस्त निश्चितेचा श्वास घ्यायला मोकळे झालो.असाच विचार कदाचित भाऊंनी अखेरचा श्वास घेताना केला असावा. बापाबद्दल एक अनामिक आदर युक्त भीती असते.ती अनेकांच्या मनात भाऊ बद्दल होती. कारणही तसेच होते.भाऊ म्हणजे सामाजिक, राजकीय,शैक्षणिक क्षेत्रातील एक अनुभवी, अभ्यासू, संघर्षशील,मूल्यनिष्ठ, लोकाभिमुख बहुआयामी व्यक्तिमत्व. प्रचंड सखोल अभ्यास, संसदीय न्यायिक बाबींचे तत्वाधारित विश्लेषण, कायदेशीर धोरणात्मक वैचारिक भूमिका मांडणारे, ज्यांच्या विचारांना नैतिकतेची खोली होती.



मूल्यांशी कोणत्याही परिस्थितीत तोडजोड न करणारे, बुलेटीनचा शब्दन शब्द प्रामाणिकपणे समाज हितासाठी असला पाहिजे. तो तथ्य व तत्व आधारित असला पाहिजे असा तत्त्वनिष्ठ नेता म्हणजे भाऊ. त्यांच्या विचारांचा प्रभाव, संघर्षाची व्याप्ती आणि समाज जीवनावर त्यांनी उमटवलेला वैचारिक ठसा अविट आहे. आपल्या मार्मिक पण तितक्याच मिश्किल संवाद शैलीमध्ये अत्यंत संवेदनशीलपणे प्रगल्भ वैचारिक भूमिका मांडताना प्रत्येक बाब बुद्धीप्रामाण्यवादी भूमिकेतून पटवून देणारे दूरदृष्टीचे अभ्यासक भाऊ,शाश्वत विचार देत होते. शिक्षक ही जात नसते, तो पेशाही नसतो,व्यवसायही नाही, ती असते फक्त निष्ठा. ती ज्याने त्याने आपआपल्या परीने जपावी,जोपासावी. शिक्षकाने आपली निष्ठा बदलू नये, हा विचारचे ज्यांच्या श्वासात होता असे भाऊ. जातीपातीच्या,आपल्या परक्यांच्या पलीकडे जाऊन ज्यांनी संघटनात्मक कार्य केले. शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, त्याचबरोबर अनुशेष व जलसिंचनाच्या प्रश्नाला मार्गी लावून प्रत्येक जनमानसासाठी न्याय भूमिका त्यांनी कायम घेतली. सतत तीस वर्ष सत्तेत राहूनही सत्तेला कधी साधन न मानता विकासाचे माध्यम बनवले. मूल्यांशी कधी तळजोड केली नाही. चूक ते चूक ही भूमिका घेऊन, अनुशेष, जलसिंचन असे समाज हिताचे कार्य करणारा नेता. स्वतःचे स्पष्ट निर्भेळ, निरपेक्ष विचार ज्यांनी मांडले असे संसद पटू. महाराष्ट्राच्या शैक्षणिक,राजकीय,सामाजिक, संघटनात्मक इतिहासाचा वैचारिक वारसा जपणारे आणि या वैचारिक वारशाची पायाभरणी नुटा बुलेटीनच्या माध्यमातून करणारे भाऊ, यांनी समाजाच्या बौद्धिक भवितव्याची कायदेशीर व धोरणात्मक बाजू मांडण्याकरीता संघटनेचे मुखपत्र असावे ही घेतलेली भूमिका म्हणजे ऐतिहासिक दस्तावेजीकरण होय.सार्वजनिक जीवनात सामाजिक न्याय, मानवी सन्मान, शैक्षणिक क्षेत्रातील मुलभूत प्रश्न, जलसिंचन,अनुशेषा सारखे प्रश्न ज्या नैतिक उंचीवर जाऊन वैचारिक प्रकल्भतेने भाऊंनी हाताळले तो आदर्श अनेक पिढ्यांसमोर कायम असणार आहे. नुटा च्या मुखपत्राचे लेखक, संपादक म्हणून कार्य करताना शिक्षण,शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,शिक्षण व्यवस्था, कायदे, शासननिर्णय, संसदीय कार्यपद्धती इत्यादींच्या लेखनातून त्यांनी विचार प्रवर्तन करणारी उज्वल वाट निर्माण करून दिली. अशा नुटा बुलेटीनचा सुवर्ण महोत्सवी पन्नास वर्षांचा कार्यक्रम संपन्न होतो आहे. याप्रसंगी गेल्या पंचवीस तीस वर्षांपासून आदरणीय भाऊंना व नुटा बुलेटिनला वाचले,पाहिले, ऐकले, इतरांकडून त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू जे समजले ते मांडण्याचा अल्पसा प्रयत्न,म्हणून हे लिहिण्याचे हे धाडस केले.

खरंतर पितृतुल्य भाऊंबद्दल आपण काही लिहावे इतके आपण मोठे नाहीचे याची पूर्ण जाणीव असताना देखील बापमाणसाबद्दल वाटणारा आदर आणि भावनांचा आवेग मात्र रोखता आला नाही. म्हणून त्याला शब्दबद्ध केले. आदरणीय भाऊंनी ज्या नुटा संघटनेला व बुलेटिनला श्वासाप्रमाणे जपले, ते आपले अपत्य आज पन्नास वर्षे पूर्ण करतो आहे. आयुष्याचा सुवर्णकाळ जगतो, जपतो आहे. ही कदाचित आदरणीय पितृतुल्य भाऊंसाठी देखील सुखद अनुभूती असेल.

**डॉ.सुवर्णा गाडगे**
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,
अमरावती

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला जिल्हा विशेष

# अकोल्याच्या नागरी प्रश्नांवर आता 'हक्काचं शहर'ची हाक

## काँग्रेसच्या शहर परिवर्तन गटाचा शुभारंभ; प्रभागनिहाय जनसुनावणी, तज्ज्ञ समिती आणि 'शॅडो जनरल बॉडी'च्या माध्यमातून प्रशासनाला जाब विचारणार

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, पूरस्थिती, घनकचरा, प्रदूषण, नागरी नियोजन आणि कथित भ्रष्टाचाराच्या प्रश्नांवर नागरिकांना सहभागी करून घेत प्रशासनाला जाब विचारण्यासाठी काँग्रेसने 'हक्काचं शहर' अभियानाची सुरुवात केली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या 'शहर परिवर्तन गट'अंतर्गत अकोला शहरात या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. नागरिकांच्या समस्या केवळ निवेदने आणि आंदोलनांपुरत्या मर्यादित न ठेवता त्यांचा अभ्यास, जनसुनावणी आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्याची भूमिका काँग्रेसने घेतली आहे.

राजीव गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून अभियानाची माहिती देण्यासाठी पत्रकार परिषद घेण्यात आली. अकोला शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र गवई यांनी अभियानाची भूमिका स्पष्ट केली. शहरातील विविध नागरी प्रश्नांवर नागरिकांना सोबत घेऊन आंदोलने, मोर्चे आणि निदर्शने उभारण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

### कर भरूनही सुविधा अपुऱ्या

शहरातील नागरिक विविध कर, अधिभार, शुल्क आणि दंडाच्या माध्यमातून शासन तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना महसूल देतात. मात्र, त्याच्या तुलनेत मूलभूत नागरी सुविधा मिळत नसल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. खराब रस्ते, अपुरा पाणीपुरवठा, पावसाळ्यातील पूरस्थिती, घनकचरा व्यवस्थापन, प्रदूषण, घरकुल योजना, नागरी नियोजन यांसह विविध प्रश्न अभियानाच्या माध्यमातून लावून धरण्यात येणार आहेत.

### प्रश्नांचा अभ्यास करून प्रशासनाला जाब

'हक्काचं शहर' अभियान केवळ आंदोलनापुरते मर्यादित न ठेवता शहरातील प्रश्नांचा कायदेशीर, तांत्रिक आणि



प्रशासकीय पातळीवर अभ्यास केला जाणार आहे. त्यासाठी नगररचनाकार, वकील, सामाजिक कार्यकर्ते, सेवानिवृत्त अधिकारी, विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी आदींचा समावेश असलेल्या तज्ज्ञ समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. संबंधित प्रश्नांची वस्तुस्थिती समोर आणून प्रशासनाची जबाबदारी निश्चित करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### प्रभागनिहाय जनसुनावणी

शहरातील प्रत्येक प्रभागात नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या जाणार आहेत. जनसुनावणीच्या माध्यमातून तक्रारी आणि प्रश्न नोंदवून संबंधित विभागांकडे त्यांचा पाठपुरावा केला जाईल. तसेच महापालिकेच्या निर्णयप्रक्रियेवर नागरिकांच्या दृष्टिकोनातून पर्यायी भूमिका मांडण्यासाठी 'शॅडो जनरल बॉडी' बैठका घेण्याचेही नियोजन आहे.

### तरुणांना सोशल मीडियातून व्यासपीठ

नागरी प्रश्न सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडण्यासाठी तरुणांचा सहभाग वाढविण्यात येणार आहे. यासाठी रील आणि व्हिडिओ स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून, शहरातील समस्या प्रभावीपणे मांडणाऱ्या तरुणांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे. उत्कृष्ट सादरीकरणांची शहर तसेच राज्यस्तरावर निवड करण्याचे नियोजन असल्याचे काँग्रेसकडून सांगण्यात आले.

### नागरिकांचा निर्णय प्रक्रियेत सहभाग

'शहरी राजकारण बदलूया, हक्काचं शहर घडवूया' या संकल्पनेतून शहर विकासाच्या निर्णयप्रक्रियेत नागरिकांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार आणि नागरिकांचा निर्णयप्रक्रियेत सहभाग याबाबत राजीव गांधी यांच्या विचारांशी अभियानाची सांगड घालण्यात आली आहे. ७४व्या घटनादुरुस्तीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या विकासात नागरिकांची भूमिका अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### आंदोलनाची धार कायम

नागरी प्रश्नांवर केवळ चर्चा न करता गरजेनुसार प्रशासनाविरोधात आंदोलने, मोर्चे आणि निदर्शने करण्याचा इशाराही काँग्रेसने दिला आहे. तरुण, कामगार, डॉक्टर, वकील, पत्रकार, लेखक-कलाकार, शिक्षक, आर्किटेक्ट, नगररचनाकार, उद्योजक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह विविध घटकांना अभियानाशी जोडण्याचे नियोजन आहे. 'हक्काचं शहर'च्या माध्यमातून अकोल्यातील नागरी प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून नागरिकांची लोकचळवळ उभी करण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून केला जाणार आहे. त्यामुळे आगामी काळात या अभियानातून शहरातील नागरी प्रश्नांवर प्रशासनावर किती दबाव निर्माण होतो, याकडे लक्ष लागले आहे. पत्रकार परिषदेला महेंद्र गवई, प्रकाश तायडे, डॉ. झीशान हुसैन, डॉ. सुधीर ढोणे, अक्षय राऊत, कपिल रावदेव, विजय तिवारी, मनिष मिश्रा, योगेश थोरात, शकील अहमद, श्रीकांत सरोदे, गणेश कळसकर, विनोद नालट, प्रशांत प्रधान, विनोद मराठे, सुनील वानखडे, मंथन शिरसाट, मोहम्मद इरफान, मोईन खान ऊर्फ मोंटू, विनोद अंबुसकर आदी उपस्थित होते.

> **नागरिकांच्या हक्कासाठी काँग्रेसचा संघर्ष**
>
> अकोला शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, वीज यांसह नागरिकांच्या प्रत्येक प्रश्नाचा आवाज काँग्रेसच्या माध्यमातून प्रशासनापर्यंत पोहोचविला जाईल. 'हक्काचं शहर' अभियानातून प्रत्येक वॉर्डातील नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणार आहोत. केवळ समस्या ऐकून न घेता त्या सोडविण्यासाठी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला जाईल. जनतेच्या हक्कासाठी काँग्रेस ठामपणे संघर्ष करेल.
>
> **महेंद्र गवई,**
> अध्यक्ष, अकोला शहर काँग्रेस कमिटी

# लाच प्रकरणात ठाणेदारांची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात

## चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | पातूर ■

चान्नी पोलिस ठाण्यात १८ ऑगस्ट रोजी झालेल्या लाच प्रकरणाने पोलिस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असताना, आता या प्रकरणात ठाणेदार गंगाधर दराडे यांच्या भूमिकेचीही सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे लाच प्रकरणाच्या कारवाईनंतर आता ठाणेदारांच्या कथित भूमिकेवरही संशयाची सुई वळली आहे.

नवीन वाईन बार सुरू करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे अर्ज करण्यात आला होता. त्यासाठी आवश्यक असलेले पोलिसांचे ना-हरकत प्रमाणपत्र चान्नी पोलिस ठाण्याकडून देणे अपेक्षित होते. मात्र, या प्रमाणपत्रासाठी विलंब करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर १२ ऑगस्ट रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यात आली होती. या तक्रारीनंतर ठाणेदारांसोबत झालेल्या संभाषणाचे ध्वनिमुद्रण उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे. या संभाषणात 'ठीक आहे, मी देशमुखला बोलतो' असे कथित वक्तव्य झाल्याचा उल्लेख तक्रारीत आहे. त्यामुळे ठाणेदारांनी नेमके कोणाला आणि कशासाठी बोलण्याचे सांगितले, याचा तपास करण्याची मागणी पुढे आली आहे.

### 'देशमुखला बोलतो' या वक्तव्याने खळबळ

लाच प्रकरणात पोलिस उपनिरीक्षक महादेव मधुकरराव देठामुख यांना १८ ऑगस्ट रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून लाचेची रक्कम स्वीकारताना पकडल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, कारवाई केवळ संबंधित अधिकाऱ्यापुरती मर्यादित न ठेवता, त्यामागे आणखी कोणाची भूमिका होती का, याचा छडा लावण्याची मागणी करण्यात आली आहे.

विशेषतः ठाणेदारांच्या कथित संभाषणातील 'ठीक आहे, मी देशमुखला बोलतो' या वक्तव्यामुळे प्रकरण अधिक गंभीर बनले आहे. ध्वनिमुद्रणाची सत्यता, संभाषणाचा संपूर्ण संदर्भ, संबंधित अधिकाऱ्यांमधील संपर्क आणि कथित आर्थिक व्यवहार यांची तपासणी झाल्यास या प्रकरणामागील नेमके चित्र स्पष्ट होऊ शकते.

> **लाच प्रकरणाचा तपास केवळ 'एका अधिकाऱ्या'पुरता नको**
>
> या प्रकरणात ठाणेदारांची भूमिका, संबंधित अधिकाऱ्यांशी झालेले संभाषण, ध्वनिमुद्रण आणि आर्थिक व्यवहार यांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी पोलिस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अमरावती परिक्षेत्र, अकोला जिल्हा पोलिस अधीक्षक तसेच अकोला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली आहे. लाच स्वीकारताना अधिकारी जाळ्यात अडकला असताना, या व्यवहाराची माहिती वरिष्ठ स्तरापर्यंत होती का? संबंधित अधिकाऱ्यांमध्ये नेमका कोणता संवाद झाला? 'देशमुखला बोलतो' या कथित वक्तव्यामागे नेमका संदर्भ काय? या प्रश्नांची उत्तरे तपासातूनच समोर येणार आहेत. त्यामुळे चान्नी पोलिस ठाण्यातील या लाच प्रकरणाचा तपास केवळ एका अधिकाऱ्याभोवती केंद्रित न ठेवता संपूर्ण साखळीची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. आता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग या कथित ध्वनिमुद्रणासह ठाणेदारांच्या भूमिकेची चौकशी करतो का, याकडे लक्ष लागले आहे.

# २४ तासांत मोटारसायकल चोरीचा छडा

## दोन दुचाकींसह एक लाखाचा मुद्देमाल जप्त



### अकोट ग्रामीण पोलिसांची कारवाई; दोघे ताब्यात

■ प्रतिनिधी | अकोट ■

श्री गजानन महाराज विहीर, अकोलखेड येथे दर्शनासाठी आलेल्या भाविकाची मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना घडल्यानंतर अकोट ग्रामीण पोलिसांनी अवघ्या २४ तासांत या गुन्ह्याचा छडा लावला. ऑपरेशन प्रहारअंतर्गत केलेल्या या कारवाईत पोलिसांनी दोन मोटारसायकली जप्त करून एकूण एक लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. याप्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.

गावंडगाव (ता. अंजनगाव सुर्जी) येथील गोपाल काळे हे २० ऑगस्ट रोजी अकोलखेड येथील श्री गजानन महाराज विहिरीवर दर्शनासाठी आले होते. दुपारी सुमारे ४.१० वाजता त्यांनी आपली पल्सर मोटारसायकल (एमएच २७ डीडब्ल्यू ८८५०) मंदिराच्या गेटजवळ उभी केली आणि दर्शनासाठी मंदिरात गेले. दर्शन घेतल्यानंतर काही वेळाने ते बाहेर आले असता मोटारसायकल गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. अज्ञात चोरट्याने ६० हजार रुपये किमतीची मोटारसायकल लंपास केल्याची तक्रार अकोट ग्रामीण पोलिसांत दाखल करण्यात आली.

या प्रकरणी अप. क्र. ६०९/२०२६ अन्वये कलम ३०३(२) बीएनएसनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास सुरू असतानाच पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पथकाने अचलपूर तालुक्यातील सरमसपुरा परिसर गाठला. गांधीपूल परिसरातून चोरीस गेलेल्या मोटारसायकलीसह योगेश शंकर गुजरकर (३०, रा. सावरा, ता. अकोट) आणि शरद अशोक सहारे (३२, रा. खानापुसवेस, अकोट) यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून एमएच २७ डीडब्ल्यू ८८५० क्रमांकाची ६० हजार रुपये किमतीची मोटारसायकल पंचांसमक्ष जप्त केली. दरम्यान, योगेश गुजरकर याने अकोट ग्रामीण पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या अप. क्र. ५२२/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस या गुन्ह्यातील एमएच ३० बीजी ५०२४ क्रमांकाची ४० हजार रुपये किमतीची आणखी एक मोटारसायकल चोरी केल्याची माहिती दिल्याने तीदेखील पोलिसांनी ताब्यात घेतली. त्यामुळे या कारवाईत एकूण एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व सहायक पोलीस अधीक्षक अकोट निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर गठ्ठे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पोहेकॉ विठ्ठल चव्हाण, पोहेकॉ गोपाल जाधव, पोहेकॉ शैलेश जाधव व पोकॉ शुभम लुंगे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

# जिल्हा उद्योग केंद्र प्रमुखांच्या पदनामात बदल

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा उद्योग केंद्राच्या कार्यालयप्रमुखाचे पदनाम आता 'महाव्यवस्थापक'ऐवजी आता 'उपायुक्त (उद्योग व सेवा)' असे झाले आहे.ष्तसा शासन निर्णय उद्योग व खनिकर्म विभागाने निर्गमित केला आहे. विभागाने जाहीर केलेल्या सुधारित आकृतीबंधात नविन पदनामाचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुषंगाने उद्योग आयुक्तालयाने परिपत्रक काढून कार्यालयीन कामकाजात सुधारित पदनामाचा वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार जिल्हा उद्योग केंद्राशी संबंधित सर्व कार्यालयीन पत्रव्यवहार तसेच कार्यालयीन कामकाजामध्ये यापुढे उपायुक्त (उद्योग व सेवा) असे पदनाम वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३६०/२०२६ — प्रोसेस नं.१०४०१/२०२६
चौ.ता. २९/०९/२०२६ — दिनांक : १२/०८/२०२६

**अर्जदार :** १. मालनबी हिम्मत खा २. रूखसाना परवीन रियासत खान प्रोसेस नं.: १०४०१ / २०२६ दिनांक:१२/०८/२०२६ दोन्ही रा. छबनम्मा नगर, इलियास किराणा शॉप जवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ७०२८७३२०८९

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : हिम्मत खान मजीद खान
**पत्ता :-** रा. छबनम्मा नगर, इलियास किराणा शॉप जवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत हिम्मत खान मजीद खान यांचे दि. ०९/०७/२०२० रोजी निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ३रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांच्या न्यायालयात 'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'**

(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र.२

दावा रु. /- — नि.दि.दा.नं.३६८/२०२५ चौ.ता.:१४/०९/२०२६

**साई कन्स्ट्रकशन ...विरुध्द... चुन्नीलाल**

बनाम :-
1.Chunnilai Rathod
2. Ramesh Rathod
R/o- 1709, Kalal ki Chawl, Akola Tq.Dist. Akola

ज्याअर्थी वादी यांनी ' SUIT FOR EVICTION, POSSESSION, ARREARS OF RENT AND INQUIRY INTO FUTURE MESNE PROFIT' यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १४/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे. की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पुष्ट्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल आज दिनांक १९/०८/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का — **आदेशानुसार**
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व.स्तर.), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२१२/२०२६ — प्रोसेस नं.९६४१/२०२६
चौ.ता. ०७/०९/२०२६ — दिनांक : २८/०७/२०२६

**अर्जदार :** १. सुनिलकुमार साधुराम संतानी २. अनिल साधुराम संतानी अर्जदार क. १ व २ रा. घर नं १२०, राधास्वामी मंदिर जवळ, सिंधी कॅम्प, पक्की खोली, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. मीना प्रेमकुमार कटियारा रा. घर नं. ३४१, बाबा श्रीचंद दरबार जवळ, सिंधी कॉलनी, नानक नगर, भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगाव ४. सौ. आशा श्यामलाल लेखराजानी रा. घर नं. १७२/२, हनुमान नगर, सिंधी कॉलनी, भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगाव.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. श्री. साधुराम शोभराजमल संतानी २. सौ. सुशिलाबाई साधुराम संतानी
**पत्ता :-** रा. घर नं १२०, राधास्वामी मंदिर जवळ, सिंधी कॅम्प, पक्की खोली, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. साधुराम शोभराजमल संतानी यांचे दि. १४/०३/२०२६ रोजी एसडीएच बाबा बकाला बीयास, जि. अमृतसर येथे निधन झाले आहे. तसेच मयत सौ. सुशिलाबाई साधुराम संतानी यांचे दि. ०९/०५/२००० रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३६७/२०२६ — प्रोसेस नं.१०५२७/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : १७/०८/२०२६

**अर्जदार :** १. शांताबाई मधुकर वानखडे २. सिद्धार्थ मधुकर वानखडे मो. नं. ९०९६४४५८३० ३. सागर मधुकर वानखडे क्र. १ ते. ३. रा. कृषी नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मधुकर शालीग्राम वानखडे
**पत्ता :-** रा.व्दारा सिद्धार्थ मधुकर वानखडे, पंचशिल नगर, कृषी नगर जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर शालीग्राम वानखडे यांचे दि. २९/०८/२०२४ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३९४/२०२६ — प्रोसेस नं.१०५२२/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : १७/०८/२०२६

**अर्जदार :** १. शेख महेबूब शेख काबिल २. अब्दुल साबीर शेख काबिल रा. लक्ष्मी नगर, पिकनिक बेकरी जवळ, खैर मोहम्मद प्लॉट, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९१३०२५७४१५ ३. नसीम बी शेख नईम रा. नुरी प्लॉट, आझम किराणा के पास, भगतवाडी, खैर मोहम्मद प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ४. शमीम बानो सैय्यद साबीर रा. मक्का मस्जीद के पास, हबीब नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : फैमिदा बी शेख काबील
**पत्ता :-** रा.लक्ष्मी नगर, पिकनिक बेकरी जवळ, खैर मोहम्मद प्लॉट, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत फैमिदा बी शेख काबील यांचे दि. २७/०२/२०१५ रोजी निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## अकोला महानगरपालिका, अकोला सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोला

**निविदा सुचना क्र. १६, (२६-२७)**

आयुक्त, अकोला महानगरपालिका मनपा निधी अंतर्गत ०९ काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal : https://amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/४०३/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : २१/०८/२०२६

## जाहीर नोटीस

सर्वत्र जनतेस वित्तीय संस्थाना बँकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा अकोला ता. जि अकोला यांनी ग्राहक नामे श्री. रोशन गणेश बाहाकर रा. पाथर्डी ता. तेल्हारा जि. अकोला यांनी आमचे पक्षकाराकडे सदरची मिळकत गहाण ठेऊन कर्ज मिळण्या करीता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :**
मौजे - पाथर्डी मालमत्ता क्र.५७४, घर क्र.५७४ क्षेत्रफळ ३५५.३ चौ.फु. त्यावरील बांधकामासह ग्रा. पंचायत पाथर्डी हद्दीतील, ता. तेल्हारा जि. अकोला

**त्यास चतुर्सिमा :** पूर्वेस :- वसंतराव बाहाकर यांचे घर पश्चिमेस : सरकारी रस्ता उत्तर :- घरगुती बोल दक्षिण :- मोहन बाहाकर यांचे घर, वरील सदरहू मालमत्ता हि श्री. गणेश नामदेव बाहाकर यांची वडिलोपार्जित मालमत्ता आहे. तरी वरील मालमत्तेवर आज रोजी कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध, खरेदी, गहाण, बोजा व ईसार व इतर काही व्यवहार असल्यास वर दिलेल्या पत्यावर ७ दिवसाच्या आत लेखी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही. असे समजून आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा -अकोला वरील मालमत्ता गहाण ठेऊन वरील ग्राहक यांना कर्जाची रक्कम वितरित करतील त्या नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करीता जाहीर नोटीस.

दिनांक : २१/०८/२०२६
ठिकाण : अकोला

**अधिवक्ता रुपेश ना. इस्तापे**
(नोटरी भारत सरकार) ऑफीस :
आनंद बेकरी जवळ, रामदास पेठ,
अकोला मो. ९४२३४३०१७१

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३८६/२०२६ — प्रोसेस नं.१०४५८/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ — दिनांक : १४/०८/२०२६

**अर्जदार :** १. राजेशकुमार रामक्रिष्ण व्यास रा. डी - २५०२, लीडोस इस्टेट, विद्या अलंकार इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज रोड, अॅन्टॉप हिल, वडाळा पूर्व, मुंबई. २. प्रविणकुमार रामकृष्ण व्यास रा. बी-२, १००१ कुटच्छी सर्वोदय नगर, नारायण गुरू शाळेजवळ, पी. एल. लोखंडे मार्ग, चेंबूर वेस्ट, मुंबई. ३. संतोष रामकृष्ण व्यास रा. ए-२/१९, कार्नेशन सीएचएस एलटीडी, बरावे रोड, गोद्रेज हिल, कल्याण वेस्ट, कल्याण, ठाणे. ४. कल्पना राजेंद्र पुरोहित रा. फ्लॅट नं. २२, हिमाचल हाउस, डॉ. जयवंत पालकर मार्ग, वोरली, मुंबई. ५. अंजू जितेंद्र पुरोहित मयत तर्फे वारस ५अ. जयश्री जितेंद्र पुरोहित रा. एफ२/४०४, शंकेश्वर नगर, मानपाडा रोड, शनी मंदिरजवळ, डोंबिवली पूर्व, कल्याण, ठाणे. ५ब. मेघा जितेंद्र पुरोहित ५क. अमितकुमार जितेंद्र पुरोहित ५ब व ५क रा. ७४/७६, ३ रा माळा, फ्लॅट नं. ३०१/३०२, प्रभुधन, बोरा बाजार स्ट्रीट, काका इलेक्ट्रिक कंपनीच्या वर, फोर्ट, मुंबई.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. रामकृष्ण हरीबंस व्यास - २. सरस्वती रामकृष्ण व्यास
**पत्ता :-** रा. २२, अजय हाउसिंग कॉलनी, रामकुटी, देशोन्नती प्रेसच्या मागे, मलकापूर रोड, एस. बी. आय. कॉलनीजवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामकृष्ण हरीबंस व्यास यांचे दि. १८/०७/२०१९ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. व मयत सरस्वती रामकृष्ण व्यास यांचे दि. ०७/०५/२०२६ रोजी ग्रेटर मुंबई येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २५२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :-** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# आभाळाकडे डोळे; पावसाच्या दडीने आर्वीतील शेतकरी चिंतेत

**आर्वी/जनमाध्यम**

आर्वी तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यात पावसाने विश्रांती घेतल्याने शेतातील जमिनीतील ओलावा कमी होत असून, पिकांना पाण्याची गरज भासत आहे. त्यामुळे शेतकरी उपलब्ध जलस्त्रोतांचा आधार घेत पिके वाचविण्यासाठी धडपडत आहेत.तालुक्यात सोयाबीन, कापूस, तूर यासह विविध पिकांची वाढ सुरू आहे. या काळात पिकांना पुरेसा पाऊस मिळणे आवश्यक असताना पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांसमोर संकट उभे ठाकले



आहे. विहिरी, बोअरवेल तसेच उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करून शेतकरी पिकांना पाणी देत आहेत. आधीच शेतीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत असताना पावसानेही पाठ फिरवल्याने चिंता अधिकच वाढली आहे. पिके हातातून जाऊ नयेत यासाठी शेतकरी दिवस-रात्र मेहनत घेत आहेत. आता दमदार पावसाची शेतकऱ्यांना प्रतीक्षा असून, आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या बळीराजाला पावसाच्या सरींची आस लागली आहे. पावसाने लवकर हजेरी लावल्यास पिकांना नवसंजीवनी मिळण्याची आशा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## घरासमोरील दुचाकी चोरीला

**सेलू-**घरासमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना सेलू पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सुकळी स्टेशन येथे घडली. याप्रकरणी प्रदीप श्रीराम आत्राम यांनी सेलू पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.प्रदीप आत्राम यांनी त्यांची दुचाकी घरासमोर उभी केली होती. काही वेळाने ते बाहेर आले असता दुचाकी जागेवर दिसून आली नाही. परिसरात शोध घेतला असता दुचाकीचा ठावठिकाणा लागला नाही. अज्ञात व्यक्तीने संधी साधून दुचाकी चोरून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

# समृद्धी महामार्गाच्या पुलाखाली प्रेमीयुगुलांचा धुमाकूळ

**विरूळ आकाजी/जनमाध्यम**

समृद्धी महामार्गाचा परिसर म्हणजे वेग, भव्यता आणि निसर्गसौंदर्याचा अनोखा संगम. विरूळ आकाजी जवळील एक्सचेंजपासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावरून दिवसरात्र वाहनांची प्रचंड वर्दळ सुरू असते. महामार्गावर उभारण्यात आलेले मोठमोठे पूल, रस्त्यालगत करण्यात आलेली वृक्षलागवड आणि सभोवतालची हिरवीगार शेती यामुळे परिसराला निसर्गरम्य रूप प्राप्त झाले आहे. मात्र याच निसर्गरम्य आणि तुलनेने निर्जन परिसराचा काही तरुण-तरुणींकडून गैरफायदा घेतला जात असल्याचे चित्र समोर येत आहे.

महामार्गावरील पुलाखाली प्रेमीयुगुलांचा ठिय्या वाढत असून तासन्तास बसून गप्पा मारण्याचे प्रकार सुरू असल्याचे ये-जा करणाऱ्या प्रवाशांच्या निदर्शनास येत आहे. काही तरुण-तरुणी दुचाकींवरून थेट पुलाखाली येतात आणि बराच वेळ तेथे थांबतात. महामार्गाच्या परिसरात वाहनांची सुसाट वाहतूक सुरू असताना अशा ठिकाणी विनाकारण थांबणे किती धोकादायक आहे, याची जाणीव संबंधितांना आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विशेष म्हणजे मागील दोन-तीन महिन्यांत समृद्धी महामार्गाच्या परिसरात विविध ठिकाणी अपघातांच्या घटना घडल्या आहेत. काही अपघातांमध्ये निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. अपघातांची मालिका सुरू असतानाही महामार्गालगतच्या पुलाखाली तरुणाईचा असा बेफिकीर वावर सुरू असल्याने भविष्यात एखादी गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**शाळा-महाविद्यालयाच्या नावाखाली फिरस्ती**

या परिसरात येणाऱ्या काही तरुण-तरुणींबाबत शाळा किंवा महाविद्यालयाच्या नावाखाली



- अपघातांचे सत्र सुरू असतानाही निर्जन ठिकाणी तासन्तास प्रेमीयुगुलांचा ठिय्या
- शाळा महाविद्यालयाच्या नावाखाली तरुणाईची भटकंती
- प्रशासनाने वेळीच लक्ष न दिल्यास अनर्थाची भीती

बाहेर पडून अशा निर्जन ठिकाणी वेळ घालविला जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे पालकांनी आपल्या मुला-मुलींच्या हालचालींकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. मुलांच्या शिक्षणाच्या वेळेत ते नेमके कुठे जातात, कोणासोबत असतात आणि कोणत्या परिसरात वेळ घालवतात, याकडे पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

**प्रशासनाच्या गस्तीचा अभाव**

समृद्धी महामार्ग परिसरातील पुलांखाली आणि एक्सचेंजलगतच्या भागात नियमित पोलिस गस्त वाढविण्याची गरज आहे. निर्जन ठिकाणी संशयास्पद पद्धतीने वाहने उभी असतील किंवा तरुण-तरुणी तासन्तास थांबलेले आढळून आल्यास त्यांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे, सूचना फलक आणि नियमित गस्त वाढविल्यास अशा प्रकारांना काही प्रमाणात आळा बसू शकतो.

महामार्गावरून जाणाऱ्या वाहनचालकांचे लक्ष विचलित होणे, अचानक रस्त्यावर येणे किंवा पुलाखालील भागातून मुख्य मार्गावर येण्याचा प्रयत्न करणे यामुळे गंभीर अपघात होण्याचा धोका आहे. त्यामुळे हा केवळ नैतिकतेचा विषय नसून थेट वाहतूक सुरक्षेशी संबंधित प्रश्न आहे.

**अनर्थाची वाट' प्रशासन कधी रोखणार**

समृद्धी महामार्ग हा राज्यातील महत्त्वाकांक्षी महामार्ग आहे. या महामार्गावर प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य असणे अपेक्षित आहे. मात्र अपघातप्रवण परिसरात निर्जन ठिकाणी तरुणाईचा वाढता वावर प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरत आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. पुलाखालील परिसरात नियमित गस्त, रात्रीच्या वेळी विशेष निगराणी, सीसीटीव्हीची व्यवस्था आणि विनाकारण थांबणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने या बाबीकडे गांभीर्याने पाहिले नाही तर उद्या एखादा अपघात किंवा अनुचित प्रकार घडल्यानंतर जबाबदारी कोणाची, असा प्रश्न निर्माण होऊ शकतो.


महामार्ग वेगासाठी आहे, एकांतासाठी नाही. प्रशासनाने पुलाखालील या 'ठिय्यां'कडे वेळीच लक्ष दिले नाही तर निसर्गरम्य परिसराचे रूपांतर धोकादायक अड्ड्यात होण्यास वेळ लागणार नाही.

# आज मांडगावात संत बऱ्हाणपुरे महाराजांचा पुण्यतिथी सोहळा

## पालखी मिरवणुकीने भक्तीचा जल्लोष

**मांडगाव/जनमाध्यम**

मांडगाव येथील श्री संत बऱ्हाणपुरे महाराज समाधी देवस्थानात दरवर्षीप्रमाणे यंदाही श्रावण शुद्ध दशमीनिमित्त आज, शनिवार २२ ऑगस्ट रोजी संत बऱ्हाणपुरे महाराजांचा पुण्यतिथी सोहळा भक्तिमय वातावरणात साजरा होत आहे. सोहळ्यानिमित्त मंदिर परिसराला आकर्षक सजावट व रंगीबेरंगी रोषणाई करण्यात आली असून पटांगणात मंडप उभारण्यात आला आहे. भक्तीमय वातावरणामुळे मांडगाव नगरीत जणू पंढरपूर अवतरल्याचे चित्र निर्माण झाले आहे.



सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ५ ते ६ काकड आरती, सकाळी ७ ते ९ पारायण, सायंकाळी ५ ते ७ हरिपाठ तसेच सकाळी आणि सायंकाळी भागवत कथा, कीर्तन, भजन व प्रवचनाचे कार्यक्रम सुरू आहेत. ह.भ.प.परमेश्वरी दीदी महाराज यांच्या संचाच्या माध्यमातून विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत.

आज सकाळी श्रींची पूजा व अभिषेक झाल्यानंतर सकाळी १० ते १२ काल्याचे कीर्तन होणार आहे. दुपारी १२ वाजता श्रींच्या पालखीची भव्य मिरवणूक गावातील प्रमुख मार्गावरून काढण्यात येणार आहे. मिरवणुकीत भजनी मंडळे, महिला-पुरुष, बालगोपाल, विविध वेशभूषा, गवळण व नृत्य सादरीकरणासह घोडे, बग्गी, बँड पथक व आतषबाजी आकर्षण ठरणार आहे. पोलिसांकडूनही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. रस्त्यांवर आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या असून भाविकांसाठी ठिकठिकाणी लंगर, बुंदा, दूध-चहा व मसालेभाताची व्यवस्था करण्यात आली आहे. दुपारी २ वाजता बऱ्हाणपुरे महादेव सार्वजनिक प्रगट मंदिर येथे ह.भ.प. बोळवटकर महाराज यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात येणार आहे. त्यानंतर पालखी मंदिरात परतल्यानंतर आरती व काल्याचे वितरण होईल. दुपारी ३ वाजल्यापासून महाप्रसादाच्या पंगती सुरू करण्यात येणार आहेत. या पुण्यतिथी सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची अपेक्षा असून भक्तांनी शांततेत दर्शन घेऊन सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन देवस्थान समिती व मांडगाव ग्रामस्थांनी केले आहे.

# अल्पसंख्याकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा राष्ट्रवादीचा निर्धार



**वर्धा/जनमाध्यम**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वर्धा जिल्हा व सहकार सेलच्या वतीने शासकीय विश्रामगृहात आयोजित मुस्लिम व अल्पसंख्याक समाज मुख्य प्रवाह शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्र शासनाच्या मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक सलीम सारंग यांनी उपस्थित नागरिकांशी थेट संवाद साधत महामंडळाच्या विविध योजनांची माहिती दिली. महामंडळाचे विभागीय अधिकारी नफीस खान यांनी महिला बचत गटांसाठी कर्ज, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज, उद्योग उभारणीसाठी अर्थसहाय्य, परदेशात उच्च शिक्षणासाठी कर्ज तसेच लघुउद्योग व व्यवसाय प्रशिक्षणाच्या योजनांची सविस्तर माहिती दिली. या योजनांचा पात्र लाभार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी सुधीरबाबू कोठारी, प्रफुल गुल्हाने, विभा दाते, संतोषसिंह ठाकूर, स्नेहा आकरे, भारती पोटफोडे, अश्विनी शिरपूरकर यांच्यासह राष्ट्रवादीचे विविध पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर सलीम सारंग व जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची संघटनात्मक विषयांवर बैठक झाली. यावेळी कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

# होय, मी ओबीसी...!'चा बुलंद आवाज

## नवोदयची सान्वी वंजारे तृतीय पुरस्काराने सन्मानित

**वर्धा/जनमाध्यम**

वय अवघे बालपणाचे,पण आवाज मात्र सामाजिक वास्तवाला भिडणारा. होय, मी ओबीसी.! या एकपात्री नाटिकेतून सामाजिक प्रश्नांना संवेदनशीलपणे वाचा फोडणाऱ्या पी.एम.श्री.जवाहर नवोदय विद्यालय, सेलूकाटे येथील सातवीच्या विद्यार्थिनी सान्वी किरण पंकज वंजारे हिने आपल्या अभिनयाची ठसठशीत छाप उमटवली.

तिच्या उत्कृष्ट सादरीकरणाची दखल घेत तिला खुल्या एकपात्री नाट्य स्पर्धेत तृतीय पुरस्काराने गौरविण्यात आले. सिंदी (मे.) येथील जयभीम बुद्ध विहार व जयभीम धम्मशाळेच्या वतीने तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव, आई रमाई स्मृतिदिन व जयभीम



धम्मशाळेच्या वर्षपूर्तीनिमित्त महापुरुषांच्या विचारांवर आधारित खुली एकपात्री नाट्य स्पर्धा घेण्यात आली होती. राज्यभरातून स्पर्धक सहभागी झाले होते.

सान्वीच्या या यशाबद्दल स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात उपप्राचार्य तथा प्रभारी प्राचार्य प्रिया गजभिये, वरिष्ठ शिक्षक सचिन खोब्रागडे, कुणाल गेडाम, देशराज गौड व रंजना वानखेडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व गौरवचिन्ह देऊन तिचा सन्मान करण्यात आला. शिस्त,समता, बंधुभाव आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून आदर्श नागरिक घडविणे हे नवोदय विद्यालयाचे ध्येय आहे, असे प्रिया गजभिये यांनी सांगितले. सान्वीने आपल्या यशाचे श्रेय नाट्य प्रशिक्षक तथा चित्रपट दिग्दर्शक हरिष इथापे यांना दिले. तिच्या यशाबद्दल शिक्षक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

## घरासमोरील दुचाकी पेटविली; दोघांविरुद्ध गुन्हा

**वर्धा-**घरासमोर उभी केलेली दुचाकी दोघांनी पेटवून दिल्याची घटना सावंगी मेघे येथे घडली. या घटनेत आकाश शंकर नारनवरे यांचे सुमारे ६० हजार रुपयांचे नुकसान झाले. याप्रकरणी आकाश नारनवरे यांनी सावंगी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.तक्रारीनुसार, आकाश यांनी त्यांची दुचाकी घरासमोर उभी केली होती. दरम्यान, दर्शन कहाटे रा. सालोड हिरापूर व त्याच्या एका मित्राने दुचाकीला आग लावल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. आगीमुळे दुचाकी जळून मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. आकाश नारनवरे यांच्या तक्रारीवरून सावंगी पोलिसांनी दर्शन कहाटे व त्याच्या मित्राविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेमागील कारणाचा पोलिसांकडून तपास सुरू आहे.

# हक्काचे पाणी द्या': रत्नापूरमध्ये ३२ पाणी वापर संस्थांचा एकमुखी आवाज

**देवळी/जनमाध्यम**

तालुक्यातील रत्नापूर येथील अखंड गीता दर्शन न्यास श्रीक्षेत्र ओंकारेश्वर मंदिर सभागृहात विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने पाणी वापर संस्थांची कृषी व सिंचन विषयक कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत गिरोली विभागातील ३२ पाणी वापर संस्था सहभागी झाल्या असून सुमारे ९० प्रतिनिधी उपस्थित होते.जल व भूमी व्यवस्थापन तज्ज्ञ डॉ. राजेश पुराणिक यांनी धरणात साठवलेल्या पाण्यावर



शेतीच्या सिंचनासाठी शेतकऱ्यांचा प्रथम हक्क असल्याचे सांगितले. आपल्या हक्काच्या पाण्याची मागणी सिंचन विभागाकडे करण्यासाठी पाणी वापर संस्थांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. पाणी उपलब्ध असूनही शेतीला दुष्काळाचा सामना करावा लागू नये, यासाठी नियोजनबद्ध पाणी वापर गरजेचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गोसीखुर्द प्रकल्पाचे वरिष्ठ अभ्यासक मिलिंद जोशी यांनी अडवलेल्या पाण्याच्या यशोगाथा सांगत धरणातील पाण्याचा पुरेपूर वापर करण्याचा सल्ला दिला. निम्न वर्धा प्रकल्पाचे वरिष्ठ अभ्यासक निलेश मुंजे यांनी पाणी वापर संस्था सक्षम केल्याशिवाय धरणाच्या पाण्याचा पूर्ण लाभ मिळणार नसल्याचे स्पष्ट केले. सिंचन विभागाचे उपविभागीय अधिकारी प्रशांत बुरेवार यांनी विभागातर्फे आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाला सरपंच सुधीर बोबडे, उपसरपंच सौरभ कडू, कृषी सहायक प्रवीण वाळके यांच्यासह शेतकरी व संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अनियंत्रित कार दुभाजकावर आदळली, जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा-**अकोल्याच्या दिशेने जात असलेली कार अनियंत्रित होऊन थेट दुभाजकावर आदळल्याने झालेल्या अपघातात हिमांशू पाली रा.अकोला यांचा मृत्यू झाला. हा अपघात कारंजा तालुक्यातील सावळी खुर्द परिसरात घडला. अपघातानंतर गंभीर जखमी झालेल्या हिमांशू यांना उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.अकोल्याच्या दिशेने जात असताना कारवरील नियंत्रण सुटल्याने ती थेट रस्त्याच्या दुभाजकावर जाऊन आदळली. या धडकेत हिमांशू गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मदतकार्य केले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्रकृती खालावली आणि अखेर त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी कारंजा पोलिसांनी १९ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करून अपघाताच्या कारणाचा तपास सुरू केला आहे.

# आश्वासनानंतर संगीता कदम यांच्या मध्यस्थीने उपोषणाची सांगता

## प्रशासनाच्या भूमिकेकडे ग्रामस्थांचे लक्ष



**आष्टी शहीद/जनमाध्यम**

थार येथील विविध मागण्यांसाठी उपोषणाला बसलेले भास्कर घोरपडे यांनी अखेर उपोषण मागे घेतले. सरपंच संगीता कदम यांच्या मध्यस्थीने प्रशासन व उपोषणकर्त्यांमध्ये सकारात्मक चर्चा होऊन मागण्यांवर तोडगा काढण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर उपोषणाची सांगता करण्यात आली. यावेळी कृष्णा हरले यांनी महत्त्वाची मध्यस्थीची भूमिका बजावत प्रशासन व उपोषणकर्त्यांमध्ये समन्वय साधला. तसेच प्रा. बी. टी. उरकुडे यांच्या शिष्टाईमुळे चर्चेला सकारात्मक दिशा मिळाली. संबंधित मागण्यांबाबत प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेण्यात आल्यानंतर भास्कर घोरपडे यांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला.

अखेर सरपंच संगीता कदम यांच्या हस्ते भास्कर घोरपडे यांना लिंबू सरबत पाजून उपोषणाची सांगता करण्यात आली. यावेळी गटविकास अधिकारी पोकळे, विस्तार अधिकारी राठोड,कृष्णा हरले,प्रा.बी.टी.उरकुडे,वरकड,उपसरपंच संदीप परतेती, ग्रामपंचायत सदस्य देविदास कोडापे आणि ग्रामपंचायत सदस्य घोरपडे उपस्थित होते.उपोषण मागे घेण्यात आले असले तरी प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची वेळेत पूर्तता होणार का,याकडे आता थार ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली तरच उपोषणातून झालेला तोडगा अर्थपूर्ण ठरेल,अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# स्काऊट गाईड आदर्श नागरिक घडवणारी चळवळ आहे-रुपेश कांबळे

## शिक्षकांच्या कार्यशाळेचे उद्‌घाटन

**वर्धा/जनमाध्यम**

'मोबाईल, टेलिव्हिजन, यूट्यूब यासारख्या आधुनिक मनोरंजनाच्या साधनांमुळे शालेय महाविद्यालयीन मुला मुलींवर फार मोठा प्रभाव निर्माण होत आहे. सकारात्मक कमी व नकारात्मक जास्त अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे दिवसेंदिवस सामाजिक कमी होत आहे. म्हणून अशा परिस्थितीत भारत स्काऊट गाईडच्या 'खेळातून शिक्षण', कृतीतून प्रशिक्षण, योग्य संस्कार व समाजाविषयी जाणीव यासारखे मूल्य रुजवली जात असल्यामुळे सदर प्रशिक्षण आवश्यक केले पाहिजे. स्काऊट गाईड आदर्श नागरिक घडविणारी चळवळ आहे,असे प्रतिपादन प्राथमिकचे शिक्षणाधिकारी तथा स्काऊट गाईडचे जिल्हा मुख्य आयुक्त रुपेश कांबळे यांनी स्थानिक स्काऊट गाईडच्या जिल्हा प्रशिक्षण केंद्र येथे आयोजित एक दिवसीय शिक्षकांसाठी कार्यशाळा तथा संवाद कार्यक्रमात २० ऑगस्ट रोजी आपल्या मार्गदर्शनात केले.

स्काऊट गाईड शिक्षकांच्या कार्यशाळेच्या उद्‌घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणाधिकारी रुपेश कांबळे तर प्रमुख अतिथी म्हणून उपशिक्षणाधिकारी तथा स्काऊट गाईडचे जिल्हा चिटणीस ज्ञानेश्वर पानसरे, विस्तार अधिकारी राजेंद्र मस्के, विस्तार अधिकारी अर्चना पोरेड्डीवार, रोव्हर स्काऊटचे जिल्हा आयुक्त कॅप्टन मोहन गुजरकर, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्राचार्य सतीश जगताप, स्काऊटचे जिल्हा संघटक नितेश झाडे,गाईडच्या जिल्हा संघटक



वैशाली घोम, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त उर्मिला चौधरी, जिल्हा संघटक मंजुषा जाधव,राजहंस जंगले, सुनील खासरे अभिजीत पारगावकर दीपक गुडेकर रेणुका भोयर याकूब शेख व गजेंद्र गिरडकर उपस्थित होते.

जिल्हा चिटणीस ज्ञानेश्वर पानसरे म्हणाले या शैक्षणिक क्षेत्रात स्काऊट गाईडचे उपक्रम कृतिशील पद्धतीने आपण राबवणार आहोत. विद्यार्थ्यांना योग्य वयात योग्य संस्कार मिळाल्यास त्यांच्या सकारात्मक बदल घडून येतो म्हणून शिक्षकांना आवाहन करताना त्यांनी आपण प्रत्येक आठवड्यात एकदा तरी हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी राबवावा असे आवाहन केले.

विस्तार अधिकारी अर्चना पोरेड्डीवार यांनी आपल्या मार्गदर्शनात स्काऊट गाईडचे चळवळ ही जबाबदार नागरिक बनवणारी चळवळ आहे आणि म्हणूनच शालेय जीवनातच मुला मुलींना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे तर रोव्हर स्काऊटचे जिल्हा आयुक्त कॅप्टन मोहन गुजरकर म्हणाले प्रत्येक शाळेतील शिक्षक शिक्षिका व जिल्हा संस्था यांचा योग्य समन्वय असल्यास विद्यार्थ्यांमध्ये स्काऊट गाईडसची मुल्ये सहजपणे रुजवता येईल आणि म्हणूनच आठवड्यातला एक तास स्काऊट गाईडच्या प्रशिक्षणाकरिता द्यावा असे आवाहन केले. आपल्या प्रास्ताविक भाषणातून स्काऊटचे जिल्हा संघटक यांनी या शैक्षणिक क्षेत्राचा आराखडा समोर ठेवून आम्ही स्काऊट गाईडचे प्रशिक्षण दर्जेदार देण्याकरिता कटिबद्ध आहोत असे विशद केले.

एक दिवसीय कार्यशाळेत जिल्हा प्रशिक्षण आयुक्त उर्मिला चौधरी, साहेब जिल्हा आयुक्त राजहंस जंगले, सुनील खासरे अभिजीत पारगावकर दीपक गुढेकर, रेणुका भोयर,याकुब शेख व गजेंद्र गिरडकर यांनी उपस्थित शिक्षकांना प्रशिक्षण दिले.उद्‌घाटन कार्यक्रमाचे संचालन गाईडच्या जिल्हा संघटक वैशाली घोम यांनी तर आभार जिल्हा संघटक मंजुषा जाधव यांनी मानले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २६५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# राजीव गांधींचे आधुनिक भारताच्या उभारणीत मोठे योगदान : बबलू देशमुख

## काँग्रेस भवनात जयंतीनिमित्त अभिवादन

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारताचे माजी पंतप्रधान तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी (दि.२०) अमरावती येथील काँग्रेस भवनात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या हस्ते स्व. राजीव गांधी यांच्या प्रतिमेला आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी बोलताना बबलू देशमुख म्हणाले की, स्व. राजीव गांधी यांनी देशाच्या विकासाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत भारताला नव्या युगाकडे नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. युवकांना मतदानाचा अधिकार देणे, संगणक व दूरसंचार क्षेत्राला चालना देणे तसेच पंचायतराज व्यवस्थेला बळकटी देण्याच्या माध्यमातून त्यांनी देशाच्या भविष्यासाठी दूरदृष्टीचे निर्णय घेतले. त्यांच्या आधुनिक आणि प्रगतिशील विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे त्यांनी सांगितले.



राजीव गांधी यांनी देशाच्या एकात्मता, प्रगती आणि विकासासाठी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन काँग्रेस कार्यकर्त्यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करावा, असे आवाहनही बबलू देशमुख यांनी केले.

कार्यक्रमाला हरिभाऊ मोहोड, प्रकाशराव काळबांडे, संजय वानखडे, प्रदीप देशमुख, समाधान दहातोंडे, शैलेश गवई, सिद्धार्थ बोबडे, प्रशांत भोयर, धनंजय देशमुख, शेखर दाभणे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी स्व. राजीव गांधी यांच्या कार्याला उजाळा देत उपस्थितांनी त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२१३/२०२६** **ने.ता.२१.०९.२०२६**

| | |
|---|---|
| **१. हरिदास श्रीरामजी मेश्राम** | रा. महादेव खोरी, गल्ली नं.२, अमरावती, जि.अमरावती |
| **२. नरेंद्र श्रीरामजी मेश्राम** | रा.प्रगती नगर, कारेगाव रोड, परभणी, जि.परभणी |
| **३. बेबी होमेश्वर रामटेके** | रा.सावनेर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती |
| **४. वंदनाबाई अशोक मेश्राम** | |
| **५. रुपाली सुखदेव कांबळे** | रा.प्रगती नगर, कारेगाव रोड, परभणी, जि.परभणी |
| **६. शुभम अशोक मेश्राम** | रा.मिलींद नगर, चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती |
| **७. कमलाबाई जयकुमार मेश्राम** | |
| **८. किरण जयकुमार मेश्राम** | |
| **९. अजय जयकुमार मेश्राम** | क्र.७ ते ९ रा.प्रगती नगर, कारेगाव रोड, परभणी, जि.परभणी |
| **१०.विजय जयकुमार मेश्राम** | रा.प्रगती नगर, कारेगाव रोड, परभणी, जि.परभणी |
| **११.लता जिवन मेश्राम** | |
| **१२.साक्षी जिवन मेश्राम** | |
| **१३.नेहा जिवन मेश्राम** | |
| **१४.जयकुमार जिवन मेश्राम** | क्र.११ ते १४ रा.प्रगती नगर, कारेगाव रोड,परभणी, जि.परभणी |

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी, **मयत श्रीराम डोमाजी मेश्राम यांचा मृत्यू दि.०७.०९.२००४ मध्ये जावरा मोळवण, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला.मयताचे पत्नी नामे **मणकर्णाबाई श्रीराम मेश्राम** यांचा **मृत्यू दि.१५.०४.२०१३** मध्ये **सावनेर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ व ३ ही मुले, अर्जदार क्र.३ ही मुलगी, अर्जदार क्र.४ ही सुन, अर्जदार क्र.५ ही नात, अर्जदार क्र.६ हा नातू, अर्जदार क्र.७ ही सुन, अर्जदार क्र.८ ही नात, अर्जदार क्र.९ व १० हे नातू, अर्जदार क्र.११ ही सून, अर्जदार क्र.१२ व १३ हया नातीन व अर्जदार क्र.१४ हा मयताचा नातू आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०५ ऑगष्ट २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयात स्तनपान सप्ताह संपन्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भयुथ वेलफेअर सोसायटी द्वारा संचलित इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय अमरावती येथे स्तनपान सप्ताह निमित्य गृह अर्थशास्त्र विभागाअंतर्गत कार्यक्रम आयोजित केला.



यावेळी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर अजय कोल्हे सर होते. तर प्रमुख मार्गदर्शक प्राध्यापक डॉक्टर वंदना बनकर मॅडम होत्या. त्यांनी स्तनपानाविषयी स्वच्छता, बाळाला दूध देण्याच्या पद्धती, आरोग्याच्या दृष्टिकोनातून स्तनपानाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला.आईने बाळाला स्तनपान केल्यामुळे स्तनांचा कर्करोग यापासून कसा बचाव होतो याचे विद्यार्थिनींना ज्ञान दिले. यावेळी प्रमुख अतिथी विदर्भ युथ वेल फेयर सोसायटीच्या कार्यकारणी सदस्य प्राध्यापक डॉक्टर पूनम चौधरी यांनी आईचे दूध बाळाला किती आवश्यक व महत्त्वाचे आहे. त्यामुळे आईचे व बाळाचे संबंध कसे दृढ होतात यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक डॉक्टर सीमा अढाऊ यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. अनुराधा पाथरकर यांनी केले. यावेळी पाहुण्यांचे आभार प्रा.डॉ. योगिता टिक्कस यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता खुशी शिरसाट, पूर्वा पाटील, नेहा बघेल, प्रिया ढोके,अमृता बेठेकर,हर्षिता पाटील यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार **डॉ.राजेंद्रकुमार ज्ञानेश्वर मुंदे, रा. अमरावती** हे आम जनतेला या जाहीरात व्दारे सुचित करतात की, खालील वर्णन केलेली मालमत्ता शेत माझे पक्षकार यांनी अलका राजेंद्र पंढरपुरे, रा.भाजी बाजार, अमरावती, यांच्याशी त्याच्या रजिष्टर खरेदी खत क्र.अ.न. ३३९०/२०२४ रोजी केलेल्या खरेदी हक्कावरुन व तेव्हापासून त्याच्या मालकीचे व ताब्यातील खालील वर्णन केलेले शेत कायम स्वरुपी खरेदी खत करण्याचा व्यवहार केलेला आहे.

**- मालमत्ता वर्णन -**

नांदगाव खंडेश्वर, जिल्हा- अमरावती यांच्या कक्षेतील ''मौजे- कोव्हळा जटेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जिल्हा अमरावती येथील भूमापन क्र.२७०, भोगवटदार वर्ग-१, एकूण क्षेत्रफळ ३ हे २२ आर + पो.ख.०.०३ आर, आकार रु. ७.६० यातील त्यांच्या मालकीचे १ हे २२ आर + पो.ख.०.०१ जमीन आहे,'' त्याची चतुःसिमा ः -

**पुर्वेस - विनोद लवंगे यांचे शेत** **पश्चिमेस - रोड**
**उत्तरेस - बंसिराम मांडवगडे यांचे शेत** **दक्षिणेस - करामत शहा यांचे शेत**

वर वर्णन केलेला शेत/मालमत्ता बददल कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, कोणत्याही बॅकेचे कर्ज, गहाण, बोजा,ताबा, हक्क, हितसंबंध, वारसाहक्क, सावकारी कर्ज, पतसंस्था चे कर्ज, बक्षीस पत्र, वारसा हक्क, इत्यादी कोणत्याही प्रकारचे हितसंबंध, पूर्वीचा करार, व्यवहार अथवा आक्षेप असल्यास त्यांनी खालील दिलेल्या पत्यावर /जाहिरात प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आंत लेखी पुराव्यासहीत समक्ष संपर्क करावा व लेखी पोच घ्यावी, अन्यथा वरील मुदती नंतर माझे पक्षकार सदर शेताचा खरेदी खत नोंदवून घेतील त्यानंतर कोणाचाही कुठलाही प्रकारची उजर चालणार नाही. कृपया आम जनतेनी याची नोंद घ्यावी.

करिता जाहीर नोटीस.

**दिनांक २१.०८.२०२६**
**ठिकाण : अमरावती**

**सही/-**
**ॲड.गौरव पुंडलिकराव मुंदे**
**मेडि-टेक हॉस्पिटल, कोल्हटकर मंगल कार्यालय रोड, राजापेठ, अमरावती**
**मो.९५११२८८२७७/९५११२८८२७७**

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

**सूचना**
**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**४ था मजला, मुख्य ईमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मुंबई-४०००३२**
**दिनांक ३१.०७.२०२३**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

क्र. **टीपीएस-१८२५/२८३/प्र.**क्र.७७/२०२५/नवि-१३ - ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व अन्य काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागू करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (यापुढे जिचा उल्लेख **उक्त नियमावली** असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख **उक्त अधिनियम** असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र.टीपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वि.यो. व प्रायो./कलम ३७(१कक)(ग) व कलम २०(४)/ नवि-१३, दि.०२.१२.२०२० अन्वये मंजुरी दिली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १५ अन्वये दि.२५.११.१९९७ रोजीच्या अधिसुचनेनुसार मंजूर पुणे प्रादेशिक योजनेतील सेक्टर-आर बाबत (यापुढे ज्याचा उल्लेख **उक्त सेक्टर** असा करण्यात आलेला आहे) उक्त नियमावलीमध्ये एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांचा विकास प्रतिबंधित करण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त सेक्टरमधील वाढत्या मागणीच्या प्रमाणात नियोजनबध्द विकास होण्याच्या अनुषंगाने, उक्त सेक्टरमध्ये एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पांतर्गत मर्यादित स्वरुपाचा विकास अनुज्ञेय करण्याकरीता उक्त नियमावलीत सुधारणा करणे अत्यावश्यक असल्याबाबत शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत.

आणि ज्याअर्थी, सद्यस्थितीत सेक्टर-आर मध्ये वाढत्या मागणीनुसार, विशेषतः लोणावळा परिसरात मोठ्या प्रमाणात घरांची बांधकामे होऊन विकास होत आहे. सदर जमिनीवर घरांची बांधकामे करतेवेळी रेखांकन आराखडा करतांना लहान भूखंडावर बंगल्याच्या स्वरुपात विकास होत असून, त्यामुळे कमी रुंदीचे रस्ते, कमी मोकळी जागा, अपुरे सुविधा क्षेत्र तयार होत आहेत.

आणि ज्याअर्थी, सदर ठिकाणी ITP च्या माध्यमातून सदरचे क्षेत्रामध्ये मर्यादित स्वरुपाचा विकास अनुज्ञेय केल्यास, सदर ठिकाणी नियोजनबध्द बांधकाम विकास, पुरेशी खुली जागा, सुविधा क्षेत्रे, प्रशस्त रस्ते व इतर नियोजनाच्या दृष्टीने विकास करता येऊ शकेल.

आणि ज्याअर्थी, उक्त निवेदने व नियोजनाच्या दृष्टीकोनातून उक्त नियमावलीतील प्रकरण ५ मधील निनियम क्र.५.९ "FOR PUNE REGIONAL PLAN" मध्ये सोबतच्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमुद केल्याप्रमाणे नवीन तरतुदीचा समावेश करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख **उक्त फेरबदल** असा करण्यात आलेला आहे.

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २०(३) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तदनुषंगिक शक्तीचा वापर करुन उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेररबदलावरील कोणत्याही सूचना/हरकती, ही सूचना महाराष्ट्र शसन राजपत्रात पसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांचेकडे दाखल करता येतील. त्यानुसार सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांना प्राप्त सूचना/हरकतीवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

ही सूचना कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरीता जनतेच्या अवलोकानार्थ खालील कार्यालयात उपलब्ध राहील.

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विभागीय आयुक्त, पुणे विभाग,
३) पुणे जिल्हाधिकारी
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद
५) महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे
६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ
७) विभागीय सहसंचालक, नगर रचना पुणे विभाग
८) मुख्याधिकारी, लोणावळा नगर परिषद

ही सूचना शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) वर उपलब्ध राहील.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने

**स्वा/-**
**(प्रणव कर्पे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**परिशिष्ट - अ**

**शासन नगर विकास विभागाकडील सूचना क्र.टीपीएस-१८२५/२८३/प्र.क्र.७७/२०२५/नवि-१३, दि.३१.०७.२०२६ सोबतचे सहपत्र**

| Regulation No. | Proposed Provision |
|---|---|
| 5.9 FOR PUNE REGIONAL PLAN | Regulation No.5.9.2 : ITP- Regulations for Planning Areas of Sector-R of Regional Plan of Pune Region.<br>Integrated Township Project is permitted in Sector-R of Regional Plan of Pune Region with following conditions.<br>i) FSI shall be limited to 1.0 as basic FSI along with additional Ancillary FSI only.<br>ii) Maximum Height of Building shall be permitted upto 45 meters.<br>iii) The mandatory amenities of ITP shall be provided in proportion with consumption of FSI.<br>iv) Remaining provisions of ITP from Regulation No.14.1.1 shall be applicable in toto. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने

**(वि.मा.का./अम/जाही./४४२/२०२६-२०२७)**

**स्वा/-**
**(प्रणव कर्पे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१६५९/२०२६**
**Sau. Arjuna Rajendra Umale + 4 Versus NIL**
**पुढील ता.२४.०९.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants :-**

1. **Sau. Aruna Rajendra Umale**,Aged 56 Yrs. Occu.: Household R/o. Bhagwan Nagar, Yashoda Nagar Chowk, Tq. & Dist. Amravati
2. **Nitin Ramchandra Kalaskar** , Age 55 Yrs. Occu.: Busines, R/o. 56, Forest Colony, Bypass Road, Near Yashoda Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
3. **Sau. Vandana Pradeep Bhalerao** Age 52 Yrs. Occu.: Household R/o. Ramdeobaba Nagar, Akot, Tq. Akot, Dist. Akola
4. **Sau. Archana Rajendra Bhagat,** Age 50 Yrs. Occu.: Household R/o. A 303, Panchawati CHS Ltd. Plot No. 10 Kamothe, New Mumbai, Panvel, Raigarh.
5. **Sau. Manju Balwant Kadu,** Age 47 Yrs. Occu.: Household R/o. 208, Shrishti Apartment, Fort Road, Gird Lakshar, Gwalior (Madhya Pradesh) --- **Versus**---

**Non -Applicant**
**Mangesh Ramchandra Kalaskar,** Age 47 Yrs. Occu.: Service R/o. AGO office, 2nd floor, Pratishtha Bhavan, 101, Maharshi Karve Road, New Marine, Lines, Mumbai

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Late Ramchandra Namdevrao Kalaskar** हे दिनांक ०१.०६.१९९८ रोजी अमरावती व **Late Smt. Kusum Ramchandra Kalaskar** हे दि.२०.०२.२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Sau. Aruna Rajendra Umale + 4Vs. गैरअर्जदार Mangesh Ramchandra Kalaskar** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Sau. Aruna Rajendra Umale + 4Vs.गैरअर्जदार Mangesh Ramchandra Kalaskar** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**नमुना क्रमांक २**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**
**मंदार मोहन राउत यांचे न्यायालयात**
**सह दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, चांदूर बाजार,चांदूर बा. अमरावती**

**वादप्रश्नांच्या निश्चितीसाठी समन्स**
**(आज्ञावली ५, नियम १,५)**

**नियमित दिवाणी दावा/९/२०१९**
**साहेबराव विठ्ठलराव पाथरे वि.अनिल प्रेमचंद पटेल**
**पुढील तारीख-२१/०९/२०२६**

**प्रति,**
**अनिल प्रेमचंद पटेल**
**रा.घोगडी, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती, AMRAVATI, MAHARASHTRA**

ज्याअर्थी **साहेबराव विठ्ठलराव पाथरे,** यांनी तुमच्याविरुध्द बद्दल दावा दाखल केला आहे.म्हणून सदर दाव्याचा जवाब देण्यासाठी **२१/०९/२०२६** रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात जातीने, किंवा ज्यास यथायोग्य सुचना दिलेल्या असून जो दाव्यासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती ज्यांच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याव्दारे बोलावण्यात येत आहे. [1](आणि उक्त दिवशी तुमच्या बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा आणि तुमचा बचाव किंवा वजावटीची हक्कमागणी किंवा प्रतिहक्कमागणी ज्यांच्यावर आधारलेली असेल असे तुमच्या कब्ज्यात किंवा अख्यत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर करण्याचा निर्देश तुम्हाला याव्दारे देण्यात येत आहे आणि तुमच्या बचावाच्या किंवा हक्कमागणीच्या पुष्ठयर्थ पुरावा म्हणून तुम्ही तुमच्या कब्ज्यात किंवा अखत्यारात असलेल्या किंवा नसलेल्या अशा अन्य कोणत्याही दस्ताऐवजांवर अवलंबून असाल त्याबाबतीत, तुम्ही, प्रतिवादपत्रासोबत जोडावयाच्या यादीमध्ये अशा दस्तऐवजांची नोंद केली पाहिजे )

यापूर्वी नमुद केलेल्या दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज ११.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**सह दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर,**
**चांदूर बाजार**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज क्र.१५५०/२०२६**
**सुमन + ३-वि-निरंक**
**पुढील ता.०१.०९.२०२६**

**अर्जदार :**
1. **Smt. Suman Ramkant Giri** Age 55 years. Occu.: Household R/o. SRPF Camp Old Qtr No.30/2, Amravati
2. **Smt. Nilima Ashish Giri** Age 35 years. Occu.: Household
3. **Aradhya Ashish Giri** Age 10 years. Occu.: Education
4. **Hardik Ashish Giri** Age 3 years. Occu.: Education Applicant No.2 to 3 R/o. Old Quarter No. 30/2, SRPF Camp, Amravati

**विरुध्द**

**NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Ashish Ramakant Giri** हे दिनांक ०६.०६.२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Smt. Suman Ramkant Giri +3** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Smt. Suman Ramkant Giri + 3** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज क्र.१६९८/२०२६
**श्रीकृष्ण व इतर विरुध्द निरंक**
पुढील ता.२८.०९.२०२६

**अर्जदार :** **Shrikrushna Babulal Kuntare** Age 58 Yrs. Occu.: Labour R/o. Malkapur Post. Kawatha Bahale, Tq. & Dist. Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत बाबुलाल जयलाल कुंटारे व पंचफुला बाबुलाल कुंटारे** हे अनुक्रमे दिनांक ०६.१०.१९९७ व दि.१२.०९.२०१९रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **श्रीकृष्ण विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा श्रीकृष्ण विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील १० वे सह दिवाणी न्यायाधीश (वरीष्ठ स्तर)**
**श्री आर.व्ही.कदम न्यायालयातील**

**नियमित दिवाणी दावा क्र.५३१/२०२४** **ने.ता.०७/०९/२०२६**

**प्रशांत अनिलराव वाघमारे वादी**
**--- विरुध्द ---**
**राज्य सरकार तर्फे जिल्हाधिकारी प्रतिवादी**

**वादी :-** **प्रशांत अनिलराव वाघमारे,** वय ३५ वर्षे, कामधंदा - व्यापार, रा.कॉर्पोरेशन हॉस्पिटल जवळ, यशोदा नगर, अमरावती

**प्रतिवादी :-** **महाराष्ट्र शासन तर्फे, जिल्हाधिकारी, कॅम्प, अमरावती, ता.जि.अमरावती**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, वरील वादी **प्रशांत अनिलराव वाघमारे** यांनी वरील न्यायालयामध्ये **अनिलराव देवरावजी वाघमारे** हे दि.३१.०३.२०२४ पासुन बेपत्ता असल्याबाबत **दिवाणी मृत्यू झाल्याची घोषणा होणे बाबत** दावा दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा वरील बाबत कोणास हरकत घ्यावयाची असल्यास त्यांचे दाव्याचे सुनावणी करिता दिनांक **०७/०९/२०२६** रोजी सकाळी **११.००** वा.वरील न्यायालयामध्ये स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू दाव्याची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दि.**१९.०६.२०२६** रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय (व.स्तर), अमरावती**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१७११/२०२६
**उषा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२९.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Usha Pandurang Kale, Age 64 Yrs. Occu.: Household
2. Nikhil Pandurang Kale, Age 40 Yrs. Occu.: Service Both R/o Surabhi Vihar Pundlikbaba Nagar, Near Bhagyashri Vidyalaya, Amravati
3. Dipali Chandrashekhar Wadale (After Marriage Name) Dipali Pandurang Kale (Before Marriage Name) Age 42 Yrs. Occu.: Household R/o Near Bhagyashri Vidyalaya, Surabhi Vihar, Near Pundlikbaba Nagar, V.M.V.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत पांडुरंग जगन्नाथ काळे** यांचे दिनांक **०८.०६.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार उषा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **उषा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१९.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१५३९/२०२६
**नईम खान इस्माईल खान -वि- निरंक**
पुढील ता.०४.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. नईम खान इस्माईल खान, वय ५६ वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा.मुसा वायरमन के घर के पास, ताज नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत फय्याज बी इस्माईल खॉं** यांचे दिनांक **३१.०३.२०१३** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार नईम खान इस्माईल खान** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **नईम खान इस्माईल खान** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१२.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.३०६/२०२६ ने.ता.२८.०७.२०२६

**अर्जदार :**
१. प्रकाश वामनराव मोहोड, वय ६९ धंदा - शेती, रा.कोंडवर्धा ता.चांदूर बाजार जि.अमरावती
२. ललीता रामभाऊ वानखडे, वय ६३ धंदा - घरकाम, रा.तळेगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. अलकाबाई प्रेमदास वानखडे, वय ६० धंदा - घरकाम, रा.ए-४०५, सी/एच ६३, कठपुतली कॉलनी, पांडव नगर, न्यू पटेल नगर, सेंट्रल दिल्ली, ता.जि.दिल्ली

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत बानुबाई वामनराव मोहोड** यांचा मृत्यू दिनांक **१२.०२.२००८** रोजी कोंडवर्धा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. त्या कोंडवर्धा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होत्या. **त्यामुळे** मयत बानुबाई वामनराव मोहोड यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३०६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२४.०६.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३४४**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### आकाशवाणीवर अविनाश दुधे यांच्या पत्रकारितेचा प्रवास

**अमरावती-**ज्येष्ठ पत्रकार अविनाश दुधे यांची पत्रकारिता : सद्यस्थिती आणि बदलतं स्वरूप' या विषयावरची मुलाखत



२४ ते २५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता आकाशवाणीच्या अमरावती केंद्रावरून प्रसारित केली जाणार आहे. लोकप्रिय निवेदक नितीन भट यांनी त्यांच्याशी संवाद साधला आहे.'नमस्कार अमरावती' या कार्यक्रमात ही मुलाखत प्रसारित केली जाईल.पूर्वीच्या काळातील आणि वर्तमानातील पत्रकारिता यातला फरक, बातमीची विश्वासार्हता आणि वेग यांचा समतोल, पत्रकारितेसमोरची आव्हाने,'ब्रेकिंग न्यूज' संस्कृतीचा बातमीच्या गुणवत्तेवर होणारा परिणाम, सिटीझन जर्नालिझमचे परिणाम, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डिजिटल टूल्समुळे बदललेले डेटा जर्नलिझम, पत्रकारितेत ए.आय.चा वापर आदी विषयांवर अविनाश दुधे मुलाखतीतून भाष्य करतील. कार्यक्रमाची निर्मिती आकाशवाणी अमरावती केंद्राची असून सादरकर्ते भैय्यालाल टेकाम आहेत. हा कार्यक्रम आकाशवाणी अमरावती केंद्राबरोबरच 'न्यूज ऑन एअर' या मोबाईल ॲपवर देखील ऐकता येईल. मुलाखतीचा आस्वाद घेण्याचे आवाहन अमरावती आकाशवाणीचे कार्यक्रम प्रमुख भय्यालाल टेकाम आणि कार्यक्रम अधिकारी आशिष गावंडे यांनी केले आहे.

### संकल्पसखी परीवारातर्फे द रॉयल ब्राईड मेकअप आर्टिस्ट स्पर्धा आयोजित

**अमरावती-**संकल्पवेध बहूउद्देशीय संस्था अमरावती अंतर्गत महीलांसाठी कार्यरत प्रमुख शाखा संकल्पसखी परीवारातर्फे २३ ऑगस्ट रोजी रंगोली लॉन्स कठोरा नाका अमरावती येथे मेकअप आर्टिस्ट सखींसाठी भव्य' द रॉयल ब्राईड मेकअप आर्टिस्ट स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. संकल्पसखी परीवार कायम महीलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवित असते या अंतर्गत महीलांसाठी नि:शूल्क पार्लर कोर्स आणि सेमिनार संकल्पसखी परीवारातर्फे संस्थेच्या संचालिका पूनम अमोल पाटील गोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येतात ज्यासाठी प्रशिक्षक म्हणून वल्लरी मेकओव्हर च्या संचालिका वृशाली पांडे आणि रसिका ब्यूटी पार्लर च्या संचालिका सारीका बल्लाळ या मार्गदर्शन करतात.याअंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या सखींना त्यांच्या कौशल्याचं प्रदर्शन करता यावं म्हणून यावेळी संकल्पसखी परीवारातर्फे या मेकअप आर्टिस्ट साठी ही स्पर्धा २३ ऑगस्ट ला आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचा उद्देश सौंदर्यशास्त्राचं व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेल्या सखींना व्यासपिठ मिळवून देणे आणि त्यांच्या कौशल्याचं मूल्यांकन करणे असं आहे.या स्पर्धेमध्ये सहभागी सर्व सहभागी मेकअप आर्टिस्ट स्पर्धकांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येईल तसेच विजेत्यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे तरी जास्तीत जास्त मेकअप आर्टिस्ट सखींनी या स्पर्धेमध्ये सहभागी व्हावे असं आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या सह आयोजक म्हणून वल्लरी मेकओव्हरच्या वृशाली पांडे, रसिका ब्यूटी पार्लरच्या सारीका बल्लाळ, मोहीनी ब्यूटी पार्लरच्या संचालिका स्वाती गेडे, अद्विका मेकओव्हरच्या संचालिका निकीता साहू या असणार आहेत.

### रविवारी मोफत नेत्र तपासणी शिबीर

**अमरावती-**तालुक्यातील सावंगा आसरा येथे राम उमेकर (रुग्णसेवक) यांच्या वाढदिवसानिमित्त श्री हनुमान नवयुवक मंडळ व भिमशक्ती युवा क्रीडा मंडळ, सावंगा (आसरा) यांच्या माध्यमातून, समता फाउंडेशन, मुंबई व महात्मे हॉस्पिटल, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने २३ ऑगस्ट रोजी मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ परिसरातील नागरिकांना घेता येणार आहे. शिबिरामध्ये नेत्र तपासणी पूर्णपणे मोफत करण्यात येणार असून, तपासणीदरम्यान मोतीबिंदू आढळलेल्या रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शिबिरासाठी येताना आधार कार्ड अनिवार्य असून, रेशन कार्ड असल्यास तेही सोबत आणावे.या उपक्रमाच्या माध्यमातून गरजू नागरिकांना मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येत असून, परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### जिल्हा ग्रंथालय अधिकारीपदी अतुल वानखडे

**टाकरखेडा शंभू -** अमरावती जिल्हा ग्रंथालय अधिकारी



मडावी यांच्या बदलीनंतर रिक्त झालेल्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी पदाचा प्रभारी कार्यभार अतुल वानखडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. वानखडे यांनी जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्याचा प्रभारी कार्यभार स्वीकारला.यावेळी संत राजेश्वर महाराज सार्वजनिक वाचनालयाचे कार्याध्यक्ष प्रदीप शेंडे यांनी अतुल वानखडे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाइन कामांना आळा

## प्रत्येक केंद्रशाळेला डेटा ऑपरेटर व शिपाई देण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**

प्राथमिक शिक्षकांवरील वाढत्या ऑनलाइन कामांचा अतिरिक्त ताण कमी करून त्यांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळावा, तसेच प्रत्येक केंद्रशाळेला एक डेटा ऑपरेटर आणि एक शिपाई देण्यात यावा,अशी मागणी शिक्षक संघटना यांनी केली आहे. याबाबत प्राथमिक शिक्षण संचालकांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रधान सचिवांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.शिक्षक संघटनाच्या मागणी कडे दुर्लक्ष झाले आहे.

प्राथमिक शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी अध्यापनाव्यतिरिक्त विविध ऑनलाइन कामे करावी लागतात. सातत्याने लिंक टाकणे, माहिती भरणे, विविध ॲप्सवर माहिती अद्ययावत करणे तसेच सुट्टीच्या दिवशीही ऑनलाइन कामे करण्याच्या सूचनांमुळे शिक्षकांचा मोठा वेळ प्रशासकीय कामात जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या दैनंदिन अध्ययन-अध्यापनाकडे पुरेसे लक्ष देता येत नाही.

शिक्षकांना दररोज अनेक ॲप्सवर माहिती भरावी लागत असून त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध नसल्याने शिक्षकांवरील कामाचा ताण वाढत आहे. या अतिरिक्त कामामुळे शिक्षकांच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.



भविष्यात मराठी शाळांची पटसंख्या कमी होण्याची परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी शिक्षकांना पूर्वीप्रमाणे अध्यापनाचे काम करण्यास वेळ मिळणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

तसेच मराठी शाळांमध्ये लहान विद्यार्थी मोठ्या संख्येने शिकत असतात. मात्र डेटा ऑपरेटर आणि शिपाई अशी पदे उपलब्ध नसल्यामुळे ही अनेक कामे शिक्षकांनाच करावी लागतात. त्यामुळे प्रत्येक केंद्रशाळेला एक डेटा ऑपरेटर आणि एक शिपाई देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे शिक्षकांवरील प्रशासकीय कामाचा ताण कमी होऊन त्यांना विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण शिक्षण देता येईल. प्राथमिक शिक्षकांची सर्व प्रकारची ऑनलाइन कामे बंद करून त्यांना केवळ अध्यापनाच्या कामासाठी पुरेसा वेळ द्यावा आणि प्रत्येक मराठी केंद्रशाळेला डेटा ऑपरेटर व शिपाई उपलब्ध करून द्यावा, या दोन्ही मागण्या मान्य करण्याची विनंती शिक्षण विभागाकडे करण्यात आली आहे. या मागण्यांबाबत पुढील कार्यवाहीसाठी निवेदन सादर करण्यात आले आहे.

# नैसर्गिक शेतीला मिळणार चालना, उत्पादन खर्चात होणार बचत



**आसेगाव पूर्णा/**

रासायनिक खते व कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे जमिनीची खालावत चाललेली सुपीकता सुधारण्यासह शेतकऱ्यांना शाश्वत सेंद्रिय व नैसर्गिक शेतीकडे वळविण्याच्या उद्देशाने कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), अमरावतीच्या वतीने आयोजित तीन दिवसीय आंतरराज्य प्रशिक्षण व अभ्यास दौरा यशस्वीरीत्या पार पडला.हैदराबाद येथील राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था (NIPHM) येथे जिल्ह्यातील ५० निवडक शेतकऱ्यांनी प्रशिक्षण घेतले.

या प्रशिक्षणात 'जैविक निविष्ठा निर्मिती' या विषयावर शेतकऱ्यांना तज्ज्ञ शास्त्रज्ञांकडून सखोल मार्गदर्शन करण्यात आले. जैविक खते कमी खर्चात तयार करणे,मित्रकीटकांचे संवर्धन व त्यांचा पिकांच्या संरक्षणासाठी वापर,स्थानिक उपलब्ध घटकांपासून वनस्पतीजन्य कीटकनाशके तयार करणे तसेच जमिनीचे आरोग्य व सुपीकता टिकविण्यासाठी सूक्ष्मजीवांचे महत्त्व याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणासाठी सेंद्रिय व नैसर्गिक शेतीच्या क्षेत्रात कार्यरत शेतकरी उत्पादक कंपन्यांमधील (FPO) प्रतिनिधींना प्राधान्य देण्यात आले. विशेषतः 'डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन' अंतर्गत ज्या एफपीओमध्ये जैविक निविष्ठा निर्मिती केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत, अशा शेतकऱ्यांची निवड करण्यात आली. प्रशिक्षण घेतलेले शेतकरी आपल्या परिसरात जैविक निविष्ठांची निर्मिती करून इतर शेतकऱ्यांपर्यंत त्याचा प्रसार करण्यास सक्षम होणार आहेत.

या प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांना स्वतःच्या शेतावर जैविक खते व कीटकनाशके तयार करण्याचे कौशल्य मिळाले असून, त्यामुळे रासायनिक निविष्ठांवरील खर्च कमी होण्यासोबतच जमिनीची सुपीकता टिकवून शाश्वत शेतीला चालना मिळणार आहे. 'डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन'च्या माध्यमातूनही या उपक्रमाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या आंतरराज्य प्रशिक्षणाचे आयोजन आत्मा अमरावतीच्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. दौऱ्याचे नियोजन व समन्वय तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सचिन हरले आणि सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक निशांत इंगळे यांनी केले. प्रशिक्षण पूर्ण करून परतलेल्या ५० शेतकऱ्यांनी कृषी विभाग व आत्मा अमरावतीचे आभार व्यक्त केले.

# श्री समर्थ लहानुजी महाराजांचा ५५ वा पुण्यतिथी महोत्सव

**तिवसा**-दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा रक्षाबंधन(नारळी पौर्णिमा)चे औचित्य साधून श्री समर्थ लहानुजी महाराजांचा पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन श्रावण शुद्ध पौर्णिमेला करण्यात आले आहे.या महोत्सवाची सुरुवात २० ऑगस्ट रोजी श्री क्षेत्र टाकरखेडा येथे मंदिराच्या सभागृहात होणार असून २७ ऑगस्ट रोजी महोत्सवाचा समारोप होईल.

२० ते २७ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या सप्ताहामध्ये दैनंदिन कार्यक्रमात दररोज सकाळी ५ ते ६ वाजता मौन साधना, सामुदायिक ध्यान, प्रार्थना,रामधून व ग्रामफेरी होईल. त्यामध्ये ग्रामगीताचार्य भानुदासजी नागपुरे, शामरावजी चांदणे, पंढरीनाथ बाणे (मानवविकास ज्ञानसाधना आश्रम तळेगाव श्यामजीपंत) यांचे प्रवचन होईल.सकाळी ६ ते ६.३० वाजता दररोज ध्वजारोहण होईल. त्यामध्ये संचालक डॉ. सतीश ठाकरे,सोपानराव भालतडक, शरदराव पेठे, योगेश यादव ,अमोल जवळेकर हे उपस्थित राहतील. सकाळी ६.३० ते आठ वाजता श्री समर्थांचे समाधीला तथा मूर्तीला महाभिषेक व महापूजा होईल. ही महापूजा कल्पना व अविनाशजी देशमुख (मोहपेकर) नागपूर यांच्या हस्ते होईल. सकाळी आठ ते नऊ वाजता श्री समर्थांची लिलामृत ग्रंथाचे पारायण होईल. त्यामध्ये श्रीमती रजनीताई कडू तथा ग्रामस्थ महिला मंडळ टाकरखेडा हे नियोजन करतील. सकाळी ११ ते ११:३० वाजता श्री समर्थांना महाप्रसाद व भोग आरती होईल. दुपारी बारा ते दुपारी तीन वाजेपर्यंत महाप्रसाद वितरण होईल. दुपारी दोन ते पाच वाजता ह भ प भागवताचार्य विजय महाराज ठाकूर (वारोळीकर काटोल) यांच्या संगीतमय भागवत होईल. दुपारी ११ ते ५ वाजेपर्यंत विविध सामाजिक कार्यक्रम ,भजन होईल. सायंकाळी सहा ते साडेसहा वाजता धूप आरती, सायंकाळी ६.३० ते ७.३० वाजता सामुदायिक प्रार्थना व चिंतन, सायंकाळी ७:३० ते ८:३० वाजता पंचपदी हरिपाठ होईल. यामध्ये हभप गिरी महाराज,देवराव डोळस, बबलू देशमुख, विनोद डोळस, विजय अतकरने, स्वप्निल जामखुटे व समस्त वारकरी सेवा मंडळ ठाकरखेडा हे सहभागी राहतील.

# पोटे कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर येथे शैक्षणिक भेट

**अमरावती/का.प्र.**

ग्रामीण जागरूकता कार्यानुभव (रावे) कार्यक्रमांतर्गत पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील विद्यार्थ्यांनी कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर,(बडनेरा), जि. अमरावती येथे शैक्षणिक भेट दिली. विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, विविध कृषीविषयक उपक्रम तसेच शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध तंत्रज्ञान व मार्गदर्शन यांची प्रत्यक्ष माहिती मिळावी, या उद्देशाने या भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कृषी विज्ञान केंद्रातील उद्यानविद्या विषयाचे तज्ज्ञ प्रफुल्ल महल्ले यांनी विद्यार्थ्यांना कृषी विज्ञान केंद्राची उद्दिष्टे, कार्यपद्धती आणि शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. तसेच त्यांनी जैवखतांचे महत्त्व, विविध प्रकारची जैवखते व त्यांची निर्मिती प्रक्रिया, मृदा परीक्षणाचे महत्त्व व प्रक्रीया तसेच मृदा सुपीकता व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रास भेट देऊन विविध पिकांची प्रात्यक्षिके, सुधारित लागवड पद्धती,



आधुनिक कृषी अवजारे तसेच विविध कृषी तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच कृषी विज्ञान केंद्रातील विविध प्रात्यक्षिक केंद्रांना भेट देऊन त्यांच्या कार्यपद्धतीची माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली.

कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना पीक उत्पादन, पीक व्यवस्थापन, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, मृदा व्यवस्थापन तसेच शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध कृषी तंत्रज्ञानाची माहिती दिली. तसेच शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम, प्रात्यक्षिके, कृषी मेळावे, मार्गदर्शन कार्यक्रम आणि कृषी विस्तार कार्य याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

रावे कार्यक्रमादरम्यान ग्रामीण भागात काम करताना शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती प्रभावीपणे कशी देता येईल, याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले.

विद्यार्थ्यांनी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लक्षपूर्वक ऐकून घेतले तसेच विविध कृषीविषयक विषयांवर प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. यावेळी पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका तथा रावे कार्यक्रम समन्वयक प्रा.श्वेता देशमुख उपस्थित होत्या. कृषी विज्ञान केंद्रातील प्रफुल्ल महल्ले यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त व ज्ञानवर्धक ठरले. कृषी विज्ञान केंद्र,दुर्गापूर येथील या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना विविध प्रात्यक्षिक केंद्रांचे प्रत्यक्ष ज्ञान, आधुनिक कृषी तंत्रज्ञान, जैवखत निर्मिती, मृदा परीक्षण, गांडूळखत निर्मिती, पशुपालन व दुग्धव्यवसाय तसेच कृषी विस्तार कार्याची माहिती मिळाली. त्यामुळे ही शैक्षणिक भेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, मार्गदर्शक व अत्यंत उपयुक्त ठरली.

# जलसंधारण दिनानिमित्त भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयात जनजागृती

**परतवाडा/वार्ताहर**

भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार 'जलसंधारण दिना'निमित्त विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सन्माननीय डॉ. अनिल खांडेकर होते. प्रमुख वक्ते म्हणून माननीय डॉ. रवींद्र खंडेराव, मराठी विभाग प्रमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी पाण्याचे वाढते महत्त्व, पाण्याचा काटकसरीने वापर, पावसाच्या पाण्याचे संधारण, जलस्रोतांचे संरक्षण आणि भविष्यातील पिढ्यांसाठी पाणी जतन करण्याची गरज याविषयी सविस्तर मार्गदर्शन



केले.यावेळी विद्यार्थ्यांनी 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' या संदेशाचा अंगीकार करून जलसंधारणाची शपथ घेतली. पाण्याचा अपव्यय टाळणे, पावसाचे पाणी साठविणे, जलस्रोत स्वच्छ ठेवणे तसेच समाजामध्ये जलसंधारणाबाबत जनजागृती करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांनी जलसंधारण ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. पाण्याचे संवर्धन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबात व समाजात जनजागृती करावी,असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. दयाश्री कोकाटे, प्रा. प्रीती नवरे, प्रा. प्रिया सगणे यांनी परिश्रम घेतले तसेच कार्यक्रमाला डॉ. गारोडे, डॉ. भागवत, प्रा. खांडेकर,डॉ. चिखले,प्रा. वाटाने, प्रा. जयस्वाल,प्रा. धारस्कर, डॉ. हाडोळे,डॉ. वानखडे, डॉ. किल्लेदार,डॉ. पराते,डॉ. पाटील, डॉ. दुबे,प्रा. ठाकरे, प्रा. केदार, प्रा. लोंदे,प्रा. भोयर, प्रा. भिंगार देवतळे,प्रमोद मेटकर तसेच कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन डॉ. दयाश्री कोकाटे तर आभार प्रदर्शन डॉ. स्वाती वानखडे यांनी मानले कार्यक्रमाची सांगता ही मृद व जलसंधारणाची शपथ विधिने करण्यात आली.

# पिसाळलेल्या कुत्र्यांचा धुमाकूळ

**कुऱ्हा -**श्री क्षेत्र जहागीरपूर येथे पिसाळलेल्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर धुमाकूळ घातला असून पाच ते दहा जनावरांसह दोन ते तीन नागरिकांना चावा घेतल्यामुळे जहागीरपूर येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मारडा व जहागीरपूर गट ग्रामपंचायत अंतर्गत जहागीरपूर येथे २१ ऑगस्ट शुक्रवार रोजी सकाळी सहा वाजता एका पिसाळलेल्या कुत्र्याने संपूर्ण गावात धुमाकूळ घालत पाच ते दहा जनावरांना व गावातील इतर कुत्र्यांना चावा घेतला आहे.त्यामुळे इतर कुत्रे सुध्दा पिसाळण्याची शक्य नाकारता येत नाही. तसेच गावातील दोन ते तीन नागरिकांना सुध्दा चावा



घेतला आहे.त्यामुळे मारडा ग्रामपंचायतीला जहागीरपूर येथील नागरिकांनी एका निवेदनाद्वारे पिसाळलेल्या कुत्र्यांचा जातीने लक्ष देवून सर्व कुत्र्याचा बंदोबस्त करण्यात यावा.अशी मागणी शरद बुटले, अतुल ठाकरे, अमोल सोनोने,बंडू साठवणे, आशिष ढोणे, अशोक काळमोरे, श्रीकृष्ण बोरकर, अंकुश जाधव, गुणवंत ढोणे, गजानन साठवणे, सुरेश इंगोले, गौरव वैद्य यांनी केले आहे.

# महा वॉकेथॉन'मध्ये युवकांचा उत्साहात सहभाग

## ७१ हजार रूपयांच्या बक्षीसाचे लकी ड्रॉद्वारे वितरण

**अमरावती/का.प्र.**

नागरिकांमध्ये जलसंधारणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आज शहरात 'महा वॉकेथॉन : 'वॉक फॉर वॉटर' उपक्रम पार पडला. सकाळी शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर एकत्र येत युवकांनी वॉकेथॉनमध्ये उत्साहात सहभाग घेतला. यावेळी लकी ड्रॉद्वारे दहा सहभागींना पारितोषिके देण्यात आली. या वॉकेथॉनला श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयापासून सुरुवात झाली. विभागीय आयुक्त नयना गुंडे, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हषवर्धन देशमुख यांनी वॉकेथॉनला हिरवी झेंडी दाखवून सुरवात केली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष




काकडे, अधिक्षक अभियंता दिलीप निपाने,उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, पाटील, जलसंधारणाचे कार्यकारी अभियंता सुनील जाधव, श्रीकांत उमप, सोनाली काकडे, मुख्याधिकारी विकास खंडारे, शिवाजी शारिरीक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य गावंडे आदी उपस्थित होते. विभागीय यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आली. तसेच उपस्थितांना जलसंधारणाची शपथ देण्यात आली. यात प्रथम तनुजा मेश्राम, द्वितीय कस्तुरी बहुरूपी, तृतीय आयुष मुंढे, तर राजू मुंढे, अंजू कासदेकर, आचल वानखडे, विंजोथ केनॉय, खुशी नवखार, प्राचिती पाटील, अविनाश साऊरकर यांना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. या उपक्रमात प्रा.राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय,हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, यावेळी सहभागींसाठी महावॉकेथॉन झुंबाचे आयोजन करण्यात आले.

# जागतिक अवयवदान पंधरवाडा उत्साहात साजरा

**दर्यापूर/वार्ताहर**

उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ.डाबेराव यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक अवयवदान जनजागृती पंधरवाडा विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

पंधरवाड्याचे उद्घाटन वैद्यकीय अधीक्षक डॉ. डाबेराव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी रुग्णालयातील अधिकारी-कर्मचारी, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची उपस्थिती होती. विविध शासकीय कार्यालये, शाळा, बालविकास, महसूल, पोलीस,कृषी, आरोग्य, UPHC तसेच बांधकाम विभागामध्ये अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली.



तसेच हिरवा पोशाख परिधान करण्याचे आवाहन करण्यात आले. गुरुकुल नर्सिंग कॉलेज, दर्यापूर येथे निबंध व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यासोबतच स्लोगन, माहितीपत्रके व बॅनरच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. शासकीय कार्यालये, बसस्थानक, नगरपरिषद, तहसील कार्यालय व बाजारपेठ परिसरात QR कोड लावण्यात आले. यामध्ये गुरुकुल नर्सिंग कॉलेजचे शिक्षक व विद्यार्थी तसेच आरोग्य विभागातील अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले. हाताला हिरव्या रिबिनी बांधून 'अवयवदान, श्रेष्ठदान' अशा घोषणा देत प्रभातफेरी काढण्यात आली. प्रभातफेरी उपजिल्हा रुग्णालयात पोहोचल्यानंतर उपस्थितांना अवयवदानाची शपथ देण्यात आली.स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था व लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.गुरुकुल नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निबंध व रांगोळी स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक डॉ. डाबेराव, वैद्यकीय अधिकारी डॉ. मेश्राम,संगीता गवळी यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संगीता गवळी, कोलटक्के, मनीषा लाहे, सी. ए. पवार,पी. एस. कुकलकर, आरोग्य सेवक गायकवाड, गुरुकुल नर्सिंग कॉलेजचे शिक्षक अभिषेक,पवन बचाटे,गिते तसेच सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रमाचे छायाचित्रण चेतनदादा कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल वैद्यकीय अधीक्षक डॉ. डाबेराव यांनी सर्व अधिकारी,कर्मचारी,विद्यार्थी व सहभागींचे कौतुक करून आभार मानले तसेच सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. 'अवयवदान हे श्रेष्ठदान' हा संदेश देत पंधरवाड्याची सांगता करण्यात आली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# 'रामा-रामा'चा जप अन् रद्द लेआऊटचे सातबारे जिवंत

## 'त्या' भ्रष्ट बाबूचे काळे कारनामे चव्हाट्यावर!




**विशेष प्रतिनिधी :-**

**अमरावती:** अमरावती तहसील कार्यालयातील प्रशासकीय शिस्त आणि कायद्याचा बोजवारा उडवणारा आणखीन एक अत्यंत खळबळजनक जमीन घोटाळा समोर आला आहे. कार्यक्षेत्राबाहेर जाऊन रेती माफियांकडून 'रामा-रामा' कोडवर्डवर जप्त वाहने सोडवण्यात बेकायदेशीर लुडबुड करणाऱ्या जमीन नोंदणी विभागातील 'त्या' वादग्रस्त बाबूचा मुख्य काळा कारनामा आता स्वतःच्याच मूळ विभागात उघडकीस आला आहे. मौजे वडगाव माहोरे येथील शासनाने अधिकृतपणे त्रुटी काढून रद्द केलेले लेआऊट या बाबूने मोठी आर्थिक रक्कम स्वीकारून बेकायदेशीररित्या सातबाऱ्यावर जिवंत केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हा फसवणुकीचा डाव आता थेट न्यायालयाच्या चौकटीत पोहोचला असून, संबंधित कर्मचाऱ्याला न्यायालयाने थेट 'गैर अर्जदार' म्हणून नोटीस बजावून कोर्टाच्या कचाट्यात खेचले आहे.

मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार, मौजे वडगाव माहोरे येथील एका लेआऊटमध्ये गंभीर तांत्रिक आणि कायदेशीर त्रुटी आढळून आल्यामुळे शासनाने रीतसर प्रक्रिया पूर्ण करून ते लेआऊट रद्द केले होते. नियमानुसार, रद्द झालेल्या लेआऊटच्या जमिनीवर कोणतीही नवीन फेरफार नोंद किंवा खरेदी-विक्रीचे व्यवहार सातबाऱ्यावर चढवणे हा गंभीर फौजदारी गुन्हा ठरतो.

परंतु, जमीन नोंदीचा कारभार पाहणाऱ्या या महाभागाने कायद्याला आणि वरिष्ठ कार्यालयांच्या आदेशाला पूर्णपणे धाब्यावर बसवले. बिल्डर आणि भूमाफिया सिंडीकेटशी अर्थपूर्ण समझोता करून, रद्द झालेल्या लेआऊटमधील सातबाऱ्यांच्या नोंदींमध्ये फेरफार करण्याचा आणि बेकायदेशीर नोंदी मंजूर करण्याचा पराक्रम या कर्मचाऱ्याने केला. शासकीय यंत्रणेचा आणि पदाचा गैरवापर करून खाजगी फायद्यासाठी शासनाचीच फसवणूक करण्याचा हा थेट प्रकार आहे.

### वाळू माफिया ते जमीन घोटाळा 'रामा-रामा' चा खेळ

हा वादग्रस्त कर्मचारी अमरावती तहसीलच्या हद्दीत विना रॉयल्टी रेती वाहतूक करणाऱ्या माफिया लॉबीसाठी 'सरस्वती माता प्रसन्न असलेला भगवान राम' बनला असल्याची चर्चा महसूल वर्तुळात रंगली आहे. अवैध वाहने पकडल्यानंतर शासकीय तिजोरीत दंड भरण्याऐवजी केवळ 'रामा-रामा' हा कोडवर्ड वापरून गाड्या सोडवण्याच्या प्रकरणातही या कर्मचाऱ्याचे नाव आघाडीवर आहे. एकीकडे रेती माफियांचे सिंडिकेट चालवणे आणि दुसरीकडे आपल्या मूळ कार्यक्षेत्रात थेट शासकीय आदेशाचा अवमान करून मौजे वडगाव माहोरे येथील रद्द लेआऊट मॅनेज करणे, यावरून या कर्मचाऱ्याने भ्रष्टाचाराचा कळस गाठल्याचे स्पष्ट होत आहे.

### पाप उघडकीस; थेट न्यायालयात 'गैर अर्जदार'

हा बेकायदेशीर फेरफार आणि आर्थिक देवाणघेवाणीचा प्रकार जास्त दिवस लपून राहू शकला नाही. त्रुटी असलेले आणि रद्द झालेले लेआऊट पुन्हा सातबाऱ्यावर कसे जिवंत झाले, हे उघड होताच या जमीन घोटाळ्याची गंभीर दखल घेत पीडित आणि जागरूक पक्षकारांनी थेट न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकरणात अमरावती तहसीलच्या 'त्या' विशिष्ट कर्मचाऱ्याला त्याच्या सहभागाबद्दल न्यायालयात 'गैर अर्जदार' केले आहे.

### पाठीशी घालणारे 'वरिष्ठ' कोण?

न्यायालयीन प्रकरणांमध्ये थेट 'गैर अर्जदार' म्हणून नाव आल्यानंतरही हा कर्मचारी अजूनही संवेदनशील पदावर आणि टेबलवर कसा ठाण मांडून बसला आहे? हा अमरावती महसूल प्रशासनासाठी मोठा प्रश्न आहे. शासनाच्या महसुलाला करोडो रुपयांचा चुना लावणारा आणि रद्द लेआऊटचे सातबारे बदलून सर्वसामान्यांची फसवणूक करणाऱ्या या कर्मचाऱ्याला पाठीशी घालणारे तहसील कार्यालयातील ते बडे 'वरिष्ठ' कोण? आता अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून या भ्रष्ट कर्मचाऱ्याला निलंबित करावे आणि मौजे वडगाव माहोरे लेआऊट घोटाळ्याची उच्चस्तरीय विभागीय चौकशी करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या घरी चोरी करणारी टोळी गजाआड

## -ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई -११.२२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक गुन्हे शाखा आणि परतवाडा पोलिसांनी संयुक्त कारवाई करत बंद घरांची रेकी करून कुलूप तोडून चोरी करणाऱ्या सराईत आंतर-जिल्हा टोळीचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी ६ आरोपींना अटक केली असून त्यांच्या कडून लाखो रुपयांचे सोने-चांदीचे दागिने, रोख रक्कम, वाहने आणि मोबाईल असा एकूण ११ लाख २२ हजार ६८६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



परतवाडा येथील सिव्हिल लाईन परिसरातील रहिवासी व सेवानिवृत्त न्यायाधीश मोहम्मद सादीक मोहम्मद उमर (वय ६५ वर्षे ) यांनी १८ ऑगस्ट रोजी परतवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. तक्रारी नुसार अज्ञात चोरट्यांनी त्यांचे घर बंद असताना कुलूप तोडून बेडरूम मधील कपाटातून ५ तोळ्यांचे सोन्याचे नेकलेस, २ तोळ्यांच्या बांगड्या, २० तोळ्यांच्या चांदीच्या पैंजण आणि १ लाख ७० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ११ लाख ९० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. या प्रकरणात पोलिसांनी तपास करून आरोपी श्रीरंग चंद्रचूड रत्नपारखी (वय ३०, रा. छांगानी नगर),प्रतीक संतोष वारसे(वय ३१, रा. पंचशील नगर),आकाश उर्फ कोबरा विनोद कंगाले (वय २८, रा. आदिवासी नगर),साहिल ☞(पान २ वर)

# बालिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला २० वर्षाची शिक्षा

## अचलपूर न्यायालयाचा निर्णय

**अचलपूर/प्रतिनिधीः-** सहा वर्षीय चिमुकलीवर अत्याचार आणि जीवघेणा हल्ला केल्याच्या प्रकरणात अचलपूर जिल्हा व सत्र न्यायालयाने महत्वाचा निकाल दिला आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश-१ एस. टी. डोके यांनी आरोपीला दोषी ठरवत २० वर्षांच्या सक्त कारावासाची आणि १८ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली

प्रदीप लक्ष्मणराव जामनिक (वय ३६ रा. गायवाडी, ता. दर्यापूर) असे शिक्षा प्राप्त आरोपीचे नाव आहे. दोषारोप पत्रानुसार २ जानेवारी २०२० रोजी सकाळी पीडित बालिकेचे आई-वडील कापड व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर गेले होते. त्यावेळी अल्पवयीन बालिका



घरात एकटीच होती. याचाच फायदा घेऊन आरोपी घरात घुसला आणि त्याने बालिकेवर जबरदस्तीने अत्याचार केला.

घटनेची तक्रार पीडितेचे आजोबा यांनी दर्यापूर पोलीस ठाण्यात दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी विरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६(२), ३०७, ४५२ तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ४ आणि ६ अंतर्गत गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक प्रिया उमाळे यांनी केला. तपास पूर्ण झाल्यानंतर अचलपूर जिल्हा व सत्र न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले. खटल्याच्या सुनावणी दरम्यान सहाय्यक सरकारी वकील एड. जी. ए. विचोरे आणि एड. दिलीप तिवारी यांनी अभियोजन पक्षाची प्रभावी बाजू मांडली.☞(पान २ वर)

# रामेश्वर चव्हाण यांची पुन्हा शिवसेना गटनेतेपदी निवड!

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर नगरपरिषदेतील नगरसेवकांचा गट नुकताच शिवसेना शिंदे गटात सहभागी झाला असून, त्यानंतर झालेल्या बैठकीत रामेश्वर चव्हाण यांची पुन्हा एकदा शिवसेना गटनेतेपदी निवड करण्यात आली.



दर्यापूर येथिल अनंत संगम मंगल कार्यालयात ही निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी शिवसेनेच्या सर्व नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी रामेश्वर चव्हाण यांचे स्वागत केले. रामेश्वर चव्हाण यांच्यावर पुन्हा गटनेतेपदाची जबाबदारी सोपविल्याने नगरपरिषदेमध्ये शिवसेना ☞(पान २ वर)

# मेळघाटात 'साद' आणि 'संजीवनी' संस्थेतर्फे २०० गरजू विद्यार्थ्यांना 'उबदार स्पर्श'

### अभियानाअंतर्गत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील मेळघाटात कार्यरत असलेल्या 'साद चिखलदरा' (सोशल अवेअरनेस इन आदिवासी डेव्हलपमेंट) आणि 'संजीवनी महिला व बालकल्याण संस्था' यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, १९





ऑगस्ट २०२६ रोजी 'उबदार स्पर्श' अभियानाअंतर्गत विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात नागुढाणा व बबईढाणा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, स्कूल बॅग्स, रेनकोट, शूज आणि सॉक्स यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक संजय लड्ढा होते. प्रमुख अतिथी म्हणून 'जनमाध्यम'चे संपादक प्रदीप देशपांडे, नानाजी चौधरी, अजय सदन, महेश बजाज, 'साद' संस्थेचे अध्यक्ष डॉ. रवींद्र कडू आणि धारणीचे ज्येष्ठ पत्रकार रवी नवलाखे , मणिष कुलकर्णी, आनंद ढगे उपस्थित होते. या सामाजिक उपक्रमासाठी☞(पान २ वर)

# गुरुदेवनगरात युवकाची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

**तिवसा/प्रतिनिधीः-** गुरुदेवनगर येथील मंजुळामाता नगरातील रहिवासी २७ वर्षीय युवकाने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना २० ऑगस्ट रोजी रात्रीच्या सुमारास उघडकीस आली.शुभम अरुण राऊत (वय २७) असे त्या युवकाचे नाव आहे.गुरुदेवनगर येथील दिंडेकर लेआऊट परिसरातील एका पडक्या विहिरीत उडी घेऊन त्याने आत्महत्या केली.



शुभम हा मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होता. कष्टाळू व मनमिळाऊ स्वभावामुळे तो परिसरात परिचित होता. घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलीस व जिल्हा शोध व नियंत्रण पथक घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम राबविण्यात आली. त्यानंतर शुक्रवार २१ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे ९ वाजता शुभमचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला. ☞(पान २ वर)

# जुगार खेळणाऱ्या ९ आरोपींना अटक

## -पाच लाख ९० हजाराचा मुद्देमाल जप्त!

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी पोलिसांनी डोंगर यावली शेत शिवारात जुगार अड्ड्यावर धाड टाकून जुगार खेळणाऱ्या नऊ आरोपींना रंगेहात अटक करून जवळपास पाच लाख ९० हजाराचा मुद्देमाल (दि.२१) जप्त केला.

मोर्शी लगतच असलेल्या पाळा,सालबर्डी, डोंगरयावली परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, डोंगरयावली शेत शिवारातील निलेश बोपची यांच्या शेतात काही इसम ताशाच्या पत्त्यांवर पैशांची बाजी लावून जुगार खेळत आहेत.ही माहिती वरिष्ठांना देऊन त्यांच्या आदेशाने पंचांना सोबत घेऊन पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला.



यावेळी काही इसम घोळका करून ५२ ताशांच्या पत्त्यांवर पैशांची हारजीत करून एक्का बादशाह जुगार खेळतांना एकूण नऊ आरोपींना तात्काळ कार्यवाही करून ताब्यात घेतले.या कार्यवाहीत रोख रक्कम, मोबाईल फोन व मोटारसायकली असा एकूण अंदाजे ५,८८,१४०/- किमतीचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.ताब्यात घेण्यात आलेल्या इसमांचे नाव अमित केशवराव निमजे,(वय ४० वर्षे,रा. दापोरी,ता.मोर्शी,जि. ☞(पान २ वर)

# शहरात प्रतिबंधात्मक कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती :** ईद-ए-मिलाद,नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळ अष्टमी, दहीहंडी, कावड यात्रा व इतर विविध धार्मिक कार्यक्रम आयोजनाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम ३७(१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

प्रतिबंधात्मक आदेश पोलीस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून सदर आदेश दि. २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या कालावधीत मेळावे, मिरवणुका आयोजित करण्यामुळे सार्वजनिक सुरक्षिततेसाठी धोका निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन लेखी परवानगीशिवाय कार्यक्रम आयोजित करण्यास बंदी करण्यात आली आहे.

# शुन्य वीज अपघाताचे ध्येय कायम समोर ठेवा

## दैनंदिन कामकाजात सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्या- संचालक राजेंद्र पवार

**अमरावती/प्रतिनिधीः-** विद्युत अपघातामुळे कमावत्या व्यक्तिचा प्राणांतिक अपघात झाल्यास त्याच्या कुटुंबातील तीन पिढ्यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे महावितरणच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाज करताना सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे आणि कोणत्याही परिस्थितीत विद्युत अपघात होणार नाही याची दक्षता घ्यावी, तसेच शुन्य विद्युत अपघाताचे ध्येय कायम समोर ठेवावे असे आवाहन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी केले आहे.



विद्युत भवन अमरावती येथे आज (दि.२१ ऑगष्ट) जिल्ह्यातील जनमित्रांना प्रातिनिधिक स्वरूपात सुरक्षा साहित्याचे वाटप संचालक पवार यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. सांघिक कार्यालयाने केंद्रीय स्तरावर खरेदी करून सर्व तांत्रिक कर्मचाऱ्यांना दर्जेदार सुरक्षा साहित्य पुरवले आहे. त्याचा उपयोग करून ग्राहकांना ☞(पान २ वर)

# राजेश बेठेकर मृत्यू प्रकरणी महर्षी शाळेच्या संचालकाविरोधात तक्रार

### सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

### गाडगे नगर ठाण्यात धडक

**अमरावती/प्रतिनिधीः-** महर्षी पब्लिक स्कूलमध्ये शिकणारा आदिवासी विद्यार्थी राजेश बेठेकर याच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाने आता गंभीर वळण घेतले आहे. शाळा प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे आपल्या मुलाचा जीव गेल्याचा आरोप करत राजेशच्या कुटुंबीयांनी आज शुक्रवार २१ ऑगस्ट रोजी गाडगे नगर पोलीस ठाण्यात शाळेचे संचालक प्रशांत राठी यांच्या विरोधात लेखी तक्रार दाखल केली आहे.



माहिती नुसार, राजेश हा महर्षी पब्लिक स्कूलमध्ये शिकत होता. काही दिवसांपूर्वी शाळेत असतानाच त्याची तब्येत अचानक बिघडली. मात्र त्यावेळी शाळा प्रशासनाने तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली नाही. तसेच प्रकृती गंभीर असूनही वेळेत उपचारासाठी दाखल करण्यात हलगर्जीपणा करण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी ☞(पान २ वर)

# आवास योजनेतील घोटाळ्याची करा चौकशी



**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत शेवती जहागीर गावातील रोजगार सेवकांनी केलेल्या घोटाळ्याची चौकशी करून कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी नागरिकांनी आज शुक्रवार २१ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की आवाज योजना अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल,वीहिर, गोठे तसेच इतर कामे व या सर्व ☞(पान २ वर)

# बडनेराचे जय हिंद चौक अन् बस डेपो बनले 'डेथ ट्रॅप'

## -वाहतूक पोलिसांच्या अनुपस्थिती, नागरिकांचा जीव धोक्यात!

**बडनेरा/प्रतिनिधीः-** बडनेरा शहरातील अत्यंत वर्दळीचे आणि संवेदनशील मानले जाणा-या जय हिंद चौक आणि बस डेपो परिसरातील वाहतूक पोलीस 'फिक्स पॉईंट' गेल्या १५ दिवसांपासून वाऱ्यावर सोडून देण्यात आले आहेत. पूर्वी या मुख्य पॉईंट्सवर नियमित दोन वाहतूक कर्मचारी तैनात असायचे. मात्र, गेल्या काही दिवसांत वाहतूक शाखेच्या बदल्या आणि फेरबदल झाल्यानंतर या पॉईंटवरील पोलीस गायब झाले असून, एखादी मोठी दुर्घटना घडल्यास याला प्रशासनच जबाबदार राहणार का, असा संतप्त सवाल बडनेराकर विचारत आहेत.



जय हिंद चौक हा शहराचा मुख्य दळणवळणाचा मार्ग आहे. या चौकाला लागूनच महानगरपालिका कार्यालय, रेल्वे गेट, शासकीय धान्याचे गोदाऊन, नर्सरी शाळा आणि पुढे कॉलेज आहे. गोडाऊनमुळे या परिसरातून सतत अवजड आणि ओव्हरलोड ट्रक्सची ये-जा सुरू असते. याच चौकात काही काळापूर्वी एका भरधाव ट्रकने तब्बल सहा जणांना चिरडल्याची अत्यंत भीषण दुर्घटना घडली होती,☞(पान २ वर)